# वृषाली जोशी

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा



# हर्क्युल पायरोच्या साहसकथा- ५

मूळ लेखिका – अगाथा ख्रिस्ती

मराठी अनुवाद – वृषाली जोशी

© वृषाली जोशी

सर्व हक्क अनुवादिकेच्या स्वाधीन. या अनुवादातील कोणताही भाग कोणत्याही माध्यमातून प्रसिद्ध करण्यासाठी अनुवादिकेची पूर्व परवानगी घेण्याची आवश्यकता आहे.

दूरभाष ९९२१७४६२४५

**या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!**

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा- ५

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो.

मजा येते.

**पण**

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हालाही आनंद मिळेल

## आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना हे पुस्तक मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# हर्क्युल पायरोच्या साहसकथा- ५

लेखिका : अगाथा ख्रिस्ती

अनुवादिका: वृषाली जोशी

चलभाष : ९९२१७४६२४५

इमेल – vrishalisjoshi@gmail.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : ११ मार्च २०२२



©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# अगाथा ख्रिस्ती



अगाथा ख्रिस्ती ही जगातील पुस्तक खपाचा उच्चांक गाठलेली व जिच्या लिखाणावर आधारित असे अनेक नाटक व सिनेमे निघाले, अशी प्रसिद्ध इंग्लिश लेखिका होती. सुमारे शंभर भाषांमध्ये तिच्या पुस्तकांचे अनुवाद झाले.

पहिल्या महायुद्धात ती परिचारिका म्हणून काम करत होती. तिची पहिली कादंबरी 'The Mysterious Affair of Styles' ही १९२० मध्ये प्रकाशित झाली. त्यात तिने हर्क्युल पायरो या गुप्तहेराची निर्मिती केली. पुढे २५ कादंबऱ्यांमध्ये तेच पात्र रहस्ये सोडवत राहिले. 'The Murder of Roger Ackroyd' या १९२६ मध्ये प्रकाशित झालेल्या कादंबरीपासून

मिस जेन मार्पल ही स्त्री गुप्तहेर पुढे आली व त्यापुढील ७५ कादंबऱ्यांमध्ये तीच रहस्ये सोडवत राहिली. Mousetrap [१९५२] हे तिचे नाटक पहिल्यांदा एका थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २१ वर्षे चालले व त्याचे ८८६२ प्रयोग झाले. तर दुसऱ्या थिएटरमध्ये रंगमंचावर सतत २०२० सालापर्यंत चालू होते व त्याचे २८००० प्रयोग झाले. ‘And then There Were None’ यावर आधारित हिंदी सिनेमा ‘गुमनाम’ तुम्हाला नक्कीच माहिती असेल.

१९२० मध्ये आर्चिबाल्ड ख्रिस्ती या तिच्या नवऱ्याने घटस्फोट मागितला. तेव्हा ती नाहीशी झाली. यथावकाश ती सापडली व तिने १९३० मध्ये पुरातत्वशास्त्रज्ञ सर मॅक्स मॅलोवनशी लग्न केले. तिने अद्भुतरम्य कादंबऱ्याही लिहिल्या. उदाहरणार्थ, Absent in the Spring ही १९४४ मध्ये लिहिलेली कादंबरी.

तिच्या पाच गोष्टींचा अनुवाद प्रस्तुत पुस्तकात केला आहे.

कथानुक्रम


१ लेमेसुरीआरचा वारसा

२ इटालियन उमरावाचे साहस


३ दुहेरी पाप

४ स्वप्न

५ ऱ्होड्समधील त्रिकोण

The Lemesurier Inheritance

# लेमेसुरीअरचा वारसा




पायरोबरोबर मी अनेक विचित्र केसेस सोडवल्या होत्या. पण अनेक वर्षे रुचीपूर्ण ठरलेली, असामान्य घटनासाखळी असणारी व सोडवायला अत्यंत अवघड, अशी एक केस पायरोकडे आली होती. लढाईमधील एका संध्याकाळी आमचे लक्ष लेमेसुरीअरच्या कौटुंबिक इतिहासाकडे गेले. आमचे बेल्जियममधील नवीन ओळखीचे जुने दिवस आठवत, मी आणि पायरो अलीकडे परत एकत्र आलो होतो. तो लढाईच्या कार्यालयातील काही किरकोळ काम करत होता --- आणि त्याबद्दल पूर्ण समाधान व्यक्त

केले जात होते. आम्ही कार्लटनमध्ये जेवत असू. जेवणामधील वेळात आमच्याबरोबर जेवणारा ब्रासची टोपी घातलेला माणूस पायरोला खूप वाखाणत असे. त्याला कसली घाई नसे. त्याचे उदाहरण डोळ्यांसमोर ठेऊन आम्ही सावकाशीने आमची कॉफी संपवली.

आम्ही बाहेर पडत असतांना, माझ्या कानांवर एक ओळखीचा आवाज आला. मी वळून पाहिले, तर तो कॅप्टन व्हिन्सेंट लेमेसुरीअर होता. तो फ्रान्समधील माझ्या ओळखीचा तरुण मनुष्य होता. तो त्याच्याहून वयाने मोठ्या माणसाबरोबर होता. त्यांच्या दिसण्यातील सारखेपणावरून, तो त्याच कुटुंबातील वाटत होता. मिस्टर ह्युगो लेमेसुरीअर, त्याचे काका म्हणून त्याने त्या माणसाची ओळख करून दिली.

मी खरे तर कॅप्टन व्हिन्सेंट लेमेसुरीअरला जवळून ओळखत नव्हतो. पण तो एक छान, काहीसा स्वप्नाळू तरुण मनुष्य होता. नॉर्थम्बरलँडमधील मूळ रहिवासी असणाऱ्या जुन्या, खास कुटुंबाची मालमत्ता असलेला असा तो होता, असे मी ऐकलेले मला आठवले. पायरो आणि मला काही घाई नव्हती आणि त्या तरुण माणसाने बोलावल्यामुळे, आम्ही त्या दोघांबरोबर टेबलावर बसलो व वेगवेगळ्या विषयांवर त्यांच्याशी गप्पा मारू लागलो. काका लेमेसुरीअर साधारण चाळीशीचा असावा. त्याच्या उतरत्या खांद्यांवरून तो चांगला बुद्धिमान वाटत होता. असे आढळले की तो सरकारसाठी, रसायनशास्त्राशी निगडीत काही संशोधन करत होता.

आमच्या टेबलाशी आलेल्या एका काळया, उंच माणसामुळे आमचे संभाषण तुटले. तो मनाच्या रागावलेल्या अवस्थेत असलेला वाटत होता.

तो उद्गारला, “देवाच्या दयेने तुम्ही दोघे मला सापडलात.”

“रॉजर, काय झाले आहे?”

“व्हिन्सेंटच्या वडिलांना एका तरुण घोड्यावर बसतांना, पडून अपघात झाला आहे.” त्याने त्यांना दुसऱ्याला बाजूला खेचल्यामुळे बाकीचे बोलणे समजले नाही.

काही मिनिटात त्या दोघांनी घाईने आमचा निरोप घेतला.

व्हिन्सेंट लेमेसुरीअरच्या वडिलांना एका तरुण घोड्यावर बसतांना गंभीर अपघात झाला होता आणि सकाळपर्यंत ते जगतील, असे वाटत नव्हते. व्हिन्सेंट पांढरा पडला व या बातमीने खचून गेला. एक प्रकारे, मी आश्चर्यचकित झालो --- कारण फ्रान्समध्ये असतांना, मला असे कळले होते, की तो आणि त्याचे वडील यांचे फारसे पटत नाही. त्यामुळे त्याचे दुःखप्रदर्शन मला आश्चर्यचकित करून गेले.

तो काळा तरुण म्हणजे मिस्टर रॉजर लेमेसुरीअर नावाचा त्याचा चुलत भाऊ असल्याचे आम्हाला सांगण्यात आले. तो मागे राहिला व आम्ही तिघे बरोबर बाहेर पडलो.”

तो तरुण म्हणाला, “हे जरा विचित्रच झाले. मिस्टर पायरोंना यात कदाचित स्वारस्य वाटू शकेल. मिस्टर पायरो, मी हिगीन्सनकडून, [हिगीन्सन ब्रासची टोपी घातलेला आमचा मित्र होता.] तुमच्याबद्दल ऐकले आहे. तो म्हणाला तुम्ही मानसशास्त्र कोळून प्यायला आहात.”

माझा मित्र सावधपणे बोलला, “हो, मी मानसशास्त्राचा अभ्यास करतो.”

“तुम्ही माझ्या चुलत भावाचा चेहरा पाहिला का? तो पार कोलमडून पडलेला तुम्ही पाहिला असेल, हो ना? त्याचे कारण तुम्हाला माहिती आहे का? पुरातन कौटुंबिक शाप! तुम्हाला त्याबद्दल ऐकायला आवडेल का?”

“तुम्ही ते मला सांगितलेत, तर फार बरे होईल.”

रॉजर लेमेसुरीअरने त्याच्या घड्याळाकडे पाहिले. “मी त्यांना किंग्ज क्रॉसला भेटणार आहे. अजून बराच वेळ आहे. ठीक आहे, मिस्टर पायरो, लेमेसुरीअर हे जुने कुटुंब आहे. मध्ययुगीन काळातील एक लेमेसुरीअर त्याच्या बायकोबद्दल संशयी झाला. त्याला ती बाई लाजिरवाण्या परिस्थितीत आढळली. ती शपथपूर्वक सांगू लागली, की ती निरागस आहे. पण त्याला काही ते पटेना. तिला एक मुलगा होता. तो म्हणू लागला, की तो मुलगा त्याचा नाही आणि तो त्याला कधीच आपला वारस मानणार नाही. मग त्याने काय केले, ते मी विसरलो --- काहीशी आल्हादक अशी आई व मुलाला भिंतीत जिवंत चिणल्याची मध्ययुगीन गोष्ट! काही झाले तरी त्या दोघांना ठार केले गेले. ती स्वतःचा काही गुन्हा नसल्याचे सांगत व

नवऱ्याला शिव्याशाप देत मेली. लेमेसुरीअर कुटुंबात जन्मलेला पहिला मुलगा कधीही कुटुंबाचा वारस म्हणून गणला जाणार नाही, असा तो शाप होता. असाच काळ गेला. आणि ती बाई निरपराध असल्याचे निर्विवाद सिद्ध झाले. माझा विश्वास आहे, की ह्युगो हा पहिला मुलगा असल्याने त्याने त्याचे आयुष्य शरणार्थीपणे भिक्षु होऊन, मठात घालवले. पण मजेची गोष्ट अशी आहे, की त्या दिवसापासून आजपर्यंत, पहिल्या जन्मलेल्या मुलाला कधीच इस्टेट मिळाली नाही. ती दुसऱ्या मुलाला, पुतण्यांना गेली, पण मोठ्या मुलाला कधीच नाही. व्हिन्सेंटचे वडील पाच भावांमधले दुसरे होते. सर्वात मोठा भाऊ बाळपणीच वारला होता. लढाईभर व्हिन्सेंटला असे सांगण्यात आले होते. की जो कुणी मेलेला होता, तो खात्रीपूर्वक मेला होता. पण विचित्रपणे, त्याचे लहान दोन भाऊ मारले गेले, पण तो स्वतः मात्र जिवंत राहिला."

पायरो विचारपूर्वक बोलला, "हा रुचीपूर्ण कौटुंबिक इतिहास आहे. पण आता त्याचे वडील वारले आहेत आणि तो सर्वात मोठा मुलगा आहे, नाही का?"

"तेच तर! आता शाप गंजला आहे ---आधुनिक युगातील जीवनाचे ताण त्याला सहन होणार नाहीत."

पायरोने दुसऱ्याचे विनोदी म्हणणे न पटल्यासारखी मान हलवली. रॉजर लेमेसुरीअरने पुन्हा घड्याळात पाहिले व म्हणाला की आता त्याला गेले पाहिजे.

या कॅप्टन व्हिन्सेंट लेमेसुरीअरच्या दुःखद गोष्टीबद्दल आम्ही दुसऱ्या दिवशी वाचले. ते स्कॉच मेल गाडीने उत्तरेकडे प्रवास करत असताना, रात्री कॅप्टन व्हिन्सेंटने डब्याचे दार उघडून, रुळांवर उडी मारली असणार. त्याच्या वडीलांच्या मरणाची बातमी ऐकून, त्याला बसलेला धक्क्यामुळे त्याला तात्पुरते मानसिक आजारलेपण आले असणार. नवीन वारस ठरलेल्या त्याच्या वडीलांच्या भावाच्या, रोनाल्ड लेमेसुरीअरच्या संदर्भात, लेमेसुरीअर कुटुंबात प्रचलित असलेल्या अफवेचा उल्लेख केला गेला. रोनाल्डचा एकुलता एक मुलगा फ्रान्सच्या नदीमध्ये, सोमेमध्ये मारला गेला होता.

आदल्या दिवशी संध्याकाळी तरुण व्हिन्सेंटबरोबर अचानक झालेल्या भेटीत आमची लेमेसुरीअर कुटुंबाबद्दलची रुची वाढली होती. दोन वर्षांनी झालेल्या, कुटुंबाचा इस्टेटीचा वारस होऊ न शकणाऱ्या रोनाल्ड लेमेसुरीअरच्या मृत्युचीदेखील आम्ही दखल घेतली. बळकट व दिलदार असलेला त्याचा धाकटा भाऊ जॉन, याचा मुलगा इटॉनला होता.

नक्कीच लेमेसुरीअरच्या कुटुंबात पापी भविष्याचे ढग दाटून आले होते. पुढील सुट्टीमध्ये त्या मुलाने, स्वतःवर गोळी मारून मरण ओढवून घेतले. एक गांधीलमाशी चावल्याने त्याच्या वडिलांचा अचानक मृत्यू झाला होता. त्यामुळे कुटुंबातील पाचव्या, सर्वात लहान भावाला, ह्युगोला, इस्टेट मिळाली. त्याला आम्ही कार्लटनला भेटलो होतो.

लेमेसुरीअरच्या कुटुंबात झालेल्या असामान्य दुर्दैवी घटनासाखळी नंतर, आम्ही त्यात काही व्यक्तिगत स्वारस्य दाखवले नाही. पण लवकरच आम्हाला त्यात क्रियाशीलपणे पडण्याचा काळ येणार होता.

## दोन

एका सकाळी मिसेस लेमेसुरीअर आम्हाला भेटायला आली. ती उंच, चपळ बाई होती. ती बहुधा तिशीची असावी. तिच्या बाह्य वागणुकीवरून, ती मोठ्या निश्चयाची व सर्वसाधारण चांगली बुद्धिमत्ता असलेली वाटत होती. ती बोलतांना थोडे अटलांटिक पलीकडील उच्चार करत होती.

ती म्हणाली, "मिस्टर पायरो, तुम्हाला भेटून, मला आनंद झाला. माझा नवरा ह्युगो लेमेसुरीअर तुम्हाला काही वर्षांपूर्वी भेटला होता. पण तुम्हाला ते आठवणे अवघड आहे."

"बाईसाहेब मला ते पक्के आठवते आहे. आम्ही कार्लटनमध्ये भेटलो होतो."

"मिस्टर पायरो, ही फार नवलपूर्ण गोष्ट आहे. मी फार दुःखात आहे."

"कशाबद्दल?"

"माझ्या मोठ्या मुलाबद्दल --- मला दोन मुले आहेत. रोनाल्ड आठ वर्षांचा असून गेराल्ड सहा वर्षांचा आहे."

“बाईसाहेब, चालू ठेवा. तुम्ही छोट्या रोनाल्डबद्दल कुठल्या कारणाने दुःखी आहात?”

“मिस्टर पायरो, गेल्या सहा महिन्यात, तो तीनदा मरता मरता वाचला. एकदा बुडतांना --- जेव्हा आम्ही सगळे या उन्हाळयात कॉर्नवॉलला गेलो होतो. एकदा तो शाळेच्या छोट्या खिडकीतून पडला. आणि एकदा वाईट वासाचे व चवीचे काही खाल्ल्यामुळे विषबाधा होऊन.”

पायरोच्या चेहऱ्यावरील हावभाव बघून तो काय विचार करत आहे, ते कळत होते. कारण मिसेस लेमेसुरीअर क्षणभर थांबून म्हणाली, “अर्थात मला माहिती आहे, की तुम्हाला मी राईचा पर्वत करणारी मूर्ख बाई असल्याचे वाटेल.”

“नाही, बाईसाहेब. असे घडल्याने, कोणतीही आई नाराज होईल. पण मी काय मदत करू शकतो, ते मला समजले नाही. मी अशा लाटा थोपवायला काही देव नाही. शाळेच्या छोट्या खिडकीसाठी मी लोखंडी गज ठोकणे सुचवू शकेन आणि विषबाधेसाठी आईचे लक्ष?”

“पण या गोष्टी रोनाल्डलाच का होतात आणि गेराल्डला का नाही?”

“बाईसाहेब, केवळ परिस्थितीमुळे --- तसे व्हायच्या शक्यतेमुळे!”

“तुम्हाला असे वाटते का?”

“बाईसाहेब, तुम्हाला आणि तुमच्या नवऱ्याला काय वाटते?”

मिसेस लेमेसुरीअरच्या चेहऱ्यावरून एक सावली सरकत गेली.

“ह्युगोबद्दल बोलण्यात काही अर्थ नाही --- तो काही ऐकून घेत नाही. कदाचित तुम्ही ऐकले असेल की आमच्या कुटुंबाला शाप आहे --- मोठा मुलगा यशस्वी होणार नाही. ह्युगोचा त्यावर विश्वास आहे. तो कुटुंबाच्या इतिहासात गुरफटलेला आहे आणि तो फार अंधश्रध्द आहे. जेव्हा मी माझी भीती त्याला बोलून दाखवते, तेव्हा तो हेच म्हणतो, की कुटुंबाला शाप आहे आणि त्यातून आपण सुटू शकत नाही. पण मी परदेशातून आले आहे. आणि तिथे आम्ही असल्या शापावर विश्वास ठेवत नाही. तुम्हाला माहिती आहे का, तसा विश्वास ठेवणाऱ्यांना आम्ही उच्च खानदानी समजतो. ते कुटुंबाला एक मानाचे स्थान प्राप्त करून देते. मी जेव्हा ह्युगोला भेटले, तेव्हा मी एका लहानशा विनोदी संगीत प्रहसनात अभिनेत्री म्हणून काम करत होते. तेव्हा मला वाटले, की कुटुंबाचा शाप वगैरे नुसता शब्दांचा खेळ आहे. हिवाळयातील रात्री शेकोटीभोवती बसून मारायच्या गप्पांचा तो भाग असेल, असे मला वाटले. पण हे माझ्या स्वतःच्या मुलांच्या बाबतीत होऊ लागले --- तेव्हा मी माझ्या मुलांवर जास्तच प्रेम करायला लागले. मिस्टर पायरो, मी त्यांच्यासाठी काहीही करेन.”

“म्हणजे बाईसाहेब, तुम्ही कौटुंबिक भाकडकथांवर विश्वास ठेवत नाही तर?”

युरेशियन सदाहरित वेलीच्या खोडातून, अशा भाकडकथा बघता येतात का?”

पायरो मोठ्या आश्चर्ययुक्त चेहऱ्याने ओरडला, ’’बाईसाहेब, तुम्ही काय बोलत आहात?”

“मी म्हणाले असल्या भाकडकथा ---किंवा भुतेखेते, असे तुम्हाला म्हणायचे असेल तर तसे --- ते युरेशियन सदाहरित वेलीच्या खोडातून बघता येते का? मी कॉर्नवॉलबद्दल काही बोलत नाही आहे. कुठलाही मुलगा फार साहसे करायला गेला तर अडचणीत येतो. जरी रोनाल्ड चार वर्षांचा असतांना पोहू शकत होता. पण युरेशियन सदाहरित वेलीची गोष्ट वेगळी आहे. दोन्ही मुले फार मस्तीखोर होती. त्याना असे आढळून आले, की ते वेलीवर चढू किंवा उतरू शकतात. एक दिवस गेराल्ड लांब होता --- रोनाल्ड सारखा वेलीवरून चढत उतरत होता. आणि मग तो वेलीवरून पडला. नशीबाने त्याला काही गंभीर दुखापत झाली नाही. पण मी जाऊन ती वेल तपासली. ती कापलेली होती. मिस्टर पायरो, मुद्दाम कापलेली होती.”

“बाईसाहेब, तुम्ही मला सांगत आहात, ते फार गंभीर आहे. तुम्ही म्हणता आहात, की तुमचा धाकटा मुलगा तेव्हा लांब होता?”

“हो.”

“आणि वाईट वासाचे व चवीचे काही खाल्ल्यामुळे विषबाधा झाली तेव्हादेखील तुमचा धाकटा मुलगा लांब होता?”

“नाही. तेव्हा दोघे तिथेच होते.”

पायरो पुटपुटला, “हे विचित्र आहे. बाईसाहेब, आता हे सांगा, की तुमच्या घरी तुम्ही कोणकोण असता?”

“मुलांची दाई, मिस सॉन्डर्स आणि माझ्या नवऱ्याचा सचिव, जॉन गार्डीनर --- “

मिसेस लेमेसुरीअर थोडी लाजल्यासारखी थांबली.

“आणि कोण, बाईसाहेब?”

““तुम्ही ज्याला एकदा भेटलात, तो मेजर रॉजर लेमेसुरीअर. तो आमच्याबरोबर बराच काळ रहातो आहे.”

“बरोबर, तो चुलत भाऊ आहे, नाही का?”

“लांबचा चुलत भाऊ. तो आमच्या कुटुंबाचा सदस्य नाही. तरी मला वाटते, तो माझ्या नवऱ्याचा जवळचा नातेवाईक आहे. तो खूप चांगला आहे. आम्हाला सर्वांना तो खूप आवडतो. मुलांना त्याचा लळा आहे.”

“त्याने तर मुलांना वेलीवर चढायला शिकवले नाही ना?”

“तसेही असेल. तो मुलांना खोड्या काढायला नेहमी उत्तेजन देतो.”

“बाईसाहेब, मी तुम्हाला आधी जे म्हणालो, त्याबद्दल माफी मागतो. हा खराच धोका दिसतो आहे. मला विश्वास वाटतो, की मी या बाबतीत काही करू शकेन. मी तुम्हाला असे सुचवतो, की तुम्ही आम्हाला दोघांना तुमच्याकडे रहायला बोलवा. तुमचा नवरा हरकत घेणार नाही ना?”

“ओहो, नाही. पण त्याचा असल्या गोष्टींवर विश्वास बसणार नाही. तो नुसता मुलगा मरण्याची वाट बघत बसून रहातो.”

“बाईसाहेब, शांत व्हा. आपण सर्व काही नीटपणे ठरवू.”

## तीन

आम्ही आमचा बेत नीट ठरवला. दुसऱ्या दिवशी आम्ही उत्तरेकडे प्रवास करत होतो. पायरो विचारात हरवला होता. त्यातून बाहेर येऊन, तो अचानक बोलला, “अशाच गाडीमधून तो व्हिन्सेंट लेमेसुरीअर पडला, नाही का?”

त्याने ‘पडला’ शब्दावर विशेष जोर दिला.

मी विचारले, “त्यात तुला काही कटकारस्थान दिसते का?”

“हेस्टीग्ज, तुला हे जाणवले का, की लेमेसुरीअर कुटुंबातील काही मृत्यु --- आपण असे म्हणू शकू का --- की मुद्दाम घडवून आणले गेले? व्हिन्सेंटचेच बघ ना, मग एटकॉन मुलगा --- बंदुकीचा अपघात हा नेहमी संदिग्ध असतो. असे धरून चालू, की रोनाल्ड हा मुलगा शाळेच्या छोट्या खिडकीतून मरणांतिक रीत्या पडला --- यात अजून जास्त नैसर्गिक आणि संशय नसलेले काय असू शकते? पण हेस्टीग्ज, फक्त एकच मूल का?

मोठ्या मुलाच्या मरणाने कुणाचा फायदा होणार आहे? सहा वर्षांच्या त्याच्या धाकट्या भावाचा? छे, छे.”

“त्याना दुसऱ्याचा काटा नंतर काढायचा असेल.” त्याना म्हणजे कोणाला, हे न सांगता, मी सुचवले.

पायरोने असमाधानाने डोके हलवले. तो म्हणाला, “वाईट वासाचे व चवीचे काही खाल्ल्यामुळे विषबाधा! अॅट्रोपाईनने अशीच लक्षणे दिसतात. हो. आपले तिथे हजर असणे गरजेचे आहे.”

मिसेस लेमेसुरीअरने आमचे उत्साहाने स्वागत केले. मग तिने आम्हाला तिच्या नवऱ्याच्या अभ्यासिकेत नेले आणि त्याच्याबरोबर ठेवले. त्याला मी पूर्वी बघितले होते, त्यापेक्षा तो खूप बदलला होता. त्याचे खांदे खूपच उतरले होते. आणि चेहऱ्याला पुसट करडी झाक आली होती. आम्ही इथे का आलो आहोत, हे पायरो सांगत असतांना, तो ऐकत होता.

शेवटी तो म्हणाला, “तंतोतंत सॅडीच्या व्यवहारिक सामान्य ज्ञानासारखे! मिस्टर पायरो, तुम्ही खुशाल रहा. आणि इथे आल्याबद्दल तुमचे आभार. पण जे नशीबात लिहिले आहे, ते तसेच रहाणार. कारवाई करणाऱ्यांची ताकद जास्त आहे. आम्हा लेमेसुरीअरर्सना ते माहिती आहे --- आमच्यापैकी कोणीच त्या शापातून सुटू शकत नाही.”

पायरोने वेलीवरुन मुलगा पडल्याचे सांगितले. पण ह्युगोला त्याचे काहीच वाटलेले दिसले नाही.

“संशयातीतपणे, कोणी निष्काळजी माळ्याचे ते काम असेल. तिथे कदाचित कोयता वगैरेदेखील काही असू शकेल. पण मिस्टर पायरो, मी तुम्हाला सांगतो, यामागचा हेतू फार काळ लपून रहाणार नाही.”

पायरोने त्याच्याकडे लक्ष देऊन पाहिले. “तुम्ही असे का म्हणता?”

“कारण मी स्वतःही शापित आहे. मी मागच्या वर्षी डॉक्टरकडे गेलो होतो. मला एक दुर्धर व्याधी जडली आहे --- माझा शेवट फार दूर नाही. पण मी मरण्यापूर्वी, रोनाल्ड्ला बाधा होईल. गेराल्ड्ला वारसा मिळेल.”

“आणि तुमच्या दुसऱ्या मुलालाही काही झाले, तर?”

“त्याला काही होणार नाही. त्याला काही भीती नाही.

“पण काही झालेच तर?” पायरोने लावून धरले.

“माझा चुलत भाऊ पुढील वारस आहे.”

आम्ही थांबलो. एक उंच, धट्टाकट्टा, लालसर तपकिरी कुरळया केसांचा माणूस, कागदांचा गठ्ठा घेऊन अवतीर्ण झाला.

ह्युगो लेमेसुरीअर म्हणाला, “गार्डिनर, त्याचे आता एवढे काही वाटून घेऊ नकोस.” मग तो म्हणाला, “माझा सचिव, मिस्टर गार्डिनर.”

तो सचिव वाकला. काही आल्हादक शब्द बोलला व बाहेर निघून गेला. तो दिसायला चांगला असला, तरी त्याच्यापासून पळ काढावा, असे वाटण्यासारखे काही होते. नंतर आम्ही एका सुंदर जमिनीवरून चालतांना,

मी पायरोला तसे म्हणालो आणि त्याने मूकसंमती दाखवल्याने, मी आश्चर्यचकित झालो.

“हो, हो हेस्टीग्ज, तुझे बरोबर आहे. मलाही तो आवडला नाही. तो फार देखणा आहे. तो नेहमी काही सोपी कामे करत असणार. आहा, मुले आली बघ.”

मिसेस लेमेसुरीअर दोन मुलांसकट आमच्याकडे येत होती. ती मुले छान दिसत होती. धाकटा आईसारखा सावळा होता तर मोठा लालसर तपकिरी कुरळ्या केसांचा होता. त्यांनी आनंदाने हस्तांदोलन केले आणि थोड्याच वेळात पायरोशी मिसळून गेले. नंतर आमची काहीच खास नसलेल्या मिस सॉन्डर्सशी ओळख करून देण्यात आली. त्यामुळे आता घरातील सर्वांशी ओळख झाली.

## चार

आमचे काही दिवस धोक्याकडे लक्ष ठेवत छान गेले. पण काही छडा लागेना. मुलांचे आनंदी सामान्य आयुष्य चालू होते. काही चुकीचे घडत नव्हते. आम्ही आल्यापासून चौथ्या दिवशी मेजर रॉजर लेमेसुरीअर रहायला आला. तो थोडा बदलला होता. पण आधीसारखाच काळजीमुक्त आणि देखणा होता. वरवर तसेच सर्व काही वागणे चालू होते. तो मुलांचा खरोखर लाडका होता. तो आला की मुले किंकाळ्या मारून त्यांचा आनंद

साजरा करत आणि लगेच त्याला रानटी भारतीय खेळ खेळण्यासाठी, बागेत ओढून नेत. माझ्या लक्षात आले की पायरो त्यांच्या नकळत त्यांच्या मागून जात असे.

## पाच

लेमेसुरीअर यांची शेजारीण असणाऱ्या क्लेगेट बाईसाहेबांनी दुसऱ्या दिवशी मुलांसकट सर्वांना चहाला बोलावले होते. मिसेस लेमेसुरीअरने सुचवले, की आम्ही पण यावे. पण मी सुटकेचा सुस्कारा टाकला, जेव्हा पायरोने नकार दिला व सांगितले, की तो घरी रहाणेच पसंत करेल.

सर्वजण तयारी करू लागल्यावर, पायरो कामाला लागला. त्याने मला एका बुद्धिमान लढाऊ कुत्र्याची आठवण करून दिली. माझा विश्वास होता, की ज्याचा आम्ही धांडोळा घेतला नाही, असा घराचा एकही कोपरा नाही. तरीही हे इतके शांतपणे व पद्धतशीरपणे केले गेले, की त्याच्या हालचालींकडे कुणाचे लक्ष गेले नाही. स्पष्टपणे शेवटी, तो असमाधानी राहिला. आम्ही पार्टीत नसलेल्या मिस सॉन्डर्सबरोबर गच्चीत चहा घेतला.

ती हळू आवाजात बोलली, “मुलांना मजा येईल. मला आशा आहे की ते व्यवस्थित वागतील आणि फुलांचे वाफे उध्वस्त करणार नाहीत किंवा मधमाशांजवळ जाणार नाहीत.”

चहा पिताना पायरो मध्येच थांबला. भुताला पाहिलेल्या माणसासारखा त्याचा चेहरा दिसत होता. त्याने गडगडाटी आवाजात विचारले, “मधमाशा?”

“हो, मिस्टर पायरो, मधमाशा. तिथे तीन पोळी आहेत. क्लेगेट बाईसाहेबांना त्यांच्या मधमाशांचा मोठा अभिमान आहे.”

पायरो पुन्हा ओरडला, “मधमाशा?” मग तो टेबलाजवळून उठला आणि त्याचे हात आणि डोके हलवत, गच्चीत फेऱ्या मारू लागला. मला कळेना की मधमाशांच्या नुसत्या उल्लेखाने तो एवढा का चिडला.

तेव्हाच आम्ही गाडी परतल्याचा आवाज ऐकला. ते गाडीतून उतरतांना पायरो दाराजवळ होता.

गेराल्ड जोराने ओरडला, “रोनाल्ड्ला मधमाशा चावल्या.”

मिसेस लेमेसुरीअर म्हणाली, “त्याचे एवढे काही नाही. काही सूजदेखील आली नाही आहे. आम्ही त्यावर अमोनिया लावला आहे.”

पायरो म्हणाला, “माझ्या छोट्या मुला, बघू माशा कुठे चावल्या?”

रोनाल्ड म्हणाला, “इथे, माझ्या मानेच्या बाजूला. पण काही लागले नाही. त्याचे वडील म्हणाले, “स्थिर रहा. अजूनही तुझ्या अंगावर मधमाशी आहे.” “मी एकदम स्तब्ध झालो आणि त्यांनी ती हाकलली. रोनाल्ड पुढे म्हणाला, “पण जरी मला लागले नाही, तरी पहिल्यांदा तिने मला नांगी

मारली. फक्त पिन टोचल्यासारखे झाले. पण मी रडलो नाही, कारण मी मोठा मुलगा आहे आणि आता पुढच्या वर्षी शाळेत जाणार आहे.”

पायरोने त्याची मान तपासली व बाजूला झाला. त्याने मला दंडाला धरून बाजूला नेले व पुटपुटला, “अरे मित्रा, आज रात्री आपण एक गोष्ट करू. पण कुणाला काही सांगू नकोस.”

अजून काही बोलायला त्याने नकार दिला. मी संध्याकाळपर्यंत माझी उत्सुकता दाबून ठेवली. त्यने लवकर आवरले, मीदेखील आवरून बसलो. आम्ही वर गेल्यावर, त्याने माझा दंड धरून, सूचना दिल्या.

“रात्री कपडे काढू नकोस. पुरेसा वेळ थांब आणि दिवा मालवून माझ्याकडे ये.”

वेळ झाली, तेव्हा मी त्याला माझ्यासाठी थांबलेले पाहिले. आम्ही छोट्या शाळेच्या बाजूने रांगत गेलो. रोनाल्ड त्याच्या नेहमीच्या लहानशा खोलीत होता. आम्ही त्यात शिरलो आणि अंधाऱ्या कोपऱ्यात दबा धरून बसलो. मुलाचा श्वास जड पण सुरळीत चालला होता.

मी कुजबुजलो, “नक्कीच त्याचा श्वास जड वाटतो आहे का?”

पायरोने मान हलवली. तो पुटपुटला, “अंमली पदार्थ”

“काय?”

“तो ओरडू नये म्हणून --- “

पायरो थांबल्यामुळे, मी विचारले, “कोणावर?”

"अरे मित्रा, त्वचेखाली दिलेल्या इंजेक्शनमुळे --- "शू --- आता आपण बोलूया नको. अजून काही वेळ तरी काही होण्याची मला आशा नाही."

## सहा

पण यात पायरो चुकीचा ठरला. जेमतेम दहा मिनिटे झाली नाहीत, तोच दार हळूच उघडले गेले आणि कोणीतरी खोलीत शिरले. मला जोराने श्वास घेतल्याचा आवाज आला. पाऊले अंथरुणाकडे वळली. आणि नंतर अचानक तिथे लहानसा आवाज झाला. विजेच्या कंदीलाचा उजेड मुलाच्या चेहऱ्यावर पडला. कंदील धरणारा अजून अंधारातच होता. त्या आकृतीने कंदील खाली ठेवला. उजव्या हाताने त्याने इंजेक्शनची सुई हातात धरली होती. डाव्या हाताने त्याने मुलाच्या मानेला स्पर्श केला. पायरोने व मी उडी मारली. कंदील जमिनीवर गडगडला. अंधारात आम्ही त्या अज्ञात व्यक्तीवर तुटून पडलो. त्याची ताकद असामान्य होती. पण शेवटी आम्ही त्याला चित केले.

"हेस्टीग्ज, दिवा लाव मला त्याचा चेहरा बघायचा आहे --- तरी मला चांगलेच माहिती होते, की तो कुणाचा असणार आहे."

मी तसे केले व मला वाटते माझ्या हाताला कंदील लागला. क्षणभर मला तो गुप्तपणे न आवडणारा सचिव वाटला. पण नंतर माझी खात्री झाली,

की दोन लहान पुतणे मारल्याने ज्या माणसाचा फायदा होणार होता, तोच तो माणूस, माणूस कसला, राक्षस असणार.

माझा पाय कंदीलाला लागला. मी तो उचलून दिवा लावला. एकदम त्या माणसाचा चेहरा स्पष्ट दिसला. तो ह्युगो लेमेसुरीअर होता. मुलांचे वडील!

माझ्या हातातून कंदील जवळजवळ पडला. मी घोगऱ्या आवाजात ओरडलो, “अशक्य, निव्वळ अशक्य!”

## सात

लेमेसुरीअर बेशुद्ध होता. पायरोने व मी त्याला त्याच्या खोलीत नेले आणि अंथरुणावर झोपवले. पायरोने वाकून त्याच्या उजव्या हातातून काहीतरी काढून घेतले. त्याने ते मला दाखवले. ती इंजेक्शनची सुई होती. मी शहारलो.

“त्यात काय आहे? विष?”

“मला वाटते, फॉर्मिक आम्ल.”

“बहुधा मुंग्या उकळून मिळवलेले. तुला आठवते का, तो केमिस्ट होता. मधमाशीच्या चावण्याने मुलगा मेला, असे बहुधा सर्वांना वाटले असते.

मी ओरडलो, “अरे देवा, त्याचा स्वतःचा मुलगा! आणि तुला ही अपेक्षा होती?”

पायरोने थंडपणे मान हलवली.

“फॉर्मिक आम्ल?”

“हो, त्याची मनस्थिती बिघडली आहे. मला वाटते कुटुंबाचा इतिहास त्याच्या बाबतीत मानसिक आजार ठरला आहे. इस्टेट मिळवण्याच्या ध्यासाने त्याला गुन्ह्यांची मालिका करायला भाग पाडले आहे. त्याला पहिल्यांदा हे तेव्हा सुचले असावे, जेव्हा तो व्हिसेंटबरोबर त्या रात्री उत्तरेत प्रवास करत होता. माझा अंदाज चुकलेले मला सहन झाले नसते. रोनाल्ड्चा मुलगा आधीच मेलेला होता. रोनाल्ड स्वतः मरतमढेच होता. ते सर्वजण खूप अशक्त होते. त्याने बंदुकीचा अपघात घडवून आणला होता --- आणि आतापर्यंत मला त्याबद्दल संशय आला नव्हता. त्याचा भाऊ जॉन याचे मरणदेखील त्याने याच पद्धतीने घडवून आणले होते --- मानेच्या नीलेतून फॉर्मिक आम्लाचे इंजेक्शन देऊन. त्यामुळे त्याची महत्वाकांक्षा पूर्ण झाली आणि तो इस्टेटीचा वारस बनला. पण त्याचा विजय क्षणिक ठरला. त्याला असे आढळून आले, की तो असाध्य रोगाने आजारी आहे. आणि त्याने हे डोक्यात घेतले, की लेमेसुरीअर कुटुंबात मोठ्या मुलाला वारसाह्क्काने काही मिळत नाही. मला संशय आला की अंघोळीचा अपघात त्याच्यामुळेच होता --- त्याने मुलाला फार लांबपर्यंत

जायला उत्तेजन दिले. ते जमले नाही, तेव्हा त्याने वेल कापली आणि त्यानंतर मुलाच्या अन्नात विष कालवले."

मी शहारत पुटपुटलो, "राक्षसी गुण असलेला! आणि इतक्या शहाणपणे आखलेला बेत!"

"हो माझ्या मित्रा, बिघडलेल्या असामान्य मनस्थितीपेक्षा जास्त आश्चर्यकारक काहीही नाही. मी कल्पना करतो, अलीकडेच तो शहाण पणाची सीमा पूर्णपणे ओलांडून गेला होता. सुरवातीला त्याच्या वेडामध्ये पद्धतशीरपणा होता."

"आणि मग मला रॉजरचा संशय येऊ लागला --- फार छाप पाहणारा माणूस!"

"अरे मित्रा, हे नैसर्गिकपणे गृहीत धरले गेले. आपल्याला माहिती होते, की तो देखील त्या रात्री व्हिसेंटबरोबर उत्तरेत प्रवास करत होता. आपल्याला माहिती आहे, की ह्युगो आणि ह्युगोच्या मुलांनंतरचा तो वारस होता. पण आपले गृहीत धरले, तसे प्रत्यक्षात नव्हते. छोटा रोनाल्ड घरी होता, तेव्हा वेल करवतीने कापण्यात आली --- पण रॉजरच्या रुचीमुळे, ती दोन्ही मुले मरणार आहेत. त्याच तऱ्हेने फक्त रोनाल्डच्या अन्नात विष कालवले गेले. आणि आज जेव्हा ते घरी आले, तेव्हा मला असे आढळले, की रोनाल्डला मधमाशी चावली, असे फक्त त्याचे वडील म्हणाले होते. मला मधमाशी चावल्याने झालेली दुसरी एक मरणाची घटना आठवली --- आणि मला माहिती होते!"

# आठ

ह्युगो लेमेसुरीअर मानसिक रुग्णालयात होता. तिथून सुटल्यावर काही महिन्यात तो वारला होता. एक वर्षाने त्याच्या विधवेने मिस्टर जॉन गार्डिनरशी दुसरे लग्न केले. लालसर तपकिरी कुरळ्या केसांचा सचिव. रोनाल्डला वारसाहक्काने त्याच्या वडिलांची शेकडो एकर जमीन मिळाली आणि त्याची चांगली भरभराट झाली.

मी पायरोला म्हणालो, “छान, छान! अजून एक भ्रम दूर झाला. तू मोठ्या यशस्वीपणे लेमेसुरीअर कुटुंबाचा शाप खोटा ठरवलास.”

पायरो विचारपूर्वक म्हणाला, “मला नवल वाटते, खरेच मला फार नवल वाटते.”

“म्हणजे काय?”

“अरे मित्रा, मी तुला एका विशिष्ट रीतीने उत्तर देतो, लालसर तपकिरी कुरळे केस.”

मी आश्चर्यचकित होऊन माझा आवाज हळू करत कुजबुजलो, “रक्त?”

“हेस्टीग्ज, तुझ्या कल्पना नेहमी क्षोभनाट्यमय असतात. मी त्यापेक्षा जास्त कल्पनारम्य नसलेल्या गद्य भाषेत बोलतो आहे --- लहानशा रोनाल्ड लेमेसुरीअरच्या केसांचा रंग.”

THE ADVENTURE OF THE ITALIAN NOBLEMAN

# इटालियन उमरावाचे साहस



पायरोला व मला पुष्कळ मित्र व खेळीमेळीने वागणारे ओळखीचे लोक होते. त्यातील एक आमच्याजवळ रहाणारे, डॉ हॉकर होते. ते वैद्यकीय व्यवसाय संघटनेचे सभासद होते. ते आनंदी सवयीने कधीकधी आमच्याकडे संध्याकाळी येत असत आणि पायरोबरोबर गप्पा मारत. त्यांना पायरोबद्दल आपुलकी असून ते त्याच्या बुद्धिमत्तेचा आदर करत. डॉक्टर स्वतः मनमोकळे होते आणि जराही संशयी स्वभावाचे नव्हते. त्यांच्याकडे नसलेल्या गुणांचे ते कौतुक करत असत.

जूनच्या सुरवातीच्या दिवसातील एका संध्याकाळी एकदा ते साडेआठ वाजता आले आणि गुन्ह्यातील आर्सेनिक विषबाधा या

विषयाबद्दल चर्चा करू लागले. त्यानंतर सुमारे पाऊण तासाने हॉलचे दार सताड उघडले आणि एक बावरलेली बाई अचानक आत शिरली.

“ओहो, डॉक्टर, तुम्ही हवे आहात.” हे ती इतक्या भयंकर आवाजात म्हणाली, की मी एकदम वळून पाहिले.”

मी तिला डॉक्टरांचे घर सांभाळणारी, मिस रायडर असल्याचे ओळखले. डॉक्टर अविवाहित होते. ते काही रस्ते पलीकडे असलेल्या, एका अंधाऱ्या, जुन्या घरात असत. नेहमी शांत असणारी मिस रायडर आता काही अगम्य अडचणीच्या काठावर दिसत होती.

“काय भयंकर आवाज आहे, नाही का? कोण आहे? काय त्रास आहे?”

“डॉक्टर, एक फोन आला होता. मी त्याला उत्तर दिले. तो असा होता, ‘मदत करा --- डॉक्टर --- मदत करा. त्यांनी मला मारले आहे.’ मग तो पुसट होत गेला. मी विचारले, “कोण बोलते आहे?” मला कुजबुजत्या स्वरात ऐकू आले, “फोस्काटाईन” असे काहीसे ---“ रीजेन्टचे कोर्ट”

डॉक्टरांच्या तोंडून आश्चर्योद्गार बाहेर पडला. उमराव फोस्काटाईन, ते रीजेन्टच्या कोर्टात रहातात. मला ताबडतोब गेले पाहिजे. काय झाले असेल?”

पायरोने विचारले, “तुमचा रुग्ण का?”

“काही किरकोळ कारणाने मी त्याच्यावर थोड्या आठवड्यांपूर्वी उपचार केले होते. तो इटालियन आहे. पण तो इंग्लिश चांगले बोलतो. ठीक आहे, मिस्टर पायरो, शुभ रात्र.” अचानक जायला लागल्यामुळे, तो नाराज वाटत होता.

पायरो हसत म्हणाला, “तुमच्या मनातले मला कळते आहे. मला तुम्हाला पोचवायला यायला आवडेल. हेस्टीग्ज, धावत जाऊन टॅक्सी आण बर.”

जेव्हा एखाद्याला घाई असते, तेव्हा टॅक्सी लगेच कधीच मिळत नाही. पण शेवटी मला एक मिळाली. आम्ही रीजेन्टच्या कोर्टाकडे निघालो. ती सेंट जॉन रस्त्यापासून थोडी लांब असलेली, सदनिकांची नवीन इमारत होती. ती अलीकडेच बांधली होती आणि आधुनिक सुखसोयींनी युक्त होती.

लिफ्टजवळ कुणी नव्हते. डॉक्टरांनी अधीरपणे लिफ्टचे बटन दाबले. जेव्हा लिफ्ट आली, तेव्हा गणवेषधारी शिपायाला त्याने कडकपणे विचारले, “सदनिका ११, उमराव फोस्काटाईन. मला वाटते, तिथे अपघात झाला आहे.”

तो निरखून बघू लागला.

“मी त्याबद्दल ऐकले. मिस्टर ग्रेव्ह्ज, म्हणजे उमराव फोस्काटाईन यांचा माणूस --- अर्ध्या तासापूर्वी बाहेर गेला आणि तो काहीच बोलला नाही.”

“उमराव सदनिकेत एकटेच आहेत का?”

“नाही सर, त्यांच्याबरोबर दोन माणसे जेवत होती.”

मी उत्सुकतेने विचारले, “ती कशी होती?”

आता आम्ही लिफ्टमध्ये होतो. दुसऱ्या मजल्यावरील सदनिका क्रमांक ११ कडे निघालो होतो.

“मी स्वतः त्यांना पाहिले नाही. पण मला असे कळले, की ते परदेशी होते.”

त्याने लोखंडी दार उघडले. आम्ही बाहेर आलो. ११ क्रमांकाच्या समोर आलो. डॉक्टरांनी घंटी दाबली. काही उत्तर मिळाले नाही. आतून काही आवाज आला नाही. डॉक्टरांनी परत घंटी वाजवली. आम्हाला आत तिचा आवाज ऐकू आला. डॉक्टरांनी परत परत घंटी वाजवली. ती आतून वाजलेली कळत होते. पण आतून जिवंतपणाचे काही लक्षण नव्हते.

डॉक्टर पुटपुटले, “हे गंभीर होत चालले आहे.” ते लिफ्टच्या शिपायाकडे वळले. “या दरवाज्यातून आत जाण्यासाठी काही विशिष्ट किल्ली लागते का?”

“खालील कार्यालयात तुम्हाला ती मिळेल.”

“ती आण. आणि इकडे बघ. मला वाटते, पोलिसाला बोलावलेले बरे.”

पायरोने मानेने संमती दर्शवली.

तो माणूस थोड्याच वेळात व्यवस्थापकाला घेऊन आला.

“लोकहो, मला सांगा, याचा अर्थ काय?”

“नक्की सांगतो. मला उमराव फोस्काटाईन यांच्याकडून निरोप आला, की त्यांच्यावर हल्ला झाला असून, ते मरत पडले आहेत. तुम्हाला समजेल, की वेळ घालवणे योग्य नाही ---मला आशा आहे की आपल्याला आधीच उशीर झाला नसेल.” व्यवस्थापकाने अजून काही न विचारता किल्ली दिली आणि आम्ही सगळे आत शिरलो.

प्रथम आम्ही चौकोनी हॉलमध्ये आलो. उजवीकडील दार अर्धवट उघडे होते. व्यवस्थापकाने मानेने तिथे जाण्यासाठी खूण केली.

“जेवायची खोली.”

डॉ हॉकर पुढे झाले. आम्ही पाय न वाजवता, त्यांच्यामागोमाग गेलो. आत शिरताना मी जोराने श्वास घेत होतो. मध्यभागी गोल टेबल होते. त्यावर जेवणाचे अवशेष पडले होते. त्यावर बसलेली माणसे आताच उठली आहेत, अशा तीन खुर्च्या ढकललेल्या होत्या. शेकोटीच्या उजवीकडील कोपऱ्यात, मोठे लिहायचे टेबल होते. तिथे एक मनुष्य बसला होता --- किंवा माणसासारखे काही. त्याच्या उजव्या हातात अजूनही फोन धरलेला

होता. पण डोक्यावर मागून बसलेल्या सणसणीत गुद्द्याने तो पुढे पडलेला होता. शस्त्र फार लांब नव्हते. एक संगमरवरी पुतळा घाईने खाली ठेवल्यासारखा दिसत होता. त्याचा तळ रक्ताने माखला होता.

डॉक्टरांना तपासायला एक मिनिटही लागले नाही. “पूर्णपणे मृत! जागच्या जागीच तो मेला असणार. मला नवल वाटते, त्याने फोन करणे, कसे जमवले. पोलीस येईपर्यंत त्याला हलवणे उचित ठरले नसते.”

व्यवस्थापकाने सुचवल्याने, आम्ही सदनिकेत शोध घेतला. पण फारसे काही हाती लागले नाही. बाहेर जाणे शक्य असतांना, मारेकरी तिथे लपून बसले असतील, असे वाटत नव्हते.

आम्ही परत जेवायच्या खोलीत आलो. आमच्याबरोबर पायरो आला नाही. मी त्याला खोलीतील मध्ये ठेवलेल्या टेबलाचा अभ्यास करतांना पाहिले. तिथे मध्यभागी एक गुलाबांचा गुच्छ होता आणि पांढऱ्या लेसचे रुमाल टेबलाच्या चकाकीत पृष्ठभागाची शोभा वाढवत होते. तिथे फळांची ताटली होती. पण आईस्क्रीमच्या तीन बशा रिकाम्या होत्या. तिथे कॉफी उरलेले तीन कॉफीचे कप होते --- दोन कपात काळी कॉफी होती व एकात दूध होते. तिघांनीही पोर्ट घेतली होती आणि पोर्टची काचेची शोभेची अर्धी भरलेली बाटली मधल्या ताटलीसमोर होती. एका माणसाने सिगार ओढली होती आणि इतर दोघांनी सिगरेट. कासवाच्या पाठीच्या डबीत सिगार होत्या, तर चांदीच्या डबीत सिगरेट. त्या दोन्ही टेबलावर उघड्या पडल्या होत्या.

या सगळ्या गोष्टी मी मनाशी उजळणी केली. पण मला असे कबूल करणे भाग पडले, की त्या तेथील परिस्थितीवर काही प्रकाश टाकत नव्हत्या. पायरोला त्यात एवढे लक्ष देण्यासारखे काय दिसले, याचे मला नवल वाटले. मी त्याला तसे विचारले.

तो उत्तरला, “अरे मित्रा, तू मुद्दा बघितला नाहीस. मला न दिसणारे काही मी बघत असतो.”

“ते काय आहे?”

“एक चूक --- लहानशी असली तरी --- खुन्याकडून झालेली चूक.”

तो हळूच शेजारील स्वयंपाकघरात शिरला. ते पाहिले आणि डोके हलवले.

“ते काय आहे?”

तो व्यवस्थापकाला म्हणाला, “मिस्टर, मला तुमची जेवण वाढायची पद्धत स्पष्ट करा.”

व्यवस्थापक भिंतीवरील एका लहानशा कोनाड्याकडे गेला. त्याने स्पष्ट केले, “ही पदार्थाची लिफ्ट आहे. ती स्वयंपाकघरातून इमारतीच्या वरपर्यंत जाते. तुम्ही या फोनमधून मागणी करायची. आणि तो पदार्थ लिफ्टमधून पाठवला जातो. उष्ट्या खरकट्या ताटल्या वगैरेही त्याच पद्धतीने

पाठवता येतात. घरी काही काम करायची चिंता नाही. समजले का, आणि त्याच वेळी तुमची सारखी बाहेर जाऊन खायची कटकट वाचते.”

पायरोने मान हलवली.

“मग आज वापरलेल्या ताटल्या स्वयंपाकघरात पडल्या आहेत. त्या लिफ्टमधून वर पाठवायला तुमची परवानगी आहे का?”

“ओहो, जर तुम्हाला ते करायचे असेल, तर नक्कीच. लिफ्ट चालवणारा माणूस, तुम्हाला वर घेऊन जाईल व दाखवेल. पण मला वाटते, तिथे तुम्हाला उपयुक्त असे काही सापडणार नाही. तिथे रोज शेकडो ताटल्यांची ये जा असते आणि त्या सर्व एकत्र केल्या जातात.

पण तरीही पायरो ठाम राहिला. आम्ही स्वयंपाकघरांना भेटी दिल्या आणि ११ क्रमांकाच्या सदनिकेतून मागणी घेतलेल्या माणसाला प्रश्न विचारले.

ती मागणी मेनूकार्ड बघून तिघांसाठी केली गेली होती. सूप ज्युलीन, बीफ, भात इत्यादी. कुठल्या वेळेला? मला वाटते, साधारण आठ वाजता, असे म्हणायला पाहिजे. मला वाटते, आतापर्यंत ताटल्या धुतल्या गेल्या असतील. मला वाटते, तुम्ही बोटांच्या ठशांचा विचार करत असाल, तर दुर्दैवी ठरलात.

पायरो गूढपणे हसत बोलला, “अगदी तसेच काही नाही. मला उमराव फोस्काटाईन यांच्या भुकेमध्ये रुची होती. त्याने प्रत्येक पदार्थ चाखला का?”

“हो, पण अर्थात किती खाल्ला, हे मी सांगू शकत नाही. सगळ्या ताटल्या लडबडलेल्या होत्या व आणि पदार्थ संपलेले होते. फक्त भात उरला होता. तो बराच उरला होता.”

पायरो समाधानाने म्हणाला, “आहा!”

आम्ही परत सदनिकेत आलो तेव्हा तो खालच्या स्वरात बोलला, “आपली नक्कीच चांगल्या पद्धतशीरपणाशी गाठ आहे.”

“तुला खुनी म्हणायचे आहे की उमराव फोस्काटाईन म्हणायचे आहे?”

उमराव फोस्काटाईन नक्कीच एक शिस्तीचा माणूस होता. मदत मागवल्यावर व तो आता मरणार असल्याचे त्याला समजल्यावर, त्याने काळजीपूर्वक फोन केला.”

मी पायरोकडे बघितले. त्याचे शब्द व आताच्या चौकशा यामुळे मला एक चमचमती कल्पना सुचली.

मी श्वास घेत बोललो, “तुला विषाचा संशय येतो आहे का? डोक्यावरील ठोसा हा खोटा असावा.”

पायरो फक्त हसला.

आम्ही सदनिकेत आलो, तेव्हा स्थानिक पोलीस इन्स्पेक्टर आणि दोन कॉन्स्टेबल आलेले होते. ते आम्हाला बघून थोडे धास्तावले, पण पायरोने त्याच्या स्कॉटलंड यार्डच्या मित्राचा, जापचा उल्लेख करून, आमच्यासाठी तिथे असण्याची कशीबशी परवानगी मिळवली. आम्ही सुदैवाने तिथे आलो, कारण पाच मिनिटात एक मध्यमवयीन माणूस तिथे तणतणत आला. त्याला राग आणि दुःख आवरत नव्हते.

तो ग्रेव्हज नावाचा मृत उमराव फोस्काटाईन यांचा, स्वयंपाकी व नोकर होता. त्याला सांगायची असलेली गोष्ट भावनामय होती.

आदल्या दिवशी सकाळी, दोन गृहस्थ त्याच्या मालकाला भेटायला आले होते. ते इटालियन होते. त्यातील मोठा साधारण चाळीशीचा होता. त्याने त्याचे नाव सिग्नॉर अस्कानियो सांगितले. दुसरा चांगले कपडे केलेला साधारण चोविशीचा मुलगा होता.

उमराव फोस्काटाईन त्याना भेटण्याची अपेक्षा करत होता. त्याने लगेच ग्रेव्हजला काही किरकोळ कामासाठी बाहेर पाठवले. इथे तो थांबला व पुढे सांगायला कां कू करू लागला. तरीही शेवटी त्याने कबूल केले, की तो त्यांच्या भेटीत काय होते हे जाणून घेण्यास उत्सुक असल्याने, लगेच गेला नाही. पण काही संभाषण ऐकायच्या हेतूने तिथे रेंगाळत राहिला.

संभाषण हळू आवाजात चालले होते. त्याला अपेक्षा होती, तसे काही ऐकू आले नाही. पण त्याला एवढे स्पष्टपणे समजले, की पैशाबद्दलचे काही प्रकारचे बेत चर्चिले जात होते आणि सूर धमकीवजा होता. चर्चा तशी

मित्रत्वाने चालली होती. शेवटी उमराव फोस्काटाईनचा आवाज थोडा चढला होता. त्याला हे स्पष्टपणे ऐकू आलेः

“लोकहो, मला वाद घालायला याहून जास्त वेळ नाही. जर तुम्ही आज रात्री आठ वाजता माझ्याबरोबर जेवलात, तर आपण चर्चा चालू ठेऊ.”

आपण संभाषण ऐकत असल्याचे समजले की काय या भीतीने, ग्रेव्हज मालकाने सांगितल्याप्रमाणे बाहेर पडला. रात्री बरोबर आठ वाजता अगदी वेळेवर, ते दोघे आले. जेवतांना ते वेगवेगळ्या विषयांवर बोलले --- राजकारण, हवामान आणि नाटकांचे जग. जेव्हा ग्रेव्हजने पोर्ट टेबलावर ठेवली आणि कॉफी आणली, तेव्हा त्याच्या मालकाने सांगितले, की आता त्याला संध्याकाळची सुट्टी दिली आहे.

इन्स्पेक्टरने विचारले, “पाहुणे आले, की तुला सुट्टी देण्याचा रिवाज होता का?”

“नाही सर, असा काही रिवाज नव्हता. त्यामुळे मला असे वाटले, की हे त्या लोकांबरोबर चर्चा करण्याचे, काही वेगळ्या प्रकारचे काम असावे.”

ग्रेव्हजची गोष्ट संपली. तो साडेआठला गेला. एका मित्राला भेटून त्याच्याबरोबर एड्‌गवेअर रस्त्यावरील मेट्रोपॉलिटन संगीत हॉलला गेला.

त्या दोन माणसांना जाताना कुणी बघितले नाही. पण ८:४७ ही खुनाची वेळ नक्की होती. लिहायच्या टेबलावरचे लहानसे घड्याळ फोस्काटाईनच्या हाताचा धक्का लागून ढकलले गेले होते आणि बंद पडले होते. तो वेळ मिस रायडरने केलेल्या फोनच्या वेळेशी जुळत होती.

पोलीस सर्जनने प्रेताची तपासणी केली. प्रेत आता गाडीत टाकले गेले. मी पहिल्यांदाच तो चेहरा बघितला. कांती ऑलिव्हसारखी होती. नाक लांब होते. मिरवणाऱ्या काळ्या मिशा होत्या व लाल ओठ होते. चमचमणारे पांढरे शुभ्र दात होते. अगदी आल्हादक असा चेहरा नव्हता.

इन्स्पेक्टर त्याची डायरी बंद करत बोलला, "ठीक आहे. केस स्पष्ट दिसते आहे. फक्त सिग्नॉर अस्कानियोला शोधायचे काम अवघड आहे. मला वाटते, त्याचा पत्ता मेलेल्या माणसाच्या खिशातील डायरीत असण्याची शक्यता नाही आहे, नाही का?"

पायरो म्हणाला त्याप्रमाणे, मृत फोस्काटाईन मोठ्या शिस्तीचा माणूस होता. लहानशा नीट अक्षरात त्याने लिहिले होते, "सिग्नॉर पाओलो अस्कानियो, ग्रॉसव्हेनॉर हॉटेल."

इन्स्पेक्टर फोनमध्ये गर्क होता. मग तो दात दाखवत, हसत आमच्याकडे वळला.

"अगदी वेळेवर. आपला सभ्य गृहस्थ बोट गाडीमधून कॉन्टीनेन्टलला जाण्यासाठी निघाला होता. तर आपण एवढे करू शकतो.

हे वाईट काम आहे. पण पुरेसे सरळ आहे. या दोन इटालियन पैकी एकजण रक्तपात करणारा, बहुधा जन्मजात शत्रू असणार.”

असे वरवर बोलून, आम्ही खाली गेलो. डॉक्टर हॉकर फारच उद्दीपित झाला होता. “हे एखाद्या कादंबरीच्या सुरवातीप्रमाणे आहे, नाही का? खरेच हे अतिशय उत्सुकता वाढवणारे आहे. जर असले काही वाचले असते, तर त्यावर विश्वास बसला नसता.”

पायरो काही बोलला नाही. तो विचार करत होता. सबंध संध्याकाळभर त्याने क्वचितच तोंड उघडले.

त्याच्या पाठीवर थोपटत, हॉकरने विचारले, “आमचा मुख्य गुप्तहेर काय म्हणतो आहे? यावेळेस तुझ्या करड्या पेशी काही काम करत नाहीत का?”

“असे तुला वाटते का?”

“मग काय झाले असेल?’

“हे बघ, उदाहरणार्थ, तिथे खिडकी आहे.”

“खिडकी? पण ती लावलेली होती. तिथून कुणी आतबाहेर करू शकले नसते. मी ती लक्ष देऊन बघितली होती.”

“आणि तुझे लक्ष तिथे का गेले?”

डॉक्टर कोड्यात पडला. पायरोने स्पष्टीकरणाची घाई केली. "मी पडद्यांबद्दल बोलतो आहे. ते ओढलेले नव्हते. ते थोडे विचित्र होते. आणि मग तिथे कॉफी होती. ती फार काळी होती."

"ठीक आहे, त्याचे काय?"

पायरो परत म्हणाला, "फार काळी, त्याच्याबरोबर आपण हे आठवूया की भात अगदी थोडाच खाल्ला गेला. आणि आपल्याला मिळतो आहे --- काय?"

डॉक्टर हसत म्हणाला, "चंद्रप्रकाश. तू हा विनोद नसल्याचे भासवतो आहेस."

"मी कधीच असे भासवत नाही. या हेस्टीग्जला माहिती आहे, मी खूप गंभीर आहे."

मी कबूल केले, "तुला काय म्हणायचे आहे, मला समजत नाही. तुला नोकराचा संशय नाही का? की आहे? तो त्या गँगबरोबर असेल. आणि त्याने कॉफीत काही अंमली पदार्थ घातला असेल. मला वाटते, ते त्याचा पुरावा घेतील का?"

"माझ्या मित्रा, नक्कीच घेतील. पण मला सिग्नॉर अस्कानियो च्या पुराव्यात जास्त रुची आहे."

"तुला वाटते, त्याच्याकडे काही पुरावा असेल?"

“मला तीच काळजी आहे. मला खात्री आहे, की त्याबद्दल लवकरच आपल्या डोक्यात प्रकाश पडेल.”

दैनिक न्यूजमॉन्गरने आम्हाला येणाऱ्या घटनांशी सुसंगत रहाण्यासाठी भाग पाडले.

सिग्नॉर अस्कानियोला उमराव फोस्काटाईनच्या खुनाच्या आरोपा खाली अटक झाली, तेव्हा त्याने फोस्काटाईनला आपण ओळखत नसल्याचे सांगितले. तो रीजेन्ट कोर्टाकडे कधीच गेला नव्हता व खुनाच्या दिवशी संध्याकाळी नाही किंवा आदल्या दिवशी सकाळीही नाही. त्याच्याबरोबरचा दुसरा माणूस तर बेपत्ताच होता. सिग्नॉर अस्कानियो खुनापूर्वी दोन दिवस एकटाच ग्रॉसव्हेनॉर हॉटेलमध्ये कॉन्टीनेन्टलहून आला होता. दुसऱ्या माणसाला शोधायचे सर्व प्रयत्न फुकट गेले.

तरीही अस्कानियोला कोर्टात सुनावणीसाठी पाठवले गेले नाही. पोलीस कोर्टात इटालियन राजदूताने येऊन, त्याच्या अधिकारात अस्कानियोची तपासणी केली. संध्याकाळी आठ ते नऊ अस्कानियो दूतावासात त्याच्याबरोबर होता. कैद्याला सोडून देण्यात आले. त्यामुळे बऱ्याच लोकांना वाटले, की गुन्हा राजकीय होता आणि मुद्दाम दाबला गेला.

पायरोने या सर्व बाबींमध्ये खूप रस घेतला. तथापि मला आश्चर्य वाटले, जेव्हा त्याने एका सकाळी मला अचानक कळवले, की त्याच्याकडे अकरा वाजता भेटायला एकजण येणार आहे आणि तो अस्कानियो होता.

“त्याला तुझा सल्ला हवा आहे?”

“हेस्टीग्ज, तसे मुळीच नाही. मला त्याला सल्ला द्यायचा आहे.”

“कशाबद्दल?”

“रीजेन्ट कोर्ट खुनाबद्दल.”

“तो त्याने केला, असे तू सिद्ध करणार आहेस का?”

“एका खुनाकरता, माणसाला दोनदा कोर्टात खेचता येत नाही. हेस्टीग्ज, सर्वसाधारण अक्कल वापर. ओहो, आपल्या मित्राचा फोन आला आहे.”

काही मिनिटाने सिग्नॉर अस्कानियो आला --- --- नजर चोरणारे, डोळ्यातील भावांचा थांगपत्ता लागू न देणारे डोळे असलेला, एक लहानसा बारीक माणूस. तो आमच्या दोघांकडे संशयाने नजर टाकत उभा राहिला.

“मिस्टर पायरो?” माझ्या लहानशा मित्राने स्वतःच्या छातीवर हळूवारपणे थोपटले.

“सिग्नॉर, बसा. तुम्हाला माझी चिठ्ठी मिळाली. मी या रहस्याच्या मुळाशी जायचे ठरवले आहे. तुम्ही मला काही किरकोळ बाबतीत मदत करू शकता. आपण सुरवात करू. तुम्ही --- एका मित्राबरोबर कैलासवासी उमराव फोस्काटाईनला मंगळवारी, नऊ तारखेच्या सकाळी भेटलात --- “

त्या इटालियनने रागाने पाहिले. “मी असे काही केले नाही. हे मी कोर्टात सांगितले आहे --- “

“अगदी नक्की --- माझी अशी कल्पना आहे की, तुम्ही कोर्टात खोटे सांगितलेत.”

“तुम्ही मला धमकावत आहात? मला तुमच्यापासून काही भीती नाही. मला निरपराधी म्हणून सोडून देण्यात आलेले आहे.”

“बरोबर आहे. आणि त्यामुळे मी मूर्ख माणूस आहे. मी तुम्हाला फाशीसाठी धमकावत नाही आहे --- पण प्रसिद्धीसाठी. प्रसिद्धी! मला दिसते आहे, की तुम्हाला बोललेले आवडत नाही. तुम्हाला माहिती नसलेली एक कल्पना माझ्याकडे आहे. माझ्या लहानशा कल्पना माझ्यासाठी खूप मूल्यवान आहेत. सिग्नॉर, माझ्याबरोबर मोकळेपणे बोलायची तुम्हाला संधी आहे. मी तुम्हाला हे विचारत नाही, की कोणाच्या चुकीच्या सांगण्यावरून, तुम्ही इंग्लंडला आलात. मला एवढेच माहिती आहे, की तुम्ही उमराव फोस्काटाईनला खास भेटण्यासाठी आलात.”

इटालियन ओरडला, “तो उमराव नव्हता.”

“मी आधीच लक्षात घेतले आहे, की त्याचे नाव युरोपमधील उमरावांच्या यादीत नाही आहे. तसे असू दे. उमराव हा किताब साधारणपणे ब्लॅकमेलिंगच्या व्यवसायात उपयोगी पडते.”

“मला वाटते, मीदेखील मोकळेपणे बोलावे. तुम्हाला बरेच काही माहिती आहे, असे दिसते.”

“मी माझ्या करड्या पेशींना कामाला लावले आहे. सिग्नॉर अस्कानियो, तुम्ही मृत माणसाला मंगळवारी सकाळी भेटलात --- बरोबर?”

“हो, पण मी तिथे संध्याकाळी कधीच गेलो नाही. तशी गरज नव्हती. मी तुम्हाला सगळे सांगतो. इटालीमध्ये मोठ्या पदावर असलेल्या एका माणसाची माहिती या लबाडाच्या कानावर आली. त्याने महत्वाच्या कागदपत्रांसाठी मोठ्या रकमेची मागणी केली. मी या प्रकरणाचा निकाल लावण्यासाठी इंग्लंडला आलो. मी त्याच्याशी भेटीची वेळ ठरवून त्याला सकाळी बोलावले. दूतावासातील एक तरुण सचिव माझ्याबरोबर होता. मला वाटले होते, त्यापेक्षा तो उमराव बराच बरा निघाला. तरीही मी त्याला दिलेली एकंदर रक्कम चांगलीच मोठी होती.”

“ती कुठल्या स्वरूपात दिली गेली?”

लहान इटालियन नोटांच्या स्वरूपात. मी ती रक्कम तिथल्या तिथे दिली. त्याने मला ती महत्वाची कागदपत्रे दिली. नंतर मी कधीच त्याला पाहिले नाही.”

“तुम्हाला अटक केली, तेव्हा तुम्ही हे सगळे का सांगितले नाहीत?”

“माझ्या नाजूक पदाला अनुसरून, मला त्या माणसाबरोबर कुठल्याही प्रकारचे संबंध असल्याचे जाहीर करणे, शक्य नव्हते.”

“मग तुम्ही त्या संध्याकाळी काय घडले, ते कसे सांगितले?”

“मला फक्त वाटले, की मला मुद्दाम होऊन कुणी, मी नको ते काही करत असल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला. मला समजले की सदनिकेत काही पैसे सापडले नाहीत.”

पायरोने त्याच्याकडे बघून डोके हलवले. तो पुटपुटला, ‘हे विचित्र आहे. आपल्या सगळयांच्या मेंदूत करड्या पेशी आहेत. आणि काहीजणांना त्या कशा वापरायच्या ते माहिती असते. मी तुमच्या गोष्टीवर विश्वास ठेवतो. सिग्नॉर अस्कानियो, शुभ प्रभात. ती मी कल्पना केली होती, तशीच आहे. पण मला खात्री करायची होती.”

त्याच्या पाहुण्याला निरोप दिल्यावर, पायरो त्याच्या हाताच्या खुर्चीत परत बसला व माझ्याकडे बघून हसला.

“आता आपण मिस्टर ले कॅपीटेन हेस्टीग्जचे काय म्हणणे आहे, ते ऐकू.”

“मला वाटते, अस्कानियोचे बरोबर आहे --- कोणीतरी त्याला बदनाम करायचा प्रयत्न केला.”

“हेस्टीग्ज, देवाने तुला दिलेला मेंदू तू कधी कधी म्हणून वापरत नाहीस. त्या रात्री सदनिकेतून बाहेर पडल्यावर मी काय बोललो, ते आठव. मी खिडकीच्या पडद्यांबद्दल --- ते ओढलेले नसल्याबद्दल बोललो. आता जून चालू आहे. अजून आठ वाजेपर्यंत बाहेर उजेड आहे. साडेआठपर्यंत तो असेल. याचा काही अर्थ तुझ्या लक्षात येतो आहे का? मला खूप विचार

केल्यावर असे वाटले, की केव्हातरी तुला हे समजेल. आता आपण पुढे बघू. मी म्हणालो त्याप्रमाणे, कॉफी खूप काळी होती. उमराव फोस्काटाईनचे दात खूप पांढरे होते. कॉफी दातांवर डाग पाडते. आपण यावरून निष्कर्ष काढू शकतो, की त्याने ती अजिबात प्यायली नाही. तरीही तिन्ही कपांमध्ये कॉफी होती. उमराव फोस्काटाईनने कॉफी प्यायलेली नसतांना कुणी तसा आभास का निर्माण करावा?"

मी घाबरून माझे डोके हलवले.

"चल मी तुला मदत करतो. त्यादिवशी रात्री सदनिकेत ते दोघे किंवा त्यांच्यासारखे कुणी दोघे आले होते, याबद्दल आपल्याकडे काय पुरावा आहे? कोणीही त्यांना आत शिरतांना किंवा बाहेर पडतांना पाहिले नाही. आपल्याकडे एका माणसाचा आणि निर्जीव वस्तूंच्या यजमानाचा पुरावा आहे.

"म्हणजे?"

"म्हणजे काटे, चमचे, ताटल्या. पण ती हुशार युक्ती होती! ग्रेव्हज लबाड चोर आहे. पण काय नामी बेत आहे! तो सकाळच्या संभाषणातील काही भाग चोरून ऐकतो. तेवढ्यावरून तो अंदाज बांधतो, की अस्कानियो स्पष्ट करायला अवघड, अशा विचित्र परिस्थितीत सापडू शकतो. नंतरच्या संध्याकाळी आठ वाजता, तो त्याच्या मालकाला सांगतो, की त्याला फोन आला आहे. फोस्काटाईन बसतो व हात पसरून, फोन घेतो. त्याच वेळी ग्रेव्हज त्याला मागून संगमरवरी पुतळ्याने डोक्यात जोराचा फटका मारतो.

नंतर झटकन फोनवरून तिघांसाठी जेवण मागवतो. ते येते. तो तिघांसाठी टेबलावर, खरकट्या ताटल्या, सुऱ्या, काटे इत्यादी मांडतो. पण त्याला अन्न संपलेले पण दाखवायचे असते. तो नुसते डोकेच वापरत नाही. त्याच्याकडे हेतू साध्य करण्यासाठी, वखवखलेले पोटही आहे! पण सगळे संपवणे त्याला शक्य नसते. तिघे जेवल्याचा खोटा आभास निर्माण करण्यासाठी, तो एक सिगार व दोन सिगरेटीदेखील ओढतो. आहा, इतका सगळा बनाव तो पूर्णत्वाला नेतो. मग घड्याळाचे काटे ८:४७ वर आणून त्याची तोडफोड करून, ते बंद पाडतो. एक गोष्ट तो करत नाही, ती म्हणजे पडदे ओढणे. पण तिथे खरेच जेवणाची मेजवानी झाली असती, तर बाहेरचा उजेड कमी झाल्याबरोबर पडदे ओढले गेले असते. मग तो घाईने बाहेर पडतो. लिफ्ट चालवणाऱ्या माणसाला पाहुण्यांबद्दल सांगतो व टेलिफोन करायला जातो. आणि जवळजवळ ८:४७ ला डॉक्टरना त्याच्या मालकाच्या मरणांतिक आवाजात फोन करतो. त्याची कारवाई इतकी यशस्वी होते, की तो फोन अकरा क्रमांकाच्या सदनिकेतून केला गेला नसल्याचे कुणाच्या लक्षात येत नाही.”

मी फसवेपणे म्हणतो, “मला वाटते, हर्क्युल पायरोशिवाय?”

माझा मित्र हसत म्हणाला, “हर्क्युल पायरोच्याही नाही. मी आता चौकशी करायच्या विचारात होतो. मला आधी माझे म्हणणे तुला समजावून सांगायचे होते. पण तू बघशील, माझे बरोबर होते. आणि मग जापचे. त्याला

मी आधीच सूचना दिली होती, की त्याने माननीय ग्रेव्हजला अटक करावी. मला नवल वाटते, त्याने किती पैसे खर्च केले असतील.”

पायरो बरोबर होता. तो नेहमीच असतो. तो नेहमीच सगळ्याना नवल करायला लावतो!

DOUBLE SIN

# दुहेरी पाप



मी माझा मित्र पायरोच्या खोलीत आलो. पण दुर्दैवाने, तो कामात बुडालेला होता. जिची बांगडी किंवा पाळलेला कुत्रा हरवला आहे, अशी प्रत्येक श्रीमंत बाई थोर हर्क्युल पायरोची सेवा घेऊ बघत असल्यामुळे, तो फार रागावला होता. माझा थोर मित्र फ्लेमिश [ बेल्जियमची भाषा ] आर्थिक सुसूत्रतेचे व कलात्मक जाणीवेचे विचित्र मिश्रण असलेला होता. फ्लेमिश आर्थिक सुसूत्रतेचा मुख्य वाटा असलेल्या केसेसमध्ये त्याला अगदी कमी रस असूनही, त्याने त्या सोडवायला घेतल्या होत्या. ज्यात अगदी थोडी किंवा काहीच पैशांची प्राप्ती नाही अशा केसेस, त्याने केवळ

त्यात स्वारस्य वाटल्यामुळे घेतल्या होत्या. त्याचा परिणाम म्हणून, मी म्हणतो तसे, तो अती श्रम करत होता. ते त्यानेही कबूल केले होते. त्यामुळे इबेरमाउथ येथील प्रसिद्ध साउथ कोसर रीसॉर्टमध्ये त्याला माझ्याबरोबर आठवड्याची सुट्टी घालवण्यासाठी तयार करायला मला फारसा त्रास पडला नाही.

पायरोला दिलेले खुले आमंत्रण स्विकारून, तो आला आणि आम्ही ठरवल्याप्रमाणे चार दिवस घालवले.

”माझ्या मित्रा, तुला नाटकसिनेमाशी संबंधित दलाल असलेला माझा मित्र जोसेफ आरोन्स आठवतो का?”

क्षणभर विचार करून मी होकार दिला. पायरोला इतक्या विविध प्रकारचे व अनेक मित्र आहेत, की मी त्यांना झाडूवाल्यापासून ते उमरावांपर्यंत आठवून पाहिले.

“ठीक आहे हेस्टीग्ज, जोसेफ आरोन्स चारलॉक खाडीला असतो. तो फारसा बरा नाही आणि एक लहानसे प्रकरण त्याला त्रास देते आहे. त्याने मला त्याच्याकडे येण्याची विनंती केली आहे. माझ्या मित्रा, मला असे वाटते, की मी त्याच्या विनंतीला मान द्यायला पाहिजे. तो माझा विश्वासू व चांगला मित्र आहे. त्याने मागे मला खूप मदत केली आहे.”

मी बोललो, "तू म्हणत असशील, तर आपण नक्कीच तिकडे जाऊ. माझ्या माहितीप्रमाणे चारलॉक खाडी ही सुंदर जागा आहे आणि मी आजपर्यंत कधी तिथे गेलो नाही."

पायरो म्हणाला, "मग आपण काम आणि आनंद यांची सांगड घालू. तू गाड्यांची चौकशी करशील का?"

मी वैताग आल्यासारखे म्हणालो, "यामुळे वरील दोन्हीशिवाय बदलदेखील मिळेल. तुला माहिती आहे का, की हे देश ओलांडायचे अंतर किती आहे. दक्षिण डेव्होन किनाऱ्यापासून उत्तर डेव्होन किनाऱ्यापर्यंत जाणे हा कधीकधी एक दिवसाचा प्रवास असतो."

पण चौकशी केल्यावर मला समजले, की हा प्रवास फक्त एकदा एक्झेटरला गाडी बदलून करता येतो. मी घाईने पायरोकडे येऊन, त्याला हे सांगायला जात असतांना, मी जलद मोटारींच्या कार्यालयावरून जात होतो. मी अशी पाटी लिहिलेली पाहिली, कीः

उद्या ८.३० ला डेव्होनमधील मोहक दृष्यांमधून चारलॉक खाडीपर्यंत जाणारी दिवसाभराची सहल निघणार आहे. मी थोडी चौकशी केली व आनंदाने हॉटेलवर परतलो. दुर्दैवाने, पायरोला हे पटणे अवघड असल्याचे दिसले.

"मित्रा, ही मोटारीने जाण्याची हौस कशासाठी? असे बघ, रेल्वे गाडीचे टायर फुटत नाहीत. अपघात होत नाहीत. खरे की नाही? खूप वारा

लागून त्रासही होत नाही. खिडक्या लावता येतात. आणि काही खेळ खेळायची परवानगी नसते.”

मी त्याच्या लक्षात आणून देण्याचा प्रयत्न केला, की ताजी हवा मिळालेली मोटार मला गाडीच्या प्रवासापेक्षा आवडते.

“आणि पाऊस? तुमचे इंग्लिश हवामान इतके बेभरवशाचे असते.”

छप्पर वगैरे असते की. शिवाय जर जोराचा पाऊस आला, तर सहल रद्द केली जाते.”

पायरो म्हणाला, “आहा, मग नक्की पाऊस पडणारच.”

“ठीक आहे, जर तुला तसे वाटत असेल, तर --- “

तो सुस्कारा टाकत बोलला, “नाही. नाही. माझ्या मित्रा, तसे नाही. मला असे दिसते आहे, की तुला ती सहल करायची आहे. सुदैवाने, माझ्याकडे माझा ओव्हरकोट व दोन मफलर्स आहेत. पण आपल्याला चारलॉक खाडीला पुरेसा वेळ मिळेल का?”

“म्हणजे तिकडे रात्रभर रहावे लागेल. सहल डार्टमूरला वळसा घालून जाते. आपण दुपारचे जेवण मोखाम्पटनला घेऊ. मग चारच्या सुमारास आपण चारलॉक खाडीला पोचू. परतीचा प्रवास पाचला सुरु होतो. इथे परत आपण दहाला पोचतो.

पायरो म्हणाला, “म्हणजे असे आहे तर! आणि लोक आनंदासाठी ही सहल करतात. आपल्याला अर्थात त्या बदल्यात सूट मिळेल, कारण आपण त्याच दिवशी परत येत नाही आहोत.”

“असे आपण करू, अशी शक्यता मला वाटत नाही.”

“पण आपल्याला असेच करावे लागेल.”

“पायरो, माझे ऐक. तुझा हेका चालवू नको. तुला माहिती आहे का, तू पै पै साठवत आहेस.”

“माझ्या मित्रा, हा चिक्कूपणा नाही. हा कामाचा दृष्टीकोन आहे. मी लखपती असतो, तरी मी योग्य असलेली रक्कमच भरली असती.”

पण मी पाहिले, तसा पायरो या बाबतीत मार खाणार होता.

जलद मोटारीच्या कार्यालयातील तिकिटे देणाऱ्ा माणूस शांत व स्थिर वृत्तीचा व ठाम स्वभावाचा होता. तो असे म्हणत होता, तुम्ही परतलेच पाहिजे. त्याने तर असा मुद्दा मांडला, की तुम्ही चारलॉक खाडीपासून परतणार नसाल, तर तुम्हाला जास्त पैसे पडतील.

पराभव पत्करून पायरोने त्यांनी सांगितलेले पैसे भरले व तिथून निघाला.

तो गुरगुरला, “इंग्लिश लोकांना पैशांची पर्वा नसते. हेस्टीग्ज, तू तो तरुण मनुष्य पाहिलास? त्याने पूर्ण पैसे भरले. आणि तरी त्याने मोखाम्पटनला मोटार सोडली?”

“मला वाटते, मी पाहिले नाही. खरे तर --- “

“तू आपल्या पुढील रांगेत ५ क्रमांकावर बसलेल्या तरूण सुंदर बाईकडे बघत होतास. आहा! हो, माझ्या मित्रा, मी तुला पाहिले. आणि म्हणूनच मी जेव्हा मध्यावर असलेल्या व छानपैकी सुरक्षित असलेल्या, १३ व १४ क्रमांकाच्या जागांवर बसायच्या विचारात होतो, तेव्हा तू उद्धटपणे पुढे गेलास व ३ व ४ क्रमांक बरे आहेत, असे म्हणालास.”

मी लाजत बोललो, “खरे का, पायरो?”

“तपकिरीसर लाल केस --- नेहमीच तपकिरीसर लाल केस!”

“काही झाले तरी एखाद्या विचित्र तरुण मनुष्याकडे बघण्यापेक्षा, ती नक्कीच प्रेक्षणीय होती.”

“ते दृष्टिकोनावर अवलंबून राहील. माझ्यासाठी तरुण मनुष्य जास्त रुचीपूर्ण होता.”

पायरोचा विशिष्ट प्रकारचा आवाज ऐकून, मी लगेच त्याच्याकडे पाहिले.

“का? तुला काय म्हणायचे आहे?”

“ओहो, इतका उद्दीपित होऊ नकोस. मी असे म्हणू का, की मला तो जास्त रुचीपूर्ण वाटतो, कारण तो मिशी वाढवायला बघत होता. पण ते जमले नाही.” पायरोने स्वतःच्या मोठ्या मिशा नाजूकपणे कुरवाळल्या.

तो पुटपुटला, “ही कला आहे. मिशा वाढवणाचा प्रयत्न करणाऱ्या सर्वांबद्दल मला सहानुभूती आहे.”

पायरो केव्हा गंभीर असतो आणि केव्हा तो दुसऱ्याच्या जीवावर फक्त चेष्टा करत असतो, हे जाणून घेणे अवघड असते. मी अजून काही न बोलणे पसंत केले.

दुसऱ्या दिवशीची सकाळ स्वच्छ सूर्यप्रकाशाची होती. छान तेजस्वी दिवस होता! मात्र पायरो काही संधी घेत नव्हता. त्याने लोकरीचा जड कोट, पूर्ण लांबीचा रेनकोट आणि दोन मफलर्स घातले होते. त्याशिवाय त्याचा सर्वात जाड सूट घातला होता. त्याने फ्लूपासून बचाव करणाऱ्या दोन गोळया प्रवासापूर्वी घेतल्या व बाकीच्या आत ठेऊन दिल्या.

आम्ही आमच्याबरोबर काही लहान बॅगा घेतल्या होत्या. पायरोने मला जिच्यावरून छेडले होते त्या, आम्ही आदल्या दिवशी पाहिलेल्या सुंदर बाईकडे एक लहान बॅग होती. पायरोने सहानुभूती दाखवलेल्या तरुण माणसाकडे काहीच सामान नव्हते. चारही डाग चालकाकडून दाखवले गेले आणि आम्ही आपापली जागा घेतली.

मला ताज्या हवेचे अप्रूप असल्याने पायरोने दुष्टपणे मला बाहेरची जागा दिली. आणि स्वतः गोऱ्या बाईशेजारील जागा घेतली. पण नंतर त्याने त्यात सुधारणा केली. ६ क्रमांकाच्या जागेवरील माणूस बडबड्या, बाताड्या व विनोदी पद्धतीने गंभीर चर्चा करणारा होता. पायरोने त्या बाईला खालच्या आवाजात विचारले, की तिला त्याच्याबरोबर जागा बदलायची

आहे का. ती दुवा देत तयार झाली. आणि तो बदल घडून आल्यावर, ती आमच्याशी वार्तालाप करू लागली. थोड्याच वेळात आम्ही तिघे आनंदाने गप्पा मारू लागलो.

ती बरीच तरुण होती. एकोणीसपेक्षा जास्त नव्हती आणि मुलासारखी निरागस होती. थोड्याच वेळात तिने आम्हाला तिच्या प्रवासाचे कारण सांगितले. असे दिसून आले, की ती एबेरमाउथला तिच्या जुन्या बहुमुल्य वस्तूंचे दुकान असलेल्या लांबच्या आत्याकडे काही कामानिमित्त चालली होती.

आत्याचे वडील वारल्यावर, ती फार गरीब परिस्थितीत सापडली होती. तिच्यासाठी वडिलांनी थोडे भांडवल व दुकान मागे ठेवले होते. आता तिला नव्याने व्यापार सुरु करायचा होता. काही वर्षात, तिने यशस्वीपणे व्यवसाय चालवून स्वतःचे चांगले नाव कमावले होते. ही मुलगी, मेरी डयुरांट, तिची भाची तिच्या बरोबर रहायला आणि व्यवसायातील आडाखे शिकून घ्यायला आली होती. ती त्यासाठी फार उत्सुक होती --- इतर काही करण्यापेक्षा, लहान मुलांची शिक्षिका होण्यापेक्षा / त्यांना सांभाळण्यापेक्षा, तिला हे करणे आवडणार होते.

पायरोने तिचा बेत वाखाणला व तिला पसंती दिली.

तो भाव मारत म्हणाला, "ती यशस्वी होईल, याबद्दल मला खात्री वाटते. पण मी तिला थोडासा उपदेश करेन. कोणावरही फार विश्वास टाकायचा नाही. जगात सगळीकडे चोर व भटके लोक भरलेले आहेत. इथे

या गाडीतही असे लोक असतील. प्रत्येकाने नेहमी संशयी व दक्ष असले पाहिजे.”

ती त्याच्याकडे तोंड उघडे टाकून, बघत राहिली. त्याने शहाणपणाने मान हलवली.

“हो, पण मी म्हणतो त्याप्रमाणे, कुणाला माहिती? तुझ्याशी बोलणारा मीसुद्धा वाईट परिस्थितीत असेन.”

तो तिच्या नवल वाटणाऱ्या तोंडाकडे बघून, चमकला.

आम्ही जेवणासाठी मोखाम्पटनला थांबलो. वेटरशी काही बोलून, पायरोने आम्हा तिघांकरता, मोठ्या मोकळ्या जागेबाहेर खिडकीशेजारील, एक लहानसे टेबल मिळवले. आसपासचा प्रदेश बघण्यासाठी देशातील विविध भागातून आलेल्या लोकांसाठी सुमारे वीस मोटारी उभ्या होत्या. हॉटेलची जेवणाची जागा भरली होती. बरीच गडबड ऐकू येत होती.

मी नापसंती दर्शवत म्हणालो, “एखाद्याला पूर्णपणे सुट्टीचे वातावरण वाटू शकते.”

मेरी डयुरांटने सहमती दर्शवली. “अलीकडे उन्हाळ्यात एबेरमाउथ फार खराब होत चालले आहे. माझी आत्या म्हणते, पूर्वी ते फार वेगळे होते. आता एखाद्याला गर्दीतून वाट काढणे मुश्कील आहे.”

“पण व्यवसायासाठी ते चांगले आहे.”

“पण आमच्या व्यवसायासाठी नव्हे. आम्ही फक्त किमती व दुर्मिळ वस्तू विकतो. आम्ही स्वस्त टाकाऊ वस्तु ठेवत नाही. सर्व इंग्लंडभर तर माझ्या आत्याची गिऱ्हाईके पसरलेली आहेत. जर कुणाला विशिष्ट काळातील टेबल किंवा खुर्ची हवी असेल किंवा चीनमधील एखादी वस्तु हवी असेल, तर ते तिला लिहितात आणि आज ना उद्या ती त्यांना ते मिळवून देते. असे या बाबतीत होते.”

आम्हाला त्यात स्वारस्य आहे, असे वाटल्याने, ती स्पष्ट करत गेली. एक अमेरिकन मनुष्य मिस्टर बेकर वूड असल्या वस्तुंचा जाणकार आहे. तो असल्या वस्तु गोळा करत असे. अलीकडेच बाजारात आकाराने लहान पण खूप किमती संच आला आहे. मिस एलीझाबेथ पेन --- माझी आत्या --- तिने तो विकत घेतला आहे. तिने त्याचे वर्णन करून, मिस्टर वूडना त्याची किंमत विचारली आहे. त्याने लगेच उत्तर दिले आहे. ते विकत घ्यायची तयारी दाखवली आहे. सध्या तो चारलॉक खाडीला आहे व त्याला बघण्यासाठी तो संच तिथे पाठवता येईल का, असे विचारतो आहे. मिस डयुरांटबरोबर तो संच आता चालला आहे. ती त्या दुकानाची प्रतिनिधी म्हणून काम करत आहे.

ती म्हणाली, “त्या अर्थातच छान वस्तु आहेत. पण इतके पैसे देऊन त्या कोणी विकत घेईल, असे मला वाटत नाही. त्या जलमार्गे पाठवल्या जात आहेत. मी काहीतरी चुकीचे बोलले का?. माझा घोटाळा होतो आहे.”

पायरो म्हणाला, “तुम्हाला अजून अनुभव नाही.”

मेरी दुःखाने म्हणाली, मला प्रशिक्षण मिळाले नाही. आम्हाला जुन्या अमोल वस्तूंचे महत्व सांगत वाढवले गेले नाही. मला खूप काही शिकावे लागेल.”

तिने सुस्कारा टाकला. मग अचानक मी तिचे डोळे नवल वाटून मोठे झालेले पाहिले. ती खिडकीकडे तोंड करून बसली होती. आता ती खिडकीबाहेर, नजर टाकत होती. घाईघाईने काही बोलून, ती उठली आणि जवळजवळ धावत मोटारीबाहेर गेली. काही वेळात ती धापा टाकत, क्षमायाचनेच्या भावनेने परत आली.

“असे धावत बाहेर गेल्याबद्दल, मी तुमची क्षमा मागते. पण मला वाटले एक माणूस माझी बॅग बाहेर काढतो आहे. त्यामुळे मी त्याच्यामागे धावत गेले. पण ती त्याचीच होती. ती अगदी माझ्यासारखीच होती. मला इतके मूर्खासारखे वाटले. ते तसेच दिसले असणार. मी त्याला ती चोरल्या बद्दल शिव्या देत होते.”

यावर ती हसली.

पण पायरो हसला नाही. “तो कोण मनुष्य होता? त्याचे वर्णन कर.”

त्याने तपकिरी सूट घातला होता. तो बारीक, दुर्बळ, लहानशा मिशा असलेला मनुष्य होता.”

पायरो बोलला, “आहा, हेस्टीग्ज, आपला कालचा मित्र. मिस डयुरांट, तुम्हाला तो माहिती आहे का? तुम्ही त्याला पूर्वी पाहिले आहे का?”

“नाही, कधीच नाही, का?”

“काही नाही. जरा विचित्र वाटले, एवढेच.”

तो गप्प झाला. पुढील संभाषणात त्याने भाग घेतला नाही. फक्त मिस डयुरांट काही बोलली, तेव्हा त्याचे लक्ष वेधले गेले.

“मिस डयुरांट, तुम्ही काय म्हणालात?”

“मी म्हणाले, की माझ्या परतीच्या प्रवासात, तुम्ही म्हणता तसे चोर व भटक्या लोकांपासून मला सावध राहिले पाहिजे. माझा विश्वास आहे की मिस्टर वूड नेहमी रोख पैसे देतात. जर माझ्याकडे पाचशे पौंडाच्या नोटा असतील, तर मला चोरांपासून भीती आहे.”

ती हसली पण पायरोने काही प्रत्युत्तर दिले नाही. त्याऐवजी त्याने तिला विचारले की तिने चारलॉक खाडीला कुठल्या हॉटेलात रहायचे ठरवले आहे.”

“अँकर हॉटेल. ते लहान असून महाग नाही, पण चांगले आहे.”

पायरो म्हणाला, “अँकर हॉटेल तर. म्हणजे हेस्टीग्जने ठरवलेलेच हॉटेल. किती योगायोग!”

त्याने माझ्याकडे डोळे मिचकावून पाहिले.

मेरीने विचारले, “तुम्ही तिथे खूप दिवस रहाणार आहात का?”

“फक्त एक रात्र. मला तिथे काम आहे. मला खात्री आहे, की माझा व्यवसाय काय आहे, याचा तुम्ही अंदाज करू शकणार नाही.”

मेरीने अनेक शक्यता आजमावून पाहिल्या आणि त्याने त्या फेटाळून लावल्या --- बहुतेक काळजीने असे केले असावे. शेवटी ती अडखळत, अशा निष्कर्षाला पोचली, की पायरो जादुगार असावा. त्यामुळे त्यांचे खूप मनोरंजन झाले.

तो नाटकीपणे पुढे वाकून शब्दांवर जोर देत म्हणाला, “आहा! काय कल्पना आहे! नाही. मी जादुगाराच्या उलट आहे. तो गोष्टी अदृष्य करतो. मी हरवलेल्या गोष्टी परत आणतो. हे गुपित आहे. पण मी तुम्हाला सांगतो, मी गुप्तहेर आहे.”

त्याने घडवलेल्या परिणामाकडे खूष होऊन बघत, तो खुर्चीत मागे रेलून बसला. मेरी वाचा बंद पडल्यासारखी अवाक् होऊन त्याच्याकडे बघत राहिली. पण पुढे काही संभाषण झाले नाही. कारण मोटारीचा व इतर वाहनांचे भोंगे कर्कश आवाजात वाजत होते. बेसूर आवाजात ओरडून रस्त्यावरील लोक राक्षसासारखे पुढे सरकत होते. .

पायरो आणि मी दोघे बाहेर गेलो आणि जेवणाच्या वेळी आमच्याबरोबर असणाऱ्या मुलीच्या गोडव्याबद्दल मी शेरेबाजी केली. पायरोने ती मान्य करत म्हटले,

“हो, ती गोड आहे, पण जरा मूर्खदेखील आहे?”

“मूर्ख?”

“फार रागाऊ नकोस. ती मुलगी सुंदर असेल आणि तिचे केस तपकिरीसर लाल असतील. तरीही ती मूर्ख असू शकते. कुठल्याही दोन परक्या इसमांना विश्वासात घेणे, हे तिने केले आहे.”

“तिला आपण चांगले वाटलो असू.”

“हे मूर्खपणाचे आहे. माझ्या मित्रा, जेव्हा तू असे म्हणतोस, ज्याला स्वतःचे काम करता येते --- तो आपोआप चांगला वाटतो. तिच्याकडे परततांना पाचशे पौंड असतील व कुणी चोर ते लंपास करायला बघतील, असे ती म्हणाली. पण तिच्याकडे आताही पाचशे पौंड आहेत.”

“वस्तुंच्या स्वरूपात?”

“बरोबर. आणि एक काय किंवा दुसरा काय, त्यांच्यात फारसा फरक नसतो.”

“पण आपण सोडून कुणालाच ते माहिती नाही आहे.”

“पण वेटर आणि पुढच्या टेबलावरील लोक. आणि अर्थातच एबेरमाउथमधील खूप लोक. मिस डयुरांट सुंदर आहे. पण मी जर एलिझाबेथ पेन असतो, तर मी माझ्या नवीन सहकाऱ्याला प्रथम सामान्यज्ञान दिले असते.” तो थांबला व वेगळ्या आवाजात बोलला, “माझ्या मित्रा, तुला माहिती आहे, की आपण जेवायला गेलेलो असतांना,

स्थलदर्शनाच्या बसमधून एक बॅग लंपास करणे, ही जगातील सर्वात सोपी गोष्ट आहे.”

“ओहो, पायरो, थांब कोणीतरी बघेल.”

“आणि ते काय बघतील? कोणीतरी सामान काढत आहे. ते अगदी उघडउघड केले जाईल. आणि कोणीच विरोध करणार नाही.”

“पायरो, तुला असे म्हणायचे आहे का, की --- तू सूचित करतो आहेस का --- पण तो तपकिरी सुटातील माणूस --- त्याची स्वतःची ती बॅग होती?”

पायरो हसला. “असे दिसते आहे. तरीही ते चौकस आहे. हेस्टीग्ज, मोटार मोखाम्पटनला आली, तेव्हा त्याने लगेच ती काढायला नको होती. तुझ्या लक्षात आले का, त्याने इथे जेवण केले नाही.”

मी सावकाश म्हणालो, “जर मिस डयुरांट खिडकीशेजारी बसली नसती, तर तिला तो दिसला नसता.”

पायरो म्हणाला, “आणि जर ती त्याची स्वतःची बॅग असती, तर मग काही प्रश्न नव्हता. मित्रा, आपण तो विचार डोक्यातून काढून टाकू.”

तथापि जेव्हा आम्ही परत आमच्या जागेवर येऊन बसलो, आणि जेव्हा वाहनाने वेग घेतला, तेव्हा त्याने परत अंदाज चुकल्यामुळे उद्भवणाऱ्या धोक्यांबद्दल मेरीला उपदेशाचे डोस पाजायची संधी घेतली. तो तिने शांतपणे, पण एखादा विनोद असल्यासारखा ऐकून घेतला.

आम्ही चार वाजता, चारलॉक खाडीला पोचलो आणि सुदैवाने आम्हाला अँकर हॉटेलमध्ये जागा मिळाली --- एका रस्त्यावरील कडेचे छान जुन्या जमान्यातील हॉटेल.

पायरोने लागणारे काही सामान बाहेर काढले. जोसेफ आरोन्सला भेटायला जायचे म्हणून, तो मिशीला थोडे पोमेड चोपडत होता, तेव्हा दारावर रानटीपणे टकटक झाली. मी म्हणालो, “आत या.” आश्चर्याची गोष्ट म्हणजे मेरी आत आली. तिचा चेहरा पांढरा फटक पडला होता आणि डोळ्यात अश्रू उभे राहिले होते.

“मी तुमची माफी मागते, पण सर्वात भयानक गोष्ट झाली आहे. तुम्ही गुप्तहेर असल्याचे तुम्ही म्हणाला होतात?”

“काय झाले?”

“मी माझी बॅग उघडली. त्यात मगरीच्या कातडीची बंद पेटी होती. अर्थात आता बघा!”

तिने लहान चौकोनी आकाराची मगरीच्या कातडीची पेटी उघडली. झाकण सैल होते. पायरोने ती तिच्याकडून घेतली. त्याला जोर लावला गेला होता. फार जोर लावला गेलेला दिसत होता. खूप शक्ती लावली असणार. पायरोने ती तपासून मान हलवली.

आम्हाला उत्तर माहिती असून, त्याने विचारले, “ती वस्तु?”

“गेली. चोरली गेली. ओहो, आता मी काय करू?”

मी म्हणालो, “माझा मित्र हर्क्युल पायरो आहे तू नक्कीच त्याचे नाव ऐकले असशील. जर कोणी चोरी केली असेल, तर तो ती शोधून काढेल.

”मिस्टर पायरो. थोर मिस्टर पायरो.”

तिच्या आवाजात तिने त्याला पुरेसा मान दिल्याने, पायरो खूष झाला. शिवाय तसे होण्यासाठी त्याच्याकडे पुरेसा अभिमानही होता. तो म्हणाला, “अग मुली, मी आहे ना! तू तुझे हे लहानसे प्रकरण माझ्या हातात सोपव. मी जे करता येईल, ते करतो. पण मला भीती आहे --- फार भीती आहे --- की यासाठी फार उशीर झाला नसेल. मला सांग, तुझ्या बॅगेचे कुलूप उचकटायचा प्रयत्न झाल्याचे दिसते आहे का?”

तिने मान हलवली.

“कृपया मला बघू दे.”

आम्ही एकत्र तिच्या खोलीत गेलो. पायरोने बॅग नीट तपासली. ती किल्लीने उघडल्याचे दिसत होते.

“हे अगदी साधे आहे. या असल्या बॅगांची कुलूपे साधारणपणे सारखीच असतात. ठीक आहे. आपण लवकरात लवकर पोलिसांना फोन करू. आणि मिस्टर बेकर वूडनादेखील फोन करू. मी स्वतः ते करतो.”

मी त्याच्याबरोबर गेलो. मी त्याला विचारले, फार उशीर झाला नसेल, म्हणजे काय? “अरे मित्रा, मी आजच म्हणालो, की मी जादुगाराच्या विरुद्ध आहे. मी मी हरवलेल्या गोष्टी परत आणतो --- पण समजा

माझ्याबरोबर आधीच कुणी असेल --- तुला समजले नाही? एका मिनिटात समजेल."

तो फोनच्या केबिनमध्ये अदृष्य झाला. पाच मिनियाने तो बाहेर आला. त्याचा चेहरा थंड दिसत होता. "मला भीती वाटत होती, तसेच झाले. एका बाईने अर्ध्या तासापूर्वी मिस्टर वूडना फोन करून त्या वस्तूबद्दल विचारले होते. ती मिस एलिझाबेथ पेनकडून आल्याचे म्हणत होती. त्याला आनंद झाला आणि त्याने तिला पैसे दिले."

"अर्ध्या तासापूर्वी म्हणजे आपण इथे पोचण्यापूर्वी."

पायरो थोडा चमत्कारिकपणे हसला. "जलद गाड्या फार जलद धावतात. पण मोखाम्पटनहून निघालीली जलद मोटार इथे निदान एक तास आधी आली असणार."

"आता तू काय करणार?"

"हेस्टीग्ज --- नेहमी व्यवहारी असावे. आपण पोलिसांना कळवू. मिस डयुरांटसाठी जे करता येईल, ते आपण करू. आणि --- हो, मला वाटते, आपण मिस्टर वूडला भेटू."

आम्ही तसे केले. तिची आत्या तिला दोष देईल म्हणून, बिचारी मेरी फार निराश झाली होती.

मिस्टर वूड जिथे रहात होते त्या सिसाइड हॉटेलच्या वाटेवर आम्ही असतांना पायरो म्हणाला, "कदाचित ती तसे करेल. आणि तो बरोबर न्याय

ठरेल. पाचशे पौंडाचा माल बॅगेत सोडून जेवायला जाणे! मित्रा, या केसचे एकदोन चौकस मुद्दे आहेत. ती पेटी बळजबरीने का उघडली गेली?"

"ती वस्तू बाहेर काढण्यासाठी."

'पण तो मूर्खपणा नव्हता का? आपण जेवत असतांना चोराचा सामानावर डोळा होता. स्वतःचे सामान काढायच्या नावाखाली, तो हे करत होता. बॅग उघडणे व त्या पेटीतील संच स्वतःच्या ताब्यात घेऊन बाजूला होणे, हे सोपे होते.

त्या पेटीत ती वस्तु आहे की नाही, हे त्याला बघायचे असेल. आपण मिस्टर वूडच्या सदनिकेत शिरताशिरता आम्हाला अजून चर्चा करायला वेळ नव्हता.

मला तत्क्षणी मिस्टर बेकर वूड आवडेनासा झाला.

तो मोठा नीतिभ्रष्ट माणूस वाटत होता. त्याने फार भपकेबाज कपडे करून, एका हिऱ्याची अंगठी घातली होती. तो फार आरडाओरडा करणारा होता.

अर्थात त्याला काही चुकीचे होत असल्याचा, संशय आला नाही. का येईल? त्या बाईने त्याला वस्तु आणल्याचे सांगून ती दाखवली. ती छानच होती. त्याने कुठल्या क्रमांकाच्या नोटा दिल्या? नाही. ते त्याला माहिती नसेल. आणि त्याला सगळे प्रश्न विचारत येणारा मिस्टर पायरो कोण होता?

“मिस्टर, मी तुम्हाला एक गोष्ट सोडून, अजून काही विचारणार नाही. ती गोष्ट म्हणजे तुमच्याकडे आलेल्या बाईचे वर्णन. ती तरुण व सुंदर होती का?”

“नाही सर, ती तशी नव्हती. मुळीच नव्हती. उंच, मध्यमवयीन, करडे केस, थोड्या मिशा फुटू लागलेली, अशी ती होती. धोक्याची घंटा? पण तुमच्या जीवाला नाही.”

आम्ही निघाल्यावर मी ओरडलो, पायरो, तू ऐकलेस? मिशा!”

“हेस्टीग्ज, मला कान आहेत.”

“पण काय नकोसा मनुष्य आहे!”

“त्याची वागायची पद्धत गोडीगुलाबीची नाही.”

मी बोललो, “आपल्याला त्या चोराला पकडायला हवे. आपण त्याला ओळखू शकू.”

“हेस्टीग्ज, तू इतका निरागसपणा दाखवतोस. तुला पुरावा नावाची गोष्ट असते, हे माहिती नाही का?”

“तुला असे वाटते, की त्याच्याकडे पुरावा असेल?”

पायरोने अनपेक्षित असे उत्तर दिले. “असेल, असे मला गंभीरपणे वाटते.”

मी म्हणालो, “तुझा असा त्रास आहे, की तुला गोष्टी कठीण करायला आवडतात.”

“अरे मित्रा, बरोबर आहे. मला आवडत नाही --- कसे बर सांगावे --- बसलेला पक्षी मला आवडत नाही!” पायरोचा पक्षी भरारी घेऊ लागला.

पायरोच्या भविष्यवाणीला पुरेपूर न्याय मिळाला. आमच्याबरोबर प्रवास करणारा तपकिरी सुटातील आमचा सहप्रवासी मिस्टर नॉरटॉन केन निघाला. मोखाम्पटनला तो सरळ जॉर्ज हॉटेलमध्ये गेला आणि तिथे दुपारभर होता. त्याच्याविरुद्धचा एकमेव पुरावा असा होता, की मिस डयुरांटने त्याला जेवणाच्या वेळी त्याला सामान बाहेर काढतांना बघितले होते.

पायरो ध्यान करत म्हणाला, “ते काही संशयास्पद कृत्य नव्हते.”

त्यानंतर तो शांत झाला. अजून पुढे काही चर्चा करायला, त्याने नकार दिला. मी त्याला टोचले, तेव्हा तो म्हणाला, की तो मिशांबद्दल असाच आपला विचार करत होता. आणि मी सुद्धा तसेच करावे, असे त्याचे म्हणणे होते.

तथापि, मी शोधून काढले, की त्याने संध्याकाळ त्याच्याबरोबर काढलेल्या जोसेफ आरोन्सला सांगितले --- की त्याने त्याला मिस्टर बेकर वूडबद्दल इत्यंभूत माहिती द्यावी. दोघेही एकाच हॉटेलात रहात असल्याने, इकडची तिकडची माहिती गोळा करणे शक्य होते. पण पायरोला जे कळले, ते त्याने त्याच्यापाशीच ठेवले.

मेरी डयुरांटने पोलिसांना अनेक मुलाखती दिल्यावर, ती सकाळी लवकरच्या गाडीने इबेरमाउथला परतली. आम्ही जोसेफबरोबर जेवलो. त्यानंतर पायरोने जाहीर केले, की त्याने जोसेफची समस्या समाधानकारकपणे सोडवली आहे. त्यामुळे आता आपण पाहिजे तेव्हा, इबेरमाउथला जाऊ शकतो. "पण मित्रा, रस्त्याने नव्हे. यावेळेस आपण रेल्वेने जाऊ."

"तुला पाकीट चोरीला जायची भीती वाटते का? की पुन्हा एकदा अडचणीत असलेली तरूणी भेटायची भीती वाटते?"

"हेस्टीग्ज, ही दोन्ही प्रकरणे, माझ्यावर गाडीतही चालून येऊ शकली असती. नाही. मला इबेरमाउथला परतण्याची घाई आहे. कारण आपली केस अजून सोडवायची आहे."

"आपली केस?"

"पण हो, माझ्या मित्रा, मिस मेरीने मला तिला मदत करायची विनंती केली आहे. कारण आता ती केस पोलिसांच्या हातात आहे. पण याचा अर्थ मी ती सोडून दिली आहे, असे नाही. मी इथे आलो कारण जोसेफ माझा जुना मित्र होता. पण असे कुणी म्हणायला नको, की हर्क्युल पायरोने कुणा अनोळखी व्यक्तीला, तिला गरज असतांना, वाऱ्यावर सोडून दिले." तो दिखाऊपणे ताठ उभा राहिला.

मी अहंपणे बोललो, “मला वाटले, तुला त्यापूर्वी स्वारस्य होते. मोटारींच्या कार्यालयात, जेव्हा पहिल्यांदा तू त्या तरुणाला पाहिलेस, तेव्हा नेमके कुठल्या कारणाने त्याने तुझे लक्ष वेधून घेतले, हे मला माहिती नाही.”

“हेस्टीग्ज, तुला माहिती नाही? तुला माहिती हवे होते, ठीक आहे. ते माझे गुपित म्हणूनच राहिले पाहिजे.”

तिथून निघण्यापूर्वी, ती केस बघणाऱ्या पोलीस इन्स्पेक्टरबरोबर आमचे थोडा वेळ संभाषण झाले. त्याने मिस्टर नॉरटॉन केनची मुलाखत घेतली होती आणि पायरोला विश्वासात घेऊन सांगितले होते, की त्या तरुणाची वागायची पद्धत त्याला काही बरी वाटली नव्हती. त्याने गोष्टी नाकारल्या होत्या. धमक्या दिल्या होत्या आणि तो विरोधभासात्मक बोलत होता.

त्याने कबुली दिली, “पण ती युक्ती कशी काय केली गेली, ते मला माहिती नाही. त्याने एका सरकारी माणसाच्या हातात तो माल दिला आणि तो घेऊन तो सरकारी माणूस लगेच मोठ्या वेगाने सुसाट निघाला. पण असे तर नुसते सांगितले गेले. आपल्याला ती मोटार व तो सरकारी माणूस शोधून काढायला हवा. आणि त्याला जबरदस्तीने बोलते करायला हवे.”

पायरोने विचारपूर्वक मान हलवली.

आम्ही गाडीत बसल्यावर, मी त्याला विचारले, “तुला असे वाटते का, की ते अशा प्रकारे केले गेले?”

“नाही. मित्रा, ते तसे केले गेले नाही. ते त्यापेक्षा हुशारीने केले गेले.”

“कसे, ते तू मला सांगणार नाहीस का?”

“अजून नाही. तुला माहिती आहे --- ती माझ्यातील त्रुटी आहे --- मला शेवटपर्यंत छोटी गुपिते माझ्याजवळ ठेवायला आवडतात.”

“शेवट लवकरच येणार आहे का?”

“हो. लवकरच येणार आहे.”

आम्ही सहानंतर थोड्या वेळाने इबेरमाउथला पोचलो. पायरो लगेच ‘एलिझाबेथ पेन’ लिहिलेल्या दुकानाशी गेला. ते बंद होते. पण त्याने घंटी वाजवल्यावर, स्वतः मेरीनेच दार उघडले. आम्हाला बघून, तिच्या चेहऱ्यावर आश्चर्य व आनंदाचे भाव उमटले.

ती म्हणाली, “कृपया आत या आणि माझ्या आत्याला भेटा.”

तिने आम्हाला मागील खोलीत नेले. पांढरे केस असलेली, निळ्या डोळ्यांची, गुलाबीसर गोरी त्वचा असलेली, पडलेल्या खांद्यांची व बिनबाह्यांचा जुन्या लेसचा झगा घातलेली एक वयस्क बाई आम्हाला भेटायला पुढे आली.

तिने हलक्याशा मोहक आवाजात विचारले, “हेच ते थोर मिस्टर पायरो का? मेरी मला सांगत होती. पण माझा विश्वास बसला नाही. तुम्ही आम्हाला या त्रासात खरेच मदत कराल का? चांगला सल्ला द्याल का?”

पायरोने क्षणभर तिच्याकडे पाहिले व वाकून बोलला, “पेन बाईसाहेब --- परिणाम तर चांगला झाला आहे. पण तुम्ही खरेच मिशा वाढवल्या पाहिजेत.”

मिस पेन अवाक् होऊन मागे झाली.

“काल तुम्ही दुकानात नव्हतात?”

“मी सकाळी दुकानात आले होते. पण नंतर डोके दुखत असल्याने, मी सरळ घरी गेले.”

“बाईसाहेब, घरी नव्हे. तुमच्या डोकेदुखीसाठी तुम्ही बदल पसंत केलात, नाही का? मला वाटते, चारलॉकची हवा ताजी आणि उत्तेजना देणारी आहे.” त्याने दंडाला धरून, मला दाराजवळ नेले आणि मागे वळून तिला म्हणाला,

“तुम्हाला समजले असेल, मला सर्व काही माहिती आहे. हे लहानसे नाटक --- ताबडतोब बंद झाले पाहिजे.” त्याच्या स्वरात जरब होती. मिस पेन पांढरी फटक पडली व काही न बोलता मान हलवू लागली. पायरो मिस मेरीकडे वळला.

तो हळूवारपणे म्हणाला, “अग मुली, तू तरुण व सुंदर आहेस. पण असल्या भानगडीत पडून तुला तुरुंगाची हवा खायला लागेल. हर्क्युल पायरो तुला सांगतो आहे, ते दयनीय असेल.”

मग तो रस्त्यावर बाहेर पडला. मी घाबरून त्याच्यामागे गेलो.

तो म्हणाला, “अरे मित्रा, मी पहिल्यापासून, यात स्वारस्य घेतले होते. जेव्हा त्या तरुण माणसाने फक्त मोखाम्पटनपर्यंतचे तिकीट काढले, तेव्ह मला अचानक त्या मुलीचे लक्ष त्याच्याकडे गेलेले दिसले. आता का? त्याच्याकडे कुठल्याही बाईचे लक्ष जावे, असा काही तो दिसत नव्हता. जेव्हा आपला प्रवास सुरु झाला, तेव्हा मला असे वाटले, की काहीतरी घडणार आहे. त्या तरुणाला सामानाच्या दिशेने धोकादायक मूर्खपणा करताना कुणी पाहले? मेरीने आणि फक्त मेरीने. आणि आठव, तिने तिची जागा खिडकीजवळची निवडली होती. बहुतेक बायका पसंत करणार नाहीत, अशी जागा.

मग तिने आपल्याकडे येऊन चोरीची गोष्ट सांगितली --- तेव्हा मी तुला सांगितले, की ती पेटी जबरदस्तीने उघडायचा जो प्रयत्न झाला आहे, तो सर्वसामान्य वाटत नाही.

आणि या सर्वाचा काय परिणाम झाला? मिस्टर बेकर वूडने चोरलेल्या वस्तूसाठी चांगले पैसे मोजले. ‘मिस्टर नॉरटॉन केन’ आणि ‘एलिझाबेथ पेन’ या दोन्ही एकच व्यक्ती होत्या. या दोन्ही व्यक्तींपेक्षा तिसरीच किंचित मिशा असलेली बाई बनून, तिने मिस्टर बेकर वूडला ती वस्तू विकली व असे भासवले की ती ‘एलिझाबेथ पेन’ मार्फत आली आहे. मिस्टर वूडला अर्थातच ते खरे वाटले. त्याने वस्तू घेतली व पाचशे पौंड दिले. नंतर तिने ‘एलिझाबेथ पेन’ म्हणून तिची वस्तू चोरीला गेल्याचा बोभाटा करून इन्स्पेक्टरला पाचारण केले मिस्टर वूडला सांगितले की तो

चोरीचा माल होता. इन्स्पेक्टरने त्याला तो परत करायला लावला. पाचशे पौंड तिच्या खिशात गेलेले होतेच. तो चोरीचा माल होता, याचे साक्षीदार म्हणून आपल्याला त्या मुलीने उल्लू बनवले. म्हणजे हेस्टीग्ज तुला, हर्क्युल पायरोला नव्हे. आता मिस एलिझाबेथ पेनला परत करण्यात आलेला माल ती विकेल आणि पाचशे पौंडांऐवजी, हजारो पौंड मिळवेल. मी सखोल चौकशी केली व मला असे समजले, की तिचा व्यवसाय गाळात चालला आहे. तिला फारसा नफा मिळत नाही. मी स्वतःशी बोललो --- हा आत्या व भाची दोघींचा, दुहेरी डाव आहे."

"मग तू नॉरटॉन केनचा संशय कधीच घेतला नाहीस?"

"अरे मित्रा, त्या मिशांसकट? गुन्हेगार एकतर गुळगुळीत दाढी केलेला असतो. किंवा त्याला भरघोस मिशा असतात. त्या कधीही काढता येतात. पण हुशार मिस पेनसाठी काय संधी होती --- गुलाबीसर गोरी त्वचा असलेली, लहानशी वयस्क बाई --- असे आपण तिला पाहिले होते. पण तिने जर स्वतःला ताठ उभे केले, मोठे बूट घातले, मोठ्या शिताफीने गालांवर खुबीने डाग पाडून घेतले, वरच्या ओठांवर थोडे केस चिकटवले, तर मग काय? पुरुषी बाई --- मिस्टर वूड आपल्याला असेच म्हणाले --- छुपा पुरुष --- असे आपण लगेच म्हणालो."

"ती खरेच काल चारलॉकला गेली होती?

"नक्कीच. तुला आठवत असेल, तू मला म्हणाला होतास, की इथे अकराला पोचू व चारलॉकला दोन वाजता. मग परतीची गाडी अजून


अलीकडील मिळाली असती --- ज्याने आपण आलो, ती. ती चारलॉकहून चार वाजून पाच मिनिटांनी सुटते. आणि इथे सव्वासहाला येते. म्हणजे वस्तु मेरीच्या बॅगेतील पेटीत कधी नव्हतीच. ती त्यात ठेवण्यापूर्वीच जोर लाऊन काढली गेली होती. मेरीचे काम एवढेच होते, की तिच्या सौदर्याला भुलणारे व तिला दुःखात पाहून मदत करणारे, कुणी भोळसट लोक पकडणे. पण दोघांपैकी एकजण तरी भोळसट नव्हता. तो हर्क्युल पायरो होता.”

मला त्याचा निष्कर्ष फारसा आवडला नाही. मी घाईने म्हणालो, मग जेव्हा तू म्हणालास की तू एका अनोळखी बाईला मदत करतो आहेस, तेव्हा तू मला मुद्दाम फसवत होतास.. तू तसेच करत होतास ना?”

“हेस्टीग्ज, मी तुला कधीच फसवत नाही. मी फक्त तुलाच स्वतःला फसवून घ्यायला देतो. मी मिस्टर बेकर वूडचा उल्लेख करत होतो --- ‘या भागात परका असलेला” त्याचा चेहरा काळवंडला. “आहा, जेव्हा मी त्या अन्यायाचा, चारलॉकला नुसते जाण्याचे व जाण्यायेण्याचे भाडे सारखेच असल्याचा विचार करतो, तेव्हा माझे रक्त तापते. मला तिथे येणाऱ्यांना वाचवावेसे वाटते. मिस्टर बेकर वूड हा तू म्हणतोस तसा काही चांगला सह्रदय माणूस नाही. तो तर तिथे पाहुणा आहे आणि हेस्टीग्ज, आपण सगळया पाहुण्यांनी या अन्यायाविरुद्ध एकत्र उभे रहायला पाहिजे. मी पाहुण्यांच्या बाजूने आहे

The Dream

# स्वप्न



गुप्तहेर हर्क्युल पायरो नव्या कामगिरीवर निघाला होता. कामाचाच भाग म्हणून तो एका घरासमोर उभा होता. तो त्या घराकडे टक लाऊन पहात होता. भोवतालच्या परिस्थितीकडेही क्षणभर त्याची नजर फिरली. दुकाने, उजवीकडील कारखान्याची इमारत आणि त्यासमोर मध्यम वर्गीयांची घरे. नंतर पुन्हा पायरोची नजर नॉर्थ वे हाउसवर स्थिर झाली. आजूबाजूंच्या हिरव्यागार शेतांवर अमीरउमरावांची वट चालू होती. कोणे एके काळी शांतता व फुरसत असलेले ते राजेशाही घर होते. आधुनिक लंडनमधील धावपळीच्या जगात, ते इतिहासजमा झाले होते. विस्मृतीत गेले होते.

जगातील सर्वात श्रीमंत माणसांपैकी एकजण त्या आलिशान घराचा मालक होता. पण पैशाने प्रसिद्धी मिळते, तशीच द्वेषभावनाही तयार होते. त्यातच लक्षाधीश रॉजर पार्कर हा समाजापासून फटकून रहाणारा विक्षिप्त मनुष्य होता. त्याचा दुष्टपणा, अविश्वसनीय उदारता आणि अनेक विचित्र खासगी गोष्टी कायम चर्चेत होत्या. त्याचा अठ्ठावीस वर्षांचा जुना गाउन, रोजच्या कोबीच्या सुपाचा आहार व मांजरांबद्दल नावड वगैरे गोष्टी जगजाहीर होत्या. पायरोलाही त्या माहिती होत्या.

आता तो रॉजर पार्करला भेटणार होता. पायरोला त्याच्याबद्दल अधिक माहिती ज्यामुळे कळली, ते पत्र त्याच्या खिशात होते. त्या पुरातन वास्तूकडे दोन मिनिटे शांतपणे पाहून, चार पायऱ्या चढून, त्याने घराची घंटी वाजवली. नेहमीप्रमाणे, ठरल्या वेळी हर्क्युल पायरो अचूकपणे हजर होता.

दोन मिनिटात दार उघडले. झगझगीत हॉलमधून येऊन दरवान उभा ठाकला. पायरोने विचारले, “मिस्टर रॉजर पार्कर आहेत ना?”

अदबीच्या आवाजात विचारणा झाली, “सर, तुम्हाला भेटायची वेळ दिलेली आहे का?”

पायरो उत्तरला, “हो, तर.”

पुन्हा अदबीची विचारणा झाली, “सर, आपले नाव?”

“हर्क्युल पायरो.”

दरवान बाजूला झाला. पायरोने घरात प्रवेश केला. दरवानाने दार लाऊन घेतले. पायरोची टोपी व काठी त्याच्याकडून घेऊन, बाजूला ठेवली आणि विचारले, “सर, मला कृपया साहेबांचे पत्र दाखवाल का?”

पायरोने घडी केलेले पत्र खिशातून काढले व त्याला दिले. नुसती नजर टाकून, दरवानाने ते परत दिले. पायरोने ते परत खिशात ठेऊन दिले. त्यावरील मजकूर अगदी साधा होता:

नॉर्थवे हाउस

मिस्टर हर्क्युल पायरो,

मिस्टर रॉजर पार्कर यांना तुमचा सल्ला हवा आहे. तुम्हाला सोयीस्कर असल्यास, उद्या, म्हणजे गुरुवारी रात्री ९:३० वाजता वरील पत्त्यावर यावे.

तुमचा विश्वासू,

ह्युगो कॉर्नवर्दी

ताजा कलम: कृपया येतांना पत्र बरोबर आणावे.

दरवानाने पायरोला मोठ्या जिन्याकडे नेत म्हटले, “सर, आपण मिस्टर कॉर्नवर्दी यांच्या खोलीकडे चलता का?” कलाकुसरीने नटलेल्या त्या डौलदार, प्रशस्त, देखण्या जिन्याकडे कौतुकाने बघत, पायरो त्याच्यामागे निघाला.

दरवानाने दारावर टकटक केली.

पायरोच्या भुवया जराशा उंचावल्या गेल्या. त्याला आश्चर्य वाटले. कारण उत्तम दरवान असे करत नाहीत आणि हा तर उत्तम दरवान दिसत होता. त्या लक्षाधीशाच्या विक्षिप्तपणाचा हा पहिला पुरावा होता. आतून काहीतरी आवाज आला. दरवानाने दार उघडून म्हटले, “सर, आपण बोलावलेले गृहस्थ आले आहेत.” पायरोला पुन्हा हे वागणे, मुद्दाम रीतीला सोडून केलेले वाटले.

“सर, ते आपली वाट पहात आहेत.”

पायरो पार्करच्या खोलीत शिरला. बेताच्या आकाराची, मोजके फर्निचर असलेली, ती कार्यालयासारखी खोली होती. फाईल्स ठेवलेली कपाटे, संदर्भ पुस्तके, काही आरामशीर खुर्चा व व्यवस्थित कागद ठेवलेले मोठे टेबल तिथे होते. खोलीचे कोपरे मंद उजेडाचे होते. एकच हिरव्या शेडचा दिवा होता आणि तो दारातून येणाऱ्या व्यक्तीवर उजेड पडेल, असा ठेवलेला होता. डोळे दिपल्यामुळे तो निदान एकशे पन्नास वॅटचा असावा, असा अंदाज पायरोने केला. जुना ठिगळे लावल्यासारखा दिसणारा गाउन घालून, एक कृश आकृती खुर्चीवर बसली होती. ती म्हणजे अर्थात रॉजर पार्कर होता. पक्ष्याच्या चोचीसारखे बाहेर आलेले बाकदार नाक, डोके पुढे झुकवून बसण्याची लकब, या गोष्टींची पायरोने दखल घेतली. पांढऱ्या केसांची एक बट पार्करच्या कपाळावर रुळत होती. जाड चष्म्याच्या मागे त्याचे डोळे चकाकत होते. ते पायरोकडे संशयाने रोखून बघत होते.

कडक घोगऱ्या आवाजात, पार्कर म्हणाला, “तुम्हीच ते हर्क्युल पायरो तर!”

एक हात खुर्चीच्या पाठीवर ठेऊन, अभिवादन करत पायरो म्हणाला, “हो, बोला. तुमचे काय काम आहे?’

पार्कर म्हणाला, “बसा.”

पायरो बसला. मागून पडणाऱ्या दिव्याच्या झोतात त्याला आपादमस्तक न्याहाळत, पार्कर म्हणाला, “तुम्हीच हर्क्युल पायरो आहात, हे कशावरून?”

पायरोने खिशातील पत्र काढून दाखवले.

“ठीक आहे.” ओळख पटल्याचे दाखवत पार्कर म्हणाला, “मी कॉर्नवर्दीला तसेच सांगितले होते. पत्र घडी करून पार्करने परत केले. “तुम्हीच पायरो असल्याबद्दल आता माझी खात्री पटली.”

“हो. .हो. मीच तो. अगदी शंभर टक्के!”

रॉजर पार्कर अगदी मंदपणे हसला. “रिकाम्या टोपीतून हातचलाखीने कबुतर काढणारा जादुगारही असेच म्हणतो. तीच त्याची युक्ती असते.”

पायरो काहीच बोलला नाही. अचानक पार्कर उद्गारला, “तुम्हाला असे वाटेल, की मी एक संशयी म्हातारा आहे, तर ते तसेच आहे. माझा

कुणावरही विश्वास नाही. तुम्ही श्रीमंत असाल, तर कुणावर विश्वास ठेवताच येत नाही. तसे करणे शक्य नसते.''

पायरोने हळूच आठवण करून दिली. ''तुम्हाला माझा सल्ला हवा होता ना?'' पार्करने मान हलवली. ''बरोबर आहे. नेहमी उत्कृष्ट तेच घ्यावे, असा माझा बाणा आहे. पैशांची फिकीर न करता, मुरब्बी व्यक्तीचीच मदत घ्यावी. मिस्टर पायरो, तुमच्या लक्षात आले असेलच, की मी तुम्हाला तुमच्या फीबद्दल विचारले नाही आणि विचारणारही नाही. तुम्ही नंतर मला बिल पाठवा. मी क्षुद्र माणसासारखी घासाघीस करणार नाही. आपापल्या क्षेत्रात अत्युच्च स्थानी असणाऱ्या माणसाची गोष्टच वेगळी असते आणि मी तसाच आहे, हे मला ठाऊक आहे.

यावर पायरोने काहीच उत्तर दिले नाही. तो एका बाजूला डोके झुकवून, लक्षपूर्वक ऐकत होता.

पायरो तसे दर्शवत नव्हता, तरी तो आतल्या आत थोडा नाराज झाला होता. पार्करला नेमके काय सलते आहे, ते त्याला कळत नव्हते. इतका वेळ तरी पार्करचे वर्तन खरेखुरे वाटत होते. पण नेमकी काय गोम आहे, हे लक्षात येत नव्हते.

उद्वेगाने पायरो स्वतःशीच पुटपुटला, ''हा नक्कीच लबाड माणूस आहे.'' विक्षिप्त लक्षाधीश पायरोने यापूर्वीही पाहिले होते. परंतु, त्या प्रत्येकाबद्दल आदर वाटेल, अशी आंतरिक उर्जा असल्याचेही त्याने अनुभवले होते. पार्करने जुना गाऊन घातला आहे, ठीक आहे --- असेल

त्याची आवड तशी! पण तो कपडा नाटकातील भाड्याच्या कपड्यासारखा दिसत होता. तो वयस्क मनुष्यही नाटकीच वाटत होता.

पायरोची खात्रीच पटली. वरकरणी मात्र तो थंडपणे म्हणाला, “मिस्टर पार्कर, तुम्हाला माझा सल्ला हवा होता.”

आता पार्कर गडबडला. तो पुढे झुकला व खोल आवाजात म्हणाला, “हो. हो. तुमचे म्हणणे मला ऐकायचे आहे. नेहमी उत्तम लोकांकडेच जावे, अशी माझी पद्धत आहे. उत्तम डॉक्टर, उत्तम गुप्तहेर आणि सल्लागार! असा उत्तम माणूस आणि मी यांच्यातील तो मामला असतो.”

मला तुमचे बोलणे कळले नाही.”

पार्करने फटकारत म्हटले, “तसेच होणार. कारण मी अजून सुरवातच केलेली नाही.”

तो पुढे झुकला व व एक असबद्ध प्रश्न विचारता झाला. “मिस्टर पायरो, तुम्हाला स्वप्नांबद्दल काय माहिती आहे?”

पायरोच्या भुवया उंचावल्या. तो याची अपेक्षा करत नव्हता. तो म्हणाला, “मी त्यासाठी तुम्हाला कॉर्नवॉलीस नावाच्या लेखकाच्या पुस्तकाची शिफारस करेन. तो प्रसिद्ध मनोविश्लेषण तज्ञ आहे आणि त्याने स्वप्नांबद्दल लिहिलेले पुस्तक विश्वासार्ह मानले जाते.”

पार्कर धीमेपणे म्हणाला, “मी तो प्रयत्न केला आहे.”

पहिल्यांदा कुजबुजत्या स्वरात व मग हळूहळू मोठ्याने पार्कर थोडे थांबत थांबत बोलू लागला. “मला अनेक रात्रींमागून रात्री तेच स्वप्न पडते आणि मी घाबरतो. तुम्हाला सांगतो, मी खूप घाबरतो. मी याच्या पुढील खोलीत बसलो आहे .टेबलाशी बसून लिहितो आहे. तिथे घड्याळ आहे. त्याकडे मी बघतो. तीन वाजून अठ्ठावीस मिनिटे झालेली असतात. तुमच्या लक्षात येते आहे का, नेहमी तीच वेळ! आणि मिस्टर पायरो, जेव्हा मी ती वेळ बघतो, तेव्हा माझी इच्छा असो वा नसो, मला ते करावेच लागते.” बोलता बोलता पार्करचा आवाज चढला.

पायरोने विचारले, “ते म्हणजे काय? काय करावे लागते?”

खजील स्वरात पार्करने चालू ठेवले, “मी माझ्या टेबलाचा उजवीकडून दुसरा कप्पा उघडतो. तिथे ठेवलेले पिस्तुल घेतो. ते भरून खिडकीशी जातो आणि नंतर --- आणि नंतर --- “

पायरोने उत्कंठेने विचारले, “नंतर काय?”

“नंतर मी मला गोळी मारून घेतो.” पार्करचा आवाज खालावला. क्षणभर खोलीत शांतता पसरली.

मग पायरो म्हणाला, “हेच स्वप्न नेहमी पडते का?’

“हो.” पार्करने उत्तरादाखल म्हटले, “हो. दर रात्री.”

पायरोने विचारले, “तुम्ही स्वतःला गोळी मारून घेतल्यावर, पुढे काय होते?”

“पार्करने उत्तर दिले, “मी जागा होतो.”

पायरोने विचारात पडल्याप्रमाणे हळूहळू मान हलवली. तो म्हणाला, “एक उत्सुकता म्हणून विचारतो, ते पिस्तुल तुम्ही विशिष्ट कप्प्यातच ठेवता का?”

“हो.”

“काही कारण?”

“कारण कळत नाही. पण मी नेहमीच असे करतो. ते तयार ठेवावेच लागते.”

“कशासाठी तयार ठेवावे लागते?”

चिडून पार्कर म्हणाला, “श्रीमंत माणसाला नेहमीच शत्रू असतात. माझ्यासारख्या परिस्थितीतील माणसाला स्वतःची काळजी घेणे भाग असते.”

पायरोने तो विषय पुढे चालू ठेवला नाही. दोन मिनिटे स्तब्ध राहून, त्याने विचारले, “तुम्ही मला नेमके कशासाठी बोलावले आहे?”

“सांगतो. पहिल्यांदा मी एका डॉक्टरचा सल्ला घेतला. खरे सांगायचे तर तीन डॉक्टरांचा.”

“मग?’

पहिला मला म्हणाला, “हे सगळे तुमच्या आहाराशी निगडीत आहे.” तो वयाने मोठा माणूस होता. दुसरा त्यामानाने तरुण व आधुनिक

होता. बालवयात घडलेल्या एखाद्या घटनेभोवती, याचे घागे बांधलेले असणार, असे त्याला वाटत होते. मनाच्या नेणिवेतील ती घटना आठवून त्रास होऊ नये म्हणून, कदाचित मी स्वतःला मारुनही घेईन, असे त्याचे म्हणणे होते.

पायरोने विचारले, “आणि तिसरा डॉक्टर?”

पार्करने रागीट आवाजात म्हटले, “तोदेखील तरूण मनुष्यच आहे. तो म्हणाला, की मला माझ्या आयुष्याचे इतके ओझे झाले आहे, की मला ते संपवण्याची इच्छा आहे. माझ्या खऱ्या आयुष्यात, मी सत्याला सामोरे जायला घाबरतो, असे मुळीच नाही, पण स्वप्नावस्थेत माझी सद्सदविवेकबुद्धी नाहीशी होऊन, मला ते सर्व खरेच वाटू लागते आणि मी माझे आयुष्य संपवतो.”

पायरोने विचारले, “म्हणजे त्याचे असे म्हणणे आहे की, अजाणतेपणी तुमची स्वतःला मारून घ्यायची इच्छा आहे?

बचावात्मक पवित्रा घेऊन, पार्कर ओरडला, ”हे अशक्य आहे. अशक्य! मी अगदी आनंदी, समाधानी आहे. जे हवे ते सर्व माझ्याकडे आहे. पैशाने मी कुठलीही गोष्ट विकत घेऊ शकतो. हा सगळा कल्पना विलास आहे. असे सुचवणे ही बाबच अविश्वसनीय आहे.”

पायरो पार्करकडे उत्सुकतेने बघत होता. पार्करचा कापणारा हात व थरथरणारा चिडका आवाज सुचवत होता, की पार्कर वाजवीपेक्षा जास्त

गंभीरपणे व नाटकीपणे बोलतो आहे. त्याचे जोरदार समर्थन संशयास्पद वाटत होते.

भानावर येऊन पार्कर म्हणाला, “हं महाशय, मी कुठपर्यंत आलो होतो? अचानक तो शांत झाला. टेबलावर बोटांनी ठेका धरत तो म्हणाला, “आणखी एक शक्यता आहे. ती खरी असेल, तर तुम्हाला तिच्यासंबंधी माहिती असेलच. तुम्ही प्रसिद्ध आहात. तुम्ही अशा शेकडो केसेस पाहिल्या असतील. निरर्थक अशक्यप्राय केसेस! तुम्हाला माहिती असेल, जर कुणी --- “

पायरो भुवया उंचावत बोलला, ‘काय माहिती असेल?”

कुजबुजत्या स्वरात पार्कर म्हणाला, “मला मला ठार करायला कुणी टपले असेल, तर ते असे करतील का?” ते मला रात्रीमागून रात्री स्वप्ने पाडतील का?”

“भूल देऊन, असे तुम्हाला म्हणायचे आहे का?”

“हो.”

विचार करून पायरो म्हणाला, “मला वाटते, शक्य आहे. पण एखादा डॉक्टर याबद्दल जास्त सांगू शकेल.”

“तुमच्या अनुभवात अशी एखादी केस नाही का?”

“नेमकी अशाच स्वरूपाची नाही.”

“मी काय म्हणतो आहे, तुमच्या लक्षात येते आहे का? रात्रीमागून रात्री, अनेक रात्री, मला तेच स्वप्न पाडायचे आणि शेवटी मला हे असह्य होऊन. मी स्वतःचा जीव घ्यायचा. स्वप्नात पाहिलेले खरे करायचे. स्वतःच स्वतःला ठार करायचे!”

पायरोने शांतपणे मान हलवली.

पार्करने विचारले, “असे होणे शक्य आहे, असे तुम्हाला वाटते का?”

पायरो उत्तरला, “शक्य आहे का? --- मला वाटते, याबाबत बोलायला माझ्यापाशी काही नाही.”

“पण असे होणे, असंभवनीय वाटते का?”

“अगदीच अशक्य कोटीतील वाटते.”

पार्कर खालच्या आवाजात पुटपुटला, “पण मग डॉक्टर असे कसे म्हणाले --- ?” पण मग त्याचा आवाज चढला. तो ओरडला, “ असे स्वप्न मला का पडते? का? का? पायरोने मान हलवली. पार्कर मध्येच म्हणाला, “तुमची खात्री आहे का, की तुम्ही अशी एकही केस पाहिलेली नाही?”

“कधीच नाही.”

पार्करने म्हटले, “मला हेच जाणून घ्यायचे होते.”

पायरोने नाजूकपणे घसा खाखरला व म्हणाला, “मी एक प्रश्न विचारू का? पार्करने उदारतेने परवानगी दिली. “तुम्हाला मारायला कोणी टपले आहे, असा तुम्हाला संशय आहे का?”

पार्करने उत्तर दिले, “नाही. असे कुणीच नाही.”

पायरोने आठवण करून दिली, ‘पण ही कल्पना तुमच्याच सुपीक डोक्यातून आली आहे.”

“अशी शक्यता असू शकते का, एवढेच मला हवे होते.”

“माझ्या अनुभवावरून, मी म्हणेन, की नाही. असे घडणार नाही. पण काय हो? तुम्हाला यापूर्वी कुणी भूल दिली आहे का?”

“अर्थातच नाही. असल्या मूर्खपणाला मी बळी पडेन का?”

पायरो विचारपूर्वक म्हणाला, “स्वप्न खरेच उल्लेखनीय आहे. मला या दृष्यातील टेबल, घड्याळ व पिस्तुल बघायचे आहे.”

“जरूर! त्या बाजूच्या शेजारच्या खोलीत आहेत.” आपल्या गाउनचे बंद घट्ट करत, पार्कर खुर्चीतून अर्धवट उठला. नंतर एकदम विचार बदलल्याप्रमाणे परत खुर्चीत बसला आणि बोलला, “नाही. त्यात बघण्यासारखे काहीच नाही. तेथील सर्व तपशील मी तुम्हाला सांगितला आहेच.”

“पण मला त्या वस्तु बघायच्या आहेत.”

पायरोच्या त्या मागणीवर पार्कर फटकारल्यासारखे बोलला, "नाही. त्याची काही गरज नाही. तुम्ही तुमचे मत सांगितले, तेवढे पुरेसे आहे."

'मला काय करायचे आहे', अशा अर्थी पायरोने खांदे उडवले. "जशी तुमची मर्जी" असे बोलून तो जाण्यासाठी उठला. "मिस्टर पार्कर, माफ करा. मी तुम्हाला काही मदत करू शकलो नाही."

पार्कर पायरोकडे रोखून बघत म्हणाला, "नुसत्याच मोघम गोलमाल गोष्टी मला नको आहेत. मी तुम्हाला काय घडले ते सांगितले. त्यावरून तुम्हाला काही निष्कर्ष काढता येत नसतील, तर आपण इथेच थांबलेले बरे. अर्थात तुमचे सल्ल्याबद्दलचे बिल तुम्ही पाठवू शकता."

"ते मी करेनच." पायरो कोरडेपणे म्हणाला व जायला निघाला.

पार्कर म्हणाला, "एक मिनिट थांबा. मला ते पत्र हवे आहे."

"तुमच्या सचिवाने पाठवलेले पत्र?"

"हो." पार्कर ताठपणे बोलला.

पायरोच्या भुवया चढल्या. त्याने खिशात हात घालून घडी केलेले पत्र काढले व ते पार्करला दिले. पार्करने त्याकडे कटाक्ष टाकून, मान हलवली व पत्र टेबलावर ठेवले.

पायरो दाराकडे निघाला. तो चक्रावून गेला होता. त्याने ऐकलेल्या स्वप्नाच्या गोष्टीवर तो एकाग्रतेने विचार करत होता. त्याला टोचणी लागली

होती, की यात काहीतरी गफलत आहे आणि ती रॉजर पार्करशी संबंधित नसून, त्याच्या विचार करण्याच्या पद्धतीशी संबंधित आहे.

दार उघडतांना पायरोच्या डोक्यात प्रकाश पडला. आपली चूक उमगली. तो खोलीत शिरण्यासाठी वळला. त्याने दिलगिरी व्यक्त करत म्हटले, “माफ करा. मी चुकून तुम्हाला माझ्या उजव्या खिशातले पत्र दिले

.पार्करने चिडून विचारले, ”हे काय चालले आहे?”

“मी आता तुम्हाला जे पत्र दिले, ती लॉन्ड्रीची पावती आहे.” पायरो पुन्हा दिलगिरीच्या सुरात म्हणाला. “हे घ्या तुमचे पत्र.” त्याने डाव्या खिशातून पत्र काढत म्हटले.

पार्करने ते झडप घालून ताब्यात घेतले. “काय मूर्खपणा आहे हा! तुम्ही काय करत आहात, ते तुम्हाला समजत नाही आहे का?”

पायरोने लॉन्ड्रीची पावती खिशात ठेवत, परत एकदा माफी मागितली व तो टेचात खोलीबाहेर पडला. जिना उतरण्यापूर्वी तो क्षणभर थांबला. ती प्रशस्त जागा होती. एक मोठे टेबल व हातांच्या दोन खुर्च्या होत्या. टेबलावर काही मासिके पडली होती. शेजारी एक फुलदाणी ठेवलेली होती. एखाद्या दंतवैद्याच्या प्रतिक्षालयासारखी ती जागा होती.

खाली दरवान थांबलेला होता. त्याने पायरोला नम्रपणे विचारले, “सर, तुम्हाला टॅक्सी आणू का?

“नको. हवा चांगली आहे. मला चालत जायलाच आवडेल. रस्ता ओलांडण्यापूर्वी वाहता रस्ता शांत होण्याची वाट बघत, पायरो थांबला. त्याच्या कपाळावर आठ्या उमटल्या. स्वतःशीच तो पुटपुटला, “नाही. मला समजत नाही. मी कोड्यात पडलो आहे. हर्क्युल पायरोचे असे व्हावे, याची मला खंत वाटते.”

अशा रीतीने या नाटकाचा पहिला अंक संपला. एक आठवड्याने दुसरा अंक सुरु झाला. डॉ जॉन फॉक्स, एम. डी. यांच्या फोनने त्याची सुरवात झाली. त्यांच्या बोलण्यात अदबीचा पूर्ण अभाव होता.

“कोण गुप्तहेर पायरो का?” मी डॉ जॉन बोलतो आहे.”

“बोला.”

“मी नॉर्थ वे हाउसमधून बोलतो आहे. रॉजर पार्कर यांच्या घरातून.”

“हं. बोला. पार्करचे काय म्हणालात?” पायरोचा आवाज उत्सुक झाला होता.

“पार्करने आज दुपारी डोक्यात गोळी मारून घेतली. तो लगेच मेला.”

क्षणभर सुन्न शांतता पसरली. मग पायरो म्हणाला, “अस्स!”

“मला वाटते, तुम्हाला धक्का बसला नसेल. तुमच्यासारख्या अनुभवी माणसाला, याबद्दल थोडीफार माहिती आहेच.” जॉन रोखठोक बोलला.

पायरोने शांतपणे विचारले, “असे तुम्हाला का वाटते?”

“मी हवेत इमले बांधत नाही. आठवड्यापूर्वी तुम्हाला पार्करने भेटायला बोलावलेले पत्र माझ्यासमोर पडले आहे.”

“अस्स!”

“आम्ही इथे एका पोलीस इन्स्पेक्टरला बोलावले आहे. जेव्हा एखादा लक्षाधीश स्वतःला मारून घेतो, तेव्हा असे केलेले बरे, नाही का?” तुम्ही या प्रकरणावर काही प्रकाश टाकू शकाल का? जर उत्तर हो असेल, तर तुम्ही इथे या.”

“मी लगेच येतो.”

“ठीक आहे. हे निस्तरानिस्तरीचे काम तसे तापदायकच असते.”

पायरोने परत एकदा तो येत असल्याची हमी दिली. “फोनवरून जास्त बोलायला नको, नाही का?”

“बरोबर.”

पाऊण तासाने नॉर्थ वे हाउसच्या तळमजल्यावरील लांबलचक वाचनालयात, पायरो बसलेला होता. तिथे आणखी पाचजण होते .इन्स्पेक्टर बार्ने, डॉ जॉन फॉक्स, ही दोन बाहेरची माणसे होती. बाकीच्या तिघांमध्ये मृत पार्करची पत्नी मिसेस पार्कर, एकुलती एक मुलगी जोएना पार्कर व खासगी सचिव ह्यूगो कॉर्नवर्दी हे होते.

इन्स्पेक्टर बार्ने खास सैनिकी वळणाचा माणूस होता. डॉ जॉन त्याच्या फोनवरील संभाषणापेक्षा वेगळेच वाटत होते. तो उंच मनुष्य उभट चेहरा असलेला होता. मिसेस पार्कर तिच्या पतीपेक्षा खूपच तरुण होती. ती सुंदर घनदाट केसांची होती. त्या क्षणी मात्र तिने ओठ गच्च आवळून धरले होते. तिच्या काळया डोळयांवरून, तिच्या मनाचा थांग लागत नव्हता. ती पूर्णपणे आत्ममग्न वाटत होती. जोएनाचे केस छान असले, तरी तिच्या चेहऱ्यावर वांग होते. बाकदार नाक व हनुवटी तिने थेट बापाकडून उचलल्याचे दिसत होते. तिच्या डोळयात बुद्धीची चमक होती. व थोडा गर्विष्ठपणाही होता. ह्यूगो कॉर्नवर्दी नीटनेटके कपडे केलेला, भावरहित चेहऱ्याचा तरुण मनुष्य होता. मात्र तो हुशार आणि चटपटीत वाटत होता.

ओळख व अभिवादन हे उपचार झाल्यावर, पायरोने त्याच्या पार्करबरोबरील भेटीत काय बोलणे झाले, ते सांगितले.

इन्स्पेक्टर म्हणाला, “हो. मी ऐकलेली स्वप्नाची गोष्ट अगदी चाकोरीबाहेरची वाटते. मिसेस पार्कर, तुम्हाला याबद्दल काही माहिती आहे का?”

“पार्कर मला त्या स्वप्नाबद्दल बोलला होता. त्यामुळे तो खूपच उदास झाला होता. मी त्याला म्हटले, की हे अपचनामुळे घडते आहे. मात्र त्याचा आहार अगदी डॉक्टरांनी शिफारस केल्याप्रमाणे, नेमका व ठरलेला असाच होता.”

यावर डॉक्टरने मान हलवून म्हटले, ”त्यांनी काही माझा सल्ला घेतला नव्हता.”

पायरो उद्गारला, “या मुद्द्यावर तुमचा सल्ला घेणे मला आवडेल. डॉक्टर.”

मिस्टर पार्कर मला म्हणाले की त्यांनी तीन स्पेशालीस्ट डॉक्टरांचा सल्ला घेतला होता. त्यांनी मांडलेल्या विचारांबद्दल तुम्हाला काय वाटते?”

डॉ जॉनच्या कपाळाला आठ्या पडल्या. तो म्हणाला, “तसे सांगणे अवघड आहे. त्याला डॉक्टरांनी जे सांगितले असेल, ते तसेच्या तसे सर्व त्याने तुम्हाला सांगितले असेल, असे समजू नका.”

“तुम्हाला असे म्हणायचे आहे का, की डॉक्टरांनी जे सांगितले, ते पार्करला नीट कळलेच नाही?”

डॉ जॉनने खुलासा केला, “अगदी तसेच नाही, पण डॉक्टरी भाषेतील जेवढे समजले, तेवढे त्याने ग्रहण केले असणार. आणि ते तुम्हाला सांगतांना त्यात आणखी बदल झाले असणार.”

पायरोने विचारले, “म्हणजे पार्करने मला जे सांगितले, ते डॉक्टरांनी जे सांगितले त्यापेक्षा वेगळे होते?”

“असे असावे. ते थोडे चुकीचे असणार, असे मला म्हणायचे आहे.”

डॉ जॉनच्या बोलण्यावर पायरोने विचारपूर्वक मान हलवली. त्याने विचारले, “त्या डॉक्टरांची नावे तरी माहिती आहेत का?”

मिसेस पार्करने खुणेनेच नाही म्हटले. जोएना पार्करने म्हटले, "त्यांनी कुणाचा सल्ला घेतला होता, याबद्दल मला काहीच माहिती नाही."

"त्यांनी कधी त्यांच्या स्वप्नाबद्दल तुम्हाला सांगितले होते का?"

मुलीने नकारार्थी मान हलवली.

"आणि तुम्ही मिस्टर कॉर्नवर्दी?"

"नाही. तसे काहीच ते म्हणाले नाहीत. त्यांनी सांगितल्याबरहुकुम, मी तुम्हाला पत्र पाठवले, पण त्यांना तुमचा सल्ला कशाच्या बाबतीत हवा होता, हे मला अजिबात माहिती नाही. मला वाटले, त्यांच्या व्यवसायासंबंधी काही सल्ला असेल."

यावर पायरोने विचारले, "आणि आता पार्करच्या प्रत्यक्ष मरणाबद्दल काय?

इन्स्पेक्टर बार्नेने प्रश्नार्थकपणे मिसेस पार्कर आणि डॉ जॉन यांच्याकडे पाहिले आणि बोलायला सुरवात केली. "रोज दुपारी मिस्टर पार्कर पहिल्या मजल्यावरील त्यांच्या खोलीत, काम करत असत. माझ्या समजुतीप्रमाणे, त्यांना काही काळाने व्यवसायाचे एकत्रीकरण करायचे असावे."

बोलता बोलता बार्नेने मिस्टर कॉर्नवर्दीकडे पाहिले व बोलला, 'कमी भाड्यात एकत्रित प्रवास!' मिस्टर पार्कर यांनी यासंबंधी दोन वार्ताहरांना मुलाखत देण्याचे कबूल केले होते. असे ते क्वचितच करायचे.

पाच वर्षातून एकदा, असे मी ऐकून आहे. ते दोन्ही वार्ताहर सव्वातीनला पूर्वनियोजित वेळेनुसार आले होते. ते पहिल्या मजल्यावरील मिस्टर पार्कर यांच्या खोलीबाहेर बसले होते. तीन वाजून वीस मिनिटांनी 'कमी भाड्यात एकत्रित प्रवास' या कंपनीच्या कार्यालयातून एक माणूस, तातडीच्या कामाचे काही कागद घेऊन आला. तो आत जाऊन मिस्टर पार्करना भेटला. ते त्याच्याबरोबर दारापर्यंत आले आणि त्या दोन वार्ताहरांना म्हणाले, "माफ करा महाशय, मी तुम्हाला बराच वेळ बसवले आहे, पण मला थोडे महत्वाचे काम आहे आणि ते आताच केले पाहिजे. मी ते लवकरात लवकर उरकतो."

त्या दोघांनी थांबायची तयारी दर्शवली, तेव्हा मिस्टर पार्कर परत त्यांच्या खोलीत गेले. त्यांनी दार लावले आणि ते परत जिवंत दिसलेच नाहीत!"

पायरो म्हणाला, "बोलणे पुढे चालू ठेवा."

इन्स्पेक्टर सांगू लागला, "मिस्टर पार्कर यांच्या खोलीशेजारीच असलेल्या खोलीतून चारनंतर मिस्टर कॉर्नवर्दी बाहेर आले. ते दोन वार्ताहर अजून थांबलेले बघून त्यांना आश्चर्य वाटले. त्याना काही पत्रांवर मिस्टर पार्कर यांची सही हवी होती. बाहेर दोन वार्ताहर अजून थांबले आहेत, हेदेखील त्यांना सांगावे, म्हणून ते खोलीत शिरले. तिथे त्यांना मिस्टर पार्कर दिसलेच नाहीत. खोली रिकामीच आहे, असे त्यांना वाटले. नंतर खिडकीसमोरील टेबलाच्या मागे दिसणाऱ्या बुटांवर त्यांची नजर गेली. ते

ताबडतोब पुढे झाले. शेजारी पिस्तुल पडलेल्या अवस्थेत, मिस्टर पार्कर तिथे मरून पडलेले त्यांना दिसले. त्यांनी दरवानाला डॉ जॉन यांना फोन करायला सांगितला आणि पोलिसांनाही कळवले.

पायरोने विचारले, “गोळीचा आवाज आला होता का?”

“नाही. इथे वाहतुकीची खूप गडबड आहे. खिडकीही उघडी होती. मोटारी आणि इतर वाहनांच्या आवाजापुढे गोळीचा आवाज लक्षातही आला नसेल.”

पायरोने विचारपूर्वक मान हलवली. “बरोबर किती वाजता मिस्टर पार्कर मरण पावले असावेत? काही सांगता येईल?”

डॉ जॉन उत्तरला, “मी इथे आल्याबरोबर शवाची तपासणी केली --- म्हणजे चार वाजून बत्तीस मिनिटांनी. त्याच्या निदान एक तास आधी त्यांना मरण आले असावे.”

पायरोच्या चेहऱ्यावर काळजी उमटली. “म्हणजे त्यांनी माझ्यापाशी उल्लेख केलेल्या वेळीच --- तीन वाजून अठ्ठावीस मिनिटांनी त्यांचा मृत्यू झाला म्हणायचा.”

“बरोबर.”

डॉ जॉनने सहमती दाखवली.

“पिस्तुलावर काही ठसे सापडले का?”

“हो, त्यांचे स्वतःचेच.”

“आणि पिस्तुल?”

“ते टेबलाच्या उजव्या हाताच्या दुसऱ्या कप्प्यात ठेवायचे, असे त्यांनी सांगितले होते ना?” इन्स्पेक्टर सांगत होते, तेच ते होते. मिसेस पार्करने ते ओळखले आहे आणि तुम्हाला माहिती आहे, की खोलीत आत यायला एकच दार आहे. ते जिना चढून आल्यावर लागते. दोन वार्ताहर बाहेर बसलेले होते. तेही खात्रीपूर्वक सांगतील, की मिस्टर पार्कर त्यांच्याशी बोलून गेल्यापासून, चार वाजल्यानंतर थोड्या वेळाने मिस्टर कॉर्नवर्दी आत जाईपर्यंत, कुणीच खोलीत शिरलेले त्यांनी पाहिले नाही.”

पायरो म्हणाला, “तर मग मिस्टर पार्कर यांनी आत्महत्या केली, असेच म्हणावे लागेल.”

इन्स्पेक्टर बार्नें धीम्या स्वरात म्हणाले, “एक मुद्दा सोडता, याबद्दल काहीच संशय नाही.”

पायरोने प्रश्न केला, “आणि तो कोणता?”

इन्स्पेक्टरने पुरावा दिला, “मिस्टर पार्कर यांनी तुम्हाला लिहिलेले पत्र.”

यावर पायरोदेखील हसला. “असे बघा, हर्क्युल पायरो जिथे अवतीर्ण होतो, तिथे लगेच खुनाचा संशय येऊ लागतो!

इनस्पेक्टर कोरडेपणे म्हणाला, “बरोबर. पण तुम्ही आता सर्व परिस्थिती ऐकून घेतलीच आहे ---- “

पायरो त्याना अडवत, मिसेस पार्करकडे वळून म्हणाला, “एक मिनिट, तुमच्या नवऱ्याला कधी कुणी भूल घातली होती का?”

मिसेस पार्कर दृढ स्वरात उत्तरली, “कधीच नाही.”

“अस्स! पण ते भूल पडण्याविषयी काही वाचत होते का? त्या विषयाबद्दल त्यांना रुची होती का?”

मिसेस पार्कर बोलली, “आठवत नाही.” आणि मग अचानक तिचा तिच्यावरील ताबा सुटला. ती ओरडली, “ते भयानक स्वप्न! तो फारच विचित्र प्रकार होता. रात्रीमागून रात्री तेच स्वप्न --- आणि मग जणू काही तो मृत्यूकडे खेचला गेला.”

मिस्टर पार्कर जे बोलले होते, ते पायरोला आठवले. ‘मला खरे तर जे करायचे असते, ते करायला मी सरसावतो. स्वतःला संपवतो.’

पायरोने पुढे विचारले, “तुमचा नवरा अशा रीतीने त्याचे आयुष्य संपवेल, असे तुम्हाला कधी वाटले होते का?”

“नाही, मुळीच नाही.”

जोएना मध्येच चिडक्या स्वरात ओरडत म्हणाली, “माझ्या वडिलांनी स्वतःला कधीच मारून घेतले नसते. ते स्वतःबद्दल खूप जागरूक होते.”

डॉ जॉन म्हणाला, “आत्महत्या करणारे लोक बहुधा तशा धमक्या देत नाहीत, बर का मिस जोएना! म्हणूनच ही घटना अतर्क्य वाटते.”

पायरो उभा रहात म्हणाला, “ही दुःखद घटना जिथे घडली, ती खोली मी पाहिली, तर चालेल का?”

डॉक्टर पायरोबरोबर पहिल्या मजल्यावर गेले. कॉर्नवर्दीच्या खोलीपेक्षा मिस्टर पार्कर यांची खोली खूपच मोठी होती. त्यात श्रीमंती थाटाचे फर्निचर होते. गुबगुबीत खुर्च्या होत्या. जाड गालीचा होता. प्रशस्त, सुंदर असे लिहिण्याचे टेबल होते.

खिडकीसमोरील गालिच्यावर पडलेले गडद डाग बघत, पायरो तिथे आला. त्याला रॉजर पार्करचे बोलणे आठवले, ‘तीन वाजून अठ्ठावीस मिनिटांनी मी, माझ्या टेबलाचा उजवीकडून दुसरा कप्पा उघडतो. त्यातील पिस्तुल काढतो त्यात गोळ्या भरतो आणि मग --- आणि मग मी स्वतःवर गोळी झाडतो.”

पायरोने हळूहळू मान हलवली. मग तो म्हणाला, “खिडकी अशीच उघडी होती का?”

“हो, पण तिथून कोण येणार होते?”

पायरोने खिडकीबाहेर डोके काढून पाहिले. तिथे वर चढून येण्यासारखे पाईप वा पॅरापिट असे काहीच नव्हते. एखादे मांजरही तिथून येऊ शकले नसते. विरुद्ध बाजूला कारखान्याची भिंत तुरुंगासारखी उभी होती. तिला खिडक्या नव्हत्या.

डॉ जॉन म्हणाला, “इतक्या श्रीमंत माणसाने स्वतःची रहायची जागा अशी निवडावी, हे हास्यास्पद आहे. हे समोरचे दृष्य तुरुंगाच्या भिंतीकडे पहाण्यासारखेच आहे.”

पायरोने डोके आत घेतले व विटांच्या त्या भक्कम भिंतीकडे पहात तो म्हणाला, “हो, ही भिंत महत्वाची आहे.”

डॉ जॉनने त्याच्याकडे आश्चर्याने पाहिले व म्हटले, “म्हणजे मानसशास्त्रीय दृष्ट्या म्हणत आहात का?”

पायरो टेबलाकडे आला. तो मुद्दम हळूहळू चालतो आहे, असे वाटत होते. त्याने एक लांबलचक चिमटा उचलला व पूर्ण उघडला. नाजूकपणे त्याने खुर्चीशेजारील काडेपेटीची काडी त्या चिमट्याने उचलून केराच्या टोपलीत टाकली.

डॉ जॉन चिडखोर सुरात म्हणाले, “जर तुमचे त्या खेळण्याशी खेळून झाले असेल, तर --- “

पायरो पुटपुटला, “वा वा, नामी शोध! मग त्याने परत चिमटा टेबलावर ठेऊन विचारले, “मिस्टर पार्कर यांच्या मृत्युच्या वेळी मिसेस पार्कर आणि जोएना पार्कर कुठे होत्या?”

मिसेस पार्कर त्यांच्या वरच्या मजल्यावरील खोलीत आराम करत होत्या. तर मिस जोएना एकदम वरच्या मजल्यावरील तिच्या स्टुडीओमध्ये चित्र रंगवत होती. पायरोने दोन मिनिटे त्याची बोटे टेबलावर वाजवली. मग

बोलला, “मला मिस जोएनाला भेटायचे आहे. तुम्ही तिला इथे बोलवाल का?”

“जशी तुमची इच्छा” हे म्हणतांना डॉ जॉनने पायरोकडे कुतुहलाने पाहिले व तो खोलीबाहेत पडला. दोन मिनिटातच जोएना आत आली.

“बाईसाहेब, तुम्हाला काही प्रश्न विचारले, तर चालेल का?”

जोएनाने थंडपणे पायरोकडे पाहिले व म्हटले, “काहीही विचारा. ”तुमचे वडील या कप्प्यात पिस्तुल ठेवतात, हे तुम्हाला माहिती होते का?”

“नाही.”

“तुम्ही आणि तुमची आई --- सावत्र आई, बरोबर ना? त्यावेळी कुठे होतात?”

“ल्युसी माझ्या वडिलांची दुसरी बायको आहे. तिच्यात आणि माझ्यात फक्त आठ वर्षांचे अंतर आहे. बर, तुम्ही काय म्हणत होतात?”

पायरोने विचारले, “गेल्या आठवड्यातील गुरुवारी, तुम्ही दोघी कुठे होतात? म्हणजे गुरुवारी रात्री?”

जोएनाने थोडा विचार केला. गुरुवारी? मी आठवून बघते --- हं आम्ही सिनेमाला गेलो होतो. ‘लिटील डॉग लाफ्ड’ नावाचा सिनेमा होता.

“तुमचे वडील तुमच्याबरोबर नव्हते का?”

“थिएटर मध्ये जाऊन सिनेमा बघायला त्यांना, मुळीच आवडत नसे.”

“संध्याकाळी ते काय करायचे?”

“ते इथे बसून वाचायचे.”

“ते फारसे लोकांमध्ये मिसळत नसत का?”

जोएनाने पायरोकडे रोखून बघितले. ती म्हणाली, “माझ्या वडिलांचे व्यक्तिमत्व अतिशय उग्र स्वरूपाचे होते. त्यांच्याजवळ रहाणाऱ्या कुणालाच ते आवडत नसत.”

“बाईसाहेब, हे फारच धारिष्ट्याचे विधान झाले, नाही का?”

“मी तुमचा वेळ वाचवत आहे. मिस्टर पायरो, तुम्ही काय विचार करता आहात, ते मी ओळखून आहे. माझ्या सावत्र आईने माझ्या वडिलांशी पैशांसाठी लग्न केले. दुसरीकडे कुठे रहाण्यासाठी माझ्याकडे पैसे नाहीत, म्हणून मी इथे रहाते. मला एका माणसाशी लग्न करायचे होते. तो गरीब होता. माझ्या वडीलांचा आमच्या लग्नाला विरोध होता. माझ्या वडिलांनी त्याची नोकरी घालवली. त्यांना माझ्यासाठी श्रीमंत नवरा हवा होता. कारण मी त्यांची वारस आहे.”

“तुझ्या वडिलांमुळे तुझे नशीब फळफळणर आहे.”

“हो. म्हणजे माझ्या सावत्र आईला त्यांनी टॅक्स पडणार नाही, असा इस्टेटीचा चौथा हिस्सा ठेवला आहे. उरलेली सर्व इस्टेट माझी होणार आहे.” हसतहसत जोएना म्हणाली, “म्हणजे असे बघा मिस्टर पायरो, मी

माझ्या वडीलांच्या मरणाची इच्छा करणे अगदी सहज शक्य आहे, नाही का?"

"ओहो, तुझ्या वडिलांची बुद्धिमत्ता तू चांगली उचलली आहेस."

जोएना विचारपूर्वक म्हणाली, "माझे वडील हुशार होते. त्यांच्याबरोबरचे लोक हे जाणून होते. पण ते सगळ संपल. सगळच उलटपालट झाल. आताच्या जगात माणुसकी शिल्लक नाही."

पायरो हळूवारपणे बोलला, "बाईसाहेब, हे न समजायला, मी काय मूर्ख माणूस आहे का?"

जोएना दाराकडे वळली. "अजून काही विचारायचे आहे का?"

टेबलावरील चिमटा उचलत पायरो म्हणाला, "दोन छोटे प्रश्न! हा चिमटा नेहमी इथे टेबलावरच असायचा का?"

"हो. वडील त्याने काहीबाही उचलत असत. त्यांना वाकायला आवडत नसे."

"आणखी एक प्रश्न! तुमच्या वडिलांची दृष्टी चांगली होती का?"

जोएना पायरोकडे एकटक बघत म्हणाली, "नाही. त्यांना स्पष्ट दिसत नसे. चष्म्याशिवाय त्यांना अजिबातच दिसत नसे. लहानपणा पासून त्यांची दृष्टी अधू होती."

"आणि चष्मा घालून?

"चष्मा घालून त्यांना अर्थातच व्यवस्थित दिसायचं."

“त्यांना बारीक मजकूर वाचता यायचा का?”

‘हो. हो.”

“ठीक आहे.”

जोएना खोलीबाहेर गेली.

पायरो स्वतःशी पुटपुटला, “मी मूर्खपणा करत होतो. ते सतत माझ्या नजरेसमोर होते. पण फार जवळ असल्याने बहुधा मला दिसत नव्हते.” त्याने एकदा खिडकीबाहेर ओणवून पाहिले. कारखान्याची भिंत व घरामधील अरुंद खोल जागेत त्याला लहानशी काळी वस्तू दिसली. हर्क्युल पायरो समाधानाने मान हलवत खाली गेला.

अजून बाकीचे सर्वजण वाचनालयात होते. पायरोने कॉर्नवर्दीशी बोलणे सुरु केले. “मिस्टर कॉर्नवर्दी, तुमच्याकडे माझे काम आहे. मिस्टर पार्कर यांनी मला बोलावले, तेव्हाचे बारीकसारीक तपशील मला हवे आहेत. मिस्टर पार्कर यांनी ते पत्र स्वतः सांगून तुमच्याकडून लिहून घेतले का? का? आणि कधी?”

“बुधवारी दुपारी साडेपाच वाजता, असे मला आठवते आहे.”

“ते पोस्ट करण्यासंबंधी काही विशेष सूचना होत्या का?”

“त्यांनी ते मला इतर कुणाकडे न देता स्वतः पोस्ट करायला सांगितले.”

“आणि तुम्ही तसे केले?”

“हो.”

“मी आलो तेव्हा दरवानाला काही विशेष सूचना दिलेल्या होत्या का?”

‘हो. त्यांनी मला दरवानाला असे सांगायला लावले, की तुम्ही येताच तुम्हाला माझ्या खोलीत पाठवावे.”

“असे का सांगितले असेल? तुम्हाला काय वाटते?”

कॉर्नवर्दीने मान हलवली. तो निर्विकार आवाजात बोलला, ”मी मिस्टर पार्कर यांना कधीही उलट प्रश्न करत नसे. मी तसे केले असते, तर ते त्याना ते आवडले नसते.”

“पाहुण्यांना ते नेहमी त्यांच्या खोलीत भेटत असत का?”

“बऱ्याचदा. पण नेहमी नव्हे. कधीकधी ते इतरांना माझ्या खोलीतही भेटत.”

“यामागे काही कारण होते का?”

कॉर्नवर्दी थोडा विचारात पडला. “नाही. काही खास कारण असेल, असे मला वाटत नाही. खरे तर मी असा कधी विचारच केला नाही. ते सांगायचे, ते मी ऐकायचो.”

पायरोने मिसेस पार्करकडे वळून विचारले, “मी तुमच्या दरवानाला भेटलो, तर चालेल का?”

“काहीच हरकत नाही.”

तिने घंटी वाजवताच दरवान येऊन हजर झाला. तो बोलला, “बाईसाहेब, आपण मला बोलावले का?”

मिसेस पार्करनी खुणेने पायरोकडे बोट दाखवले. तेव्हा पायरोकडे वळून तो म्हणाला, “काय सर?”

“गुरुवारी रात्री मी इथे आलो, तेव्हा तुझ्यासाठी काय सूचना होत्या?”

घसा खाखरुन तो बोलला, “जेवणानंतर मला मिस्टर कॉर्नवर्दी म्हणाले, की मिस्टर पार्कर यांना भेटण्यासाठी हर्क्युल पायरो रात्री साडेनऊला येणार आहेत. त्यांचे नाव विचारून, त्यांच्याकडील पत्राची शहानिशा करायला, मला त्यांनी सांगितली होती. नंतर त्याना कॉर्नवर्दीच्या खोलीत घेऊन जायचे होते.”

पायरोने रोखून बघत प्रश्न केला, “दारावर टकटक करण्याबद्दलही तुला सांगण्यात आले होते का?”

दरवानाने नापसंतीदर्शक चेहरा केला. ”तशी मिस्टर पार्कर यांचीच आज्ञा होती. कुणी भेटायला आले, की मी नेहमीच असे करत असे.”

“त्याचेच मला नवल वाटले. माझ्यासंबंधी तुला अजून काही सूचना होत्या का?”

“नाही, सर. मिस्टर कॉर्नवर्दीच्या सूचना मी ऐकून घेतल्यावर, ते निघून गेले.”

“तेव्हा किती वाजले होते?”

“नऊला दहा मिनिटे होती.”

“नंतर तू मिस्टर पार्करना पाहिलेस?”

“हो. मी नेहमीप्रमाणे नऊ वाजता त्यांना गरम पाणी नेऊन दिले.”

“तेव्हा ते त्यांच्या खोलीत होते, की मिस्टर कॉर्नवर्दीच्या खोलीत?”

“ते त्यांच्याच खोलीत होते.”

“तुला त्या खोलीत काही वेगळे जाणवले का?”

“वेगळे? नाही, सर.”

“मिसेस पार्कर आणि मिस जोएना कुठे होत्या?”

“त्या सिनेमाला गेल्या होत्या.”

“आभारी आहे. आता तू गेलास, तरी चालेल.”

दरवान अदबीने झुकून बाहेर गेला. पायरोने खिडकीकडे मोर्चा वळवला.

“आणखी एक प्रश्न विचारतो, मिसेस पार्कर. “तुमच्या यजमानांची दृष्टी चांगली होती का?

“नाही. चष्म्याशिवाय त्यांना मुळीच दिसायचे नाही.”

“त्यांना जवळचे दिसायचे की नाही?”

“नाही. चष्म्याशिवाय, ते पूर्ण हतबल होते.”

“त्यांच्याकडे बरेच चष्मे होते का?”

“हो.”

पायरो मागे झुकून म्हणाला, “आता या केसचा निकाल लागला.”

खोलीत शांतता पसरली. मोठ्या समाधानाने स्वतःच्या मिशांवर हात फिरवत बसलेल्या त्या छोट्या माणसाकडे, सगळे बघत राहिले. इन्स्पेक्टरचा चेहरा गोंधळलेला होता. डॉ जॉनच्या कपाळावर आठ्या उमटल्या होत्या. मिस्टर कॉर्नवर्दी काहीच न समजल्यासारखे, टक लाऊन बघत होते. मिसेस पार्कर चकित नजरेने बघत होत्या. जोएनाच काय ती उत्सुक वाटत होती.

मिसेस पार्करनी शांतताभंग केला. गोंधळलेल्या आवाजात त्या म्हणाल्या, “मिस्टर पायरो, मला कळत नाही --- ते स्वप्न --- “

पायरो म्हणाला, “हो. ते स्वप्न महत्वाचे होते.”

मिसेस पार्कर शहारून म्हणाल्या, “अमानुष, अघोरी घटनांवर माझा कधीच विश्वास नव्हता. पण आता --- मृत्युपूर्वी त्याना सतत पडणारे ते स्वप्न --- “

डॉ जॉन म्हणाला, “ते विचित्रच आहे खरे! फारच विचित्र! पार्करने स्वतः ते तुम्हाला सांगितले नसते, आणि त्यावरचे तुमचे भाष्य आम्हाला माहिती नसते, तर कदाचित --- “ किंचित खाखरून डॉक्टर गप्प झाले.

पायरो म्हणाला, “तेच तर!” त्याचे अर्धवट मिटलेले डोळे अचानक उघडले व हिरवे गडद झाले. “जर मिस्टर पार्करनी मला हे सांगितले नसते तर --- “ तो थोडा थांबला व सर्वांकडे बघत म्हणाला, “त्या संध्याकाळी कायकाय झाले, हे तुम्हाला सर्वांना माहिती होते, असे तुम्ही सांगितले. पण त्याचे स्पष्टीकरण मला देता येत नव्हते. सर्वप्रथम मला खटकलेली गोष्ट म्हणजे, मला ते पत्र बरोबर घेऊन यायला सांगणे! त्याचे एवढे काय महत्व होते?”

कॉर्नवर्दीने सुचवले, “ओळखपत्र म्हणून आणायला सांगितले असेल.”

“नाही. नाही, महाशय. खरे तर त्यामागील कल्पना वेगळीच होती. त्याचे खास वेगळे कारण होते. केवळ माझी ओळख पटवण्यासाठी ते मिस्टर पार्करना हवे होते, असे नाही, तर मी ते त्यांच्या टेबलावर ठेऊन जावे, असा त्यांचा आग्रह होता. मी ते दिल्यावरही त्यांनी ते नष्ट केले नाही. आज दुपारी ते त्यंच्या टेबलावरील कागदपत्रांमध्ये मिळाले. त्यांनी ते इतके जपून का ठेवले?”

जोएना एकदम चिरक्या आवाजात म्हणाली, ”जर त्यांना काही झाले, तर त्यांच्या त्या विचित्र स्वप्नाबद्दल सर्वांना कळावे, अशी त्यांची इच्छा असणार.”

पायरोने मान डोलावून सहमती दर्शवली आणि तो म्हणाला, “बाईसाहेब, तुम्ही अगदी अचूक सांगितले आहे. तेच तर पत्र ठेवायचे

कारण असणार. जेव्हा मिस्टर पार्कर यांचा मृत्यू होईल, तेव्हा स्वप्नाची गोष्ट सांगितली जावी, हाच उद्देश त्यामागे असणार. ते स्वप्न फार महत्वाचे होते. फारच महत्वाचे!"

पायरोने बोलणे पुढे चालू ठेवले. "आता मी दुसऱ्या मुद्द्याकडे वळतो. ती स्वप्नाची गोष्ट ऐकल्यावर, मी मिस्टर पार्करना ते टेबल व पिस्तुल मला दाखवण्याची विनंती केली. ते दाखवण्यासाठी अर्धवट उठल्यावर, ते अचानक परत खाली बसले. त्यांनी असे करायचे काय कारण? ती जागा आणि पिस्तुल दाखवायला, ते का तयार नव्हते?

यावेळेस कुणीच उत्तर दिले नाही.

"आता हाच प्रश्न, मी वेगळ्या पद्धतीने मांडतो. दुसऱ्या, म्हणजे लागून असलेल्या खोलीत असे काय होते, की जे मी पाहू नये असे, मिस्टर पार्करना वाटत होते?"

अजूनही सर्वत्र शांतता होती.

पायरो बोलला, "हे समजणे अवघड आहे. पण मिस्टर पार्कर मला त्यांच्या सचिवाच्या खोलीत का भेटले, यामागे काहीतरी अगदी महत्वाचे कारण असणार. नक्कीच त्या खोलीत मी बघू नये, असे काहीतरी असणार.

"आणि आता तिसरी स्पष्ट न होणारी गोष्ट! त्या संध्याकाळी मी निघतानिघता मिस्टर पार्करनी माझ्याकडे पत्र मागितले. मी चुकून लॉन्ड्रीची पावती दिली. त्यांनी ती बघून खालती ठेवली. खोलीतून बाहेर जाण्यापूर्वी,

मला माझी चूक उमगली आणि मी ती सुधारली. नंतर मी त्या घरातून बाहेर पडलो आणि मला कबूल केले पाहिजे, की मी पूर्णपणे गोंधळून गेलो होतो. ही घटना आणि त्यातल्या त्यात हा शेवटचा भाग मला फारच खटकला. तुम्हाला नाही खटकत?"

पायरो एकेकाकडे पाहू लागला.

डॉ जॉन बोलता झाला, "त्या लॉन्ड्रीच्या पावतीचे एवढे काय घेऊन बसला आहात, मला कळतच नाही."

पायरो म्हणाला, "ती पावती फार महत्वाची आहे. माझ्या शर्टाच्या कॉलरचे नुकसान करणारा धोबी आयुष्यात पहिल्यांदाच कुणाच्यातरी उपयोगी पडला असेल! असो, हे अगदी उघड आहे, की मिस्टर पार्करनी पत्रावर नजर टाकली, तेव्हाच त्यांना हे कळायला हवे होते, की हे चुकीचे पत्र आहे. पण त्यांना काहीच कळले नाही. का? कारण त्यांना नीट दिसत नव्हते."

इन्स्पेक्टर बार्नें कोरडेपणे म्हणाले, "त्यांनी तेव्हा चष्मा घातला नव्हता का?"

पायरो हसला व म्हणाला, "त्यांनी चष्मा घातला होता. म्हणून ही बाब जास्त मनोरंजक झाली आहे."

पायरो पुढे झुकला "मिस्टर पार्कर यांचे स्वप्न फार महत्वाचे होते. तुम्हाला माहिती आहे, की स्वप्नात त्यांनी आत्महत्या केली, आणि

त्यानंतर जागेपणी त्यांनी खरोखरच आत्महत्या केली. याचा अर्थ त्यावेळी खोलीत ते एकटे होते. आणि पिस्तुल बाजूला पडलेल्या अवस्थेत सापडले. ते स्वतःला मारून घेत असतांना, खोलीत कुणी आले नाही, की गेले नाही. याचा अर्थ काय होतो? सरळ अर्थ होतो, की ती आत्महत्या होती.''

डॉ जॉन दुजोरा देत म्हणाले, ''बरोबर''

पायरोने मान हलवली व म्हणाला, ''माफ करा. पण हे बरोबर नाही. खरे तर तो खून होता. अगदी वेगळ्या प्रकारे हुशारीने आखून केलेला खून होता.'' बोलताबोलता पायरो पुढे वाकला .टेबलावर बोटे नाचवताना त्याचे हिरवे डोळे चमकत होते. चेहऱ्यावर हसू खेळवत, तो बोलू लागला, ''मिस्टर पार्करनी मला त्यांच्या खोलीत का जाऊ दिले नाही? मी पाहू नये, असे तिथे काय होते? मित्रांनो, मला वाटते, तिथे मिस्टर पार्कर स्वतःच होते.''

सर्वांचे कोरे चेहरे पाहून पायरो हसला. ''मी जे सांगतो आहे, ते निरर्थक नाही. मी ज्यांच्याशी बोलत होतो, त्या मिस्टर पार्करना दोन पत्रातील फरक का कळला नाही? असे बघा, त्या सर्वसामान्य, म्हणजे चांगली दृष्टी असलेल्या माणसाने जाड भिंगाचा चष्मा घातला होता. त्यामुळे त्याला काही दिसत नव्हते. जवळजवळ आंधळ्याचीच अवस्था होती म्हणा ना! डॉक्टर, बरोबर ना?''

डॉ जॉन पुटपुटले, ''अर्थात असेच होते.''

“मिस्टर पार्कर यांच्याबरोबर बोलतांना मला एखाद्या नाटकात काम करणाऱ्या नटाशी बोलतो आहोत, असे वाटत होते. का? कारण ते तसेच होते. सर्व नेपथ्याचा, आजूबाजूच्या रचनेचा विचार करा. मंद प्रकाशाची खोली, मिस्टर पार्करवर प्रकाश पडणार नाही, असा अगदी फिकट हिरव्या उजेडाचा दिवा. मला काय दिसले, तर जुना ठिगळे लावल्यासारखा दिसणारा गाउन, चोचीसारखे बाकदार, प्लॅस्टिक सर्जरीमध्ये बनवतात तसे खोटे नाक, पांढऱ्या केसांची कपाळावर रुळणारी बट, जाड भिगाचा चष्मा आणि त्यामागे चकाकणारे गूढ डोळे! मिस्टर पार्करना ती स्वप्न पडत होती, हे खरे कशावरून? पुरावा काय? फक्त मला सांगितली गेलेली गोष्ट आणि मिसेस पार्कर तसे म्हणाल्या म्हणून! मिस्टर पार्कर टेबलाच्या खणात पिस्तुल ठेवत असत, याला पुरावा काय? तर त्यांनी मला सांगितले म्हणून. मिसेस पार्कर व मिस्टर कॉर्नवर्दी या दोघांनी मिळून हा गुन्हा केला आहे. मला पत्र कॉर्नवर्दीनेच लिहिले. दरवानाला सूचना दिल्या. सिनेमाला गेल्याचे सोंग केले. पण किल्ली वापरून, तो पुन्हा आला आणि त्याच्या खोलीत जाऊन, मिस्टर पार्कर यांचे बेमालूम सोंग घेऊन, तयार झाला आणि तो म्हणजेच मिस्टर पार्कर, असे मला भासवले.

“अशा तऱ्हेने आजची दुपार उजाडलेली आहे. मिस्टर कॉर्नवर्दी शोधत असलेली संधी आली आहे. मिस्टर पार्करच्या खोलीत कुणीही आले गेले नाही, हे सांगणारे दोन साक्षीदार आहेत. रस्त्यावरून जड वाहने जोरात आवाज करत जाण्याची विशिष्ट वेळ साधेपर्यंत, कॉर्नवर्दी थांबतो.

मग तो त्याच्या खिडकीतून बाहेर वाकतो आणि पार्करच्या खोलीतून चोरलेल्या चिमट्याने तो एक वस्तू पार्करच्या खिडकीबाहेर धरतो. मिस्टर पार्कर खिडकीपाशी येतात --- कॉर्नवर्दी चिमटा मागे घेतो. खाली पडलेली वस्तू पहात, मिस्टर पार्कर खिडकीतून वाकलेले असतांना, आणि खालून वाहनांचे कर्कश आवाज येत असतांना, तयार ठेवलेल्या पिस्तुलातून कॉर्नवर्दी गोळी झाडतो. तुम्हाला आठवत असेल, की विरुद्ध बाजूला कारखान्याची भिंत आहे. तुरुंगासारखी भिंत! त्यामुळे गुन्हा बघणारे कुणी नाही. कॉर्नवर्दी अर्धा तास थांबतो. मग काही कागद गोळा करतो. चिमटा आणि पिस्तुल त्या कागदात लपवतो आणि बाहेर येऊन, मिस्टर पार्कर यांच्या खोलीत जातो. चिमटा परत टेबलावर ठेवतो. मृत मनुष्याच्या हातात पिस्तुल ठेवतो आणि घाईघाईने बाहेर येऊन, मिस्टर पार्कर यांच्या आत्महत्येची बातमी देतो. “मला पाठवलेले पत्र कॉर्नवर्दी अशा तऱ्हेने टेबलावर ठेवतो, की ते कुणालाही सहज सापडेल. मी तिथे येऊन स्वप्नाची गोष्ट सांगेन, असे बघतो --- मिस्टर पार्कर यांच्या स्वतःच्याच तोंडून मी ऐकलेली विचित्र स्वप्नाची गोष्ट --- स्वतःलाच मारायला उद्युक्त करणारे, ते स्वप्न! हलक्या कानांचे लोक भूल पाडणाऱ्या गोष्टींची चर्चा करत बसतील, पण दिसेल हेच की पिस्तुल धरणारे हात स्वतः मिस्टर पार्कर यांचे आहेत. अगदी नक्की असेच दिसेल!

पायरोची नजर मिसेस पार्करच्या चेहऱ्याकडे गेली. दुःखी, पडलेला हताश चेहरा व त्यावर भीतीची गडद छाया!

पायरो पुढे बोलला, "आणि यथावकाश इस्टेटीचा चौथा हिस्सा आणि मग दोन हृदयांचे मिलन!

पायरो व डॉ जॉन नॉर्थ वे हाउसच्या बाजूने चालू लागले. त्यांच्या उजव्या बाजूला कारखान्याची भिंत होती. त्याच्या वरच्या बाजूला डावीकडे मिस्टर पार्कर व मिस्टर कॉर्नवर्दी यांच्या खोल्यांच्या खिडक्या होत्या. पायरो थांबला. त्याने एक लहानशी वस्तू उचलली. ते एक खोटे काळे मांजर होते.

"ओहो! कॉर्नवर्दीने मिस्टर पार्करच्या खिडकीशी चिमट्याने धरलेली ती ही वस्तू होती. तुम्हाला आठवले असेल, की मिस्टर पार्करला काळी मांजरे आवडत नसत. त्यामुळे अगदी सहजच ते मांजराला हाकलायला खिडकीशी गेले असणार."

"पण कॉर्नवर्दीने ते खिडकीतून पाडलेले खोटे काळे मांजर उचलले का नाही?"

"तो असे कसे करणार? ते संशयास्पद दिसले असते. शेवटी हे मांजर जरी सापडले, तरी कुणीही काय म्हणणार? एखाद्या मुलाने खेळतांना चुकून ते इथे टाकले असणार, असेच ना?"

डॉ जॉन सुस्कारा टाकत म्हणाले, "मला वाटले, तुम्ही काहीतरी अवघड, ढोंगीपणाची, मानसशास्त्रीय दृष्ट्या सुचलेल्या खुनाची गोष्ट सांगत बसणार. त्या दोघांनीही तसाच विचार केला असणार. बिचारा पार्कर! बाप

रे! मिसेस पार्कर कशा मोडून गेल्या आहेत, बघा. कॉर्नवर्दीने संतापून, नखांनी ओरबाडून, तुमच्यावर हल्ला करून, तुम्हाला विद्रूप करायचा प्रयत्न केला नसता, तर कदाचित तो या गुन्ह्यातून सुटला असता. त्या हल्ल्यापासून, मी तुम्हाला अगदी वेळेवर वाचवले असे समजा."

डॉक्टर क्षणभर थांबून म्हणाले, "त्यापेक्षा ती मुलगी मला आवडली. काय डोके आहे! काय धाडस आहे! जर तिची भेट झालीच, तर मला तिच्याबरोबर डेटिंग करायला आवडेल."

"माझ्या मित्रा, त्याला फार उशीर झाला आहे. तुझ्या आधीच त्या जागी कुणीतरी हजर आहे. तिच्या वडीलांच्या मृत्यूने तिचा आनंदाचा मार्ग खुला केला आहे."

"म्हणजे तसे पाहता, तिला नकोशा असणाऱ्या पालकाला तिच्या मार्गातून दूर करायचा हेतू चांगला होता."

पायरोने स्पष्ट केले, "हेतू असणे आणि संधी मिळणे एवढे पुरेसे नसते. त्यासाठी गुन्हेगारी वृत्तीदेखील असावी लागते."

डॉ जॉन चेष्टेखोर सुरात म्हणाले, " मला नवल वाटते पायरो, तुम्ही कधी गुन्हा कराल का? माझी खात्री आहे, तसे केल्यास तुम्ही सहीसलामत सुटाल. तो तर तुमच्या हातचा मळ आहे."

पायरो हसत उद्गारला, "हो, अगदी टिपिकल इंग्लिश कल्पना आहे, बर का! मात्र मला ती शक्य कोटीतील वाटत नाही."

# TRIANGLE AT RHODES

# ऱ्होड्समधील त्रिकोण



हर्क्युल पायरो पांढऱ्या वाळूवर बसला आणि चकाकणाऱ्या निळ्या पाण्याकडे बघत राहिला. त्याने काळजीपूर्वक रीत्या फॅशनचा पांढऱ्या फ्लॅनेलचा ड्रेस केला होता व मोठी पनामा टोपी त्याच्या डोक्याचे रक्षण करत होती. तो जुन्या पिढीचा होता. स्वतःचे सूर्यापासून रक्षण करण्यावर त्याचा विश्वास होता. त्याच्या शेजारी बसलेली मिस पामेला लायल अखंडपणे बोलत होती. ती नवविचारांची होती. त्यामुळे तिने तिच्या रापलेल्या कातडीवर अगदी तोकडे कपडे घातले होते. प्रसंगवशात तिचा

संभाषणाचा ओघ थांबत होता. तेव्हा ती तिच्याशेजारी असलेल्या बाटलीतून तेलकट द्राव अंगाला चोपडत होती.

पामेला लायलच्या पलीकडील बाजूला तिची थोर मैत्रिण सारा ब्लेक भडक रंगाच्या पट्टेरी टॉवेलवर तिचा चेहरा खाली करून झोपली होती. तिची कातडी जितकी होणे शक्य होती तेवढी पूर्णपणे रापली होती आणि तिची मैत्रिण तिच्याकडे बरेच वेळा असमाधानाचे कटाक्ष टाकत होती.

ती खेदपूर्वक पुटपुटली, "माझ्या अंगावर अजून इतके डाग आहेत. मिस्टर पायरो --- तुम्ही एक काम कराल का? उजव्या खांद्याखाली माझा हात नीट पोचत नाही. तिथे जरा खाजवाल का?"

मिस्टर पायरोने विनंतीला मान देत त्याचा तेलकट हात त्याच्या रुमालाला काळजीपूर्वक पुसला. मिस लायलचा आयुष्यातील रस एवढाच होता, की तिच्याभोवतालच्या लोकांचे निरीक्षण करणे आणि सतत बडबड करणे.

दूरदर्शन वाहिनीचे मॉडेल असलेल्या त्या स्त्रीबद्दलचा माझा अंदाज बरोबर होता. व्हॅलेंटीना डॅक्रेस --- चँट्री, असे मला म्हणायचे होते. असे मला वाटले. मी तिला लगेच ओळखले. ती खरेच खूप छान आहे, नाही का? म्हणजे लोक तिच्यासाठी कसे वेडे होत असतील, ते मला समजले आहे. आणि तिलाही तशी अपेक्षा असेल. ही अर्धी लढाई झाली. काल

रात्री आलेल्या इतर लोकांचे नाव गोल्ड आहे. तो दिसायला फार चांगला आहे.”

उकाड्यामुळे श्वास घ्यायला त्रास होत असलेल्या आवाजात सारा पुटपुटली, “हनिमूनला आलेले?”

मिस लायलने सराईतासारखे डोके हलवले. “ओहो, नाही. तिचे कपडे काही नवे वाटत नाहीत. तुम्हाला नववधू नेहमी ओळखू येतात. लोकांचे निरीक्षण करणे, ही जगातील सर्वात लोभस गोष्ट आहे, असे तुला वाटत नाही का? मिस्टर पायरो, तुम्ही त्यांच्याकडे नुसते बघून, काय काय शोध लावू शकता?”

सारा गोडपणे म्हणाली, “अग, नुसते बघून नव्हे तर अनेक प्रश्न विचारुनही.”

मिस लायला आब राखत बोलली, “मी अजून गोल्ड लोकांशी बोललेदेखील नाही. आणि मला समजत नाही, की एखाद्याला त्याच्या बरोबरच्या लोकांमध्ये स्वारस्य का असेल? मानवी स्वभाव भुरळ घालणारा आहे. मिस्टर पायरो, तुम्हाला असे वाटत नाही का?”

यावेळेस तिच्या सहकाऱ्याने उत्तर देण्यासाठी, ती खूप वेळ थांबली.

त्याची दृष्टी निळया पाण्यावरून ढळू न देता, मिस्टर पायरो उत्तरले. “ते अवलंबून आहे.”

पामेलाला धक्का बसला.

“ओहो, मिस्टर पायरो, मला कुठलीच गोष्ट एवढी रस घेण्यासारखी वाटत नाही. मानवाइतके अतर्क्य काहीही नाही.”

“अतर्क्य? नाही. नाही.”

“पण ते तसे असतात. असा विचार करा. --- ते अजिबात अपेक्षा नसलेले काहीही करू शकतात.”

हर्क्युल पायरोने डोके हलवले.

“नाही, ते खरे नाही. कोणीही त्याच्या मनात नसलेली कृती करू शकत नाही. शेवटी ते एकसुरी ठरते.”

मिस पामेला लायल म्हणाली, “मी तुमच्याशी मुळीच सहमत नाही.”

पुन्हा शाब्दिक हल्ला करण्यापूर्वी, ती एक दीड मिनिट गप्प राहीली.

लोकांना पाहिल्याबरोबर मला त्यांच्याविषयी नवल वाटू लागते --- ते कसे आहेत --- त्यांचे आपापसात काय नाते आहे --- ते काय विचार करतात व त्यांच्या भावना काय आहेत. ओहो, मला हे खूप रुचीपूर्ण वाटते.”

पायरो विचारपूर्वक म्हणाला, “असे क़्वचित असते. एखादा कल्पना करू शकेल, त्याच्या कितीतरी पट वेळा निसर्ग, त्याच त्याच गोष्टी पुन्हा पुन्हा करत असतो. समुद्र खूप वेगवेगळ्या प्रकारचा असतो.”

साराने तिचे तोंड कडेला वळवून विचारले, “तुम्हाला असे वाटते का, की मानव वेगवेगळे आकृतीबंध तयार करतो? ठरलेल्या स्वरूपाचे आकृतीबंध?

पायरो म्हणाला, “नेमकेपणे.” आणि बोटाने वाळूत काही आकृती काढू लागला.

पामेलाने उत्सुकतेने विचारले, “तुम्ही काय काढत आहात?”

पायरो बोलला, “एक त्रिकोण.”

पण पामेलाचे लक्ष कुठेतरी दुसरीकडे गेले होते. ती म्हणाली, “इथे धर्मादाय संस्थेने लोकार्पण केलेली प्रार्थनास्थळे आहेत.

समुद्रकिनारी एक बाई येत होती --- स्वतःबद्दल व स्वतःच्या शरीराबद्दल जागरूक असणारी, उंच बाई. ती अर्धवट मान हलवत व हसत, थोड्या अंतरावर तिथे बसली. शेंदरी व सोनेरी वस्त्र तिच्या खांद्यांवरून ओघळले. तिने पांढरा पोहायचा ड्रेस घातला होता.

पामेलाने सुस्कारा टाकला. “तिचा बांधा किती कमनीय आहे, नाही का?”

पण पायरो तिच्या चेहऱ्याकडे बघत होता --- सोळाव्या वर्षापासून सुंदर म्हणून प्रसिद्ध असलेल्या एकोणचाळीस वर्षाच्या बाईचा चेहरा!

सगळ्यांना माहिती होते, तसेच त्यालाही व्हॅलेंटीना चँट्रीबद्दल सर्व काही माहिती होते. ती खूप गोष्टींसाठी प्रसिद्ध होती. तिच्या बदलणाऱ्या

मनस्थितीबद्दल, संपत्तीबद्दल. मोठ्या निळया डोळयांबद्दल, लग्नाच्या आणि इतर साहसांबद्दल. तिला पाच नवरे आणि अगणित चाहते होते. तिचा एक नवरा इटालियन उमराव होता. ती एकदा एका स्टीलच्या व्यवसायात राजा असलेल्याची, एकदा मोटारीच्या शर्यतीत भाग घेणाऱ्याची व नंतर व्यायसायिक टेनिस खेळणाऱ्याची पत्नी होती. यापैकी चार अमेरिकन्स वारले. आणि बाकीचे घटस्फोटाच्या कोर्टात दुर्लक्षित राहिले. सहा महिन्यांपूर्वी तिने नेव्हीतील कमांडरशी पाचवे लग्न केले.

तो किनाऱ्यावरून तिच्यामागे धावत सुटला होता. शांत, गडद --- वादोत्सुक जबडा आणि वाईट आविर्भाव. त्याच्यामध्ये ऐतिहासिक शेपटीहीन महाकाय गोरीलासारख्या प्राण्यांची छटा होती.

ती म्हणाली, "प्रिय टोनी, माझी सिगरेट केस --- "

त्याच्याकडे ती तिच्यासाठी तयार होती --- त्याने सिगरेट पेटवली --- पांढऱ्या पोहायच्या पोषाखाचे पट्टे खांद्यावरून सरकवायला तिला मदत केली. ती उन्हामध्ये हात पसरून पडली. तो त्याच्या भक्ष्याची राखण करणाऱ्या एखाद्या रानटी पशूसारखा तिच्या शेजारी बसला.

पामेला खूप खालच्या आवाजात म्हणाली, "तुम्हाला माहिती आहे का, मला त्यांच्यात भीतीदायक रीत्या --- स्वारस्य वाटते. तो इतका दुष्ट आहे! इतका शांत आणि --- काहीसा चकाकणारा. मला वाटते, तिच्यासारख्या बाईला ते आवडते. ते वाघावर हुकमत गाजवल्यासारखे आहे. मला नवल वाटते, हे किती टिकेल. माझा विश्वास आहे --- विशेषतः

हल्ली --- तिला लवकरच त्याचा कंटाळा येईल. तिने त्याच्यापासून सुटका करून घेण्याचा प्रयत्न केला, तर मला वाटते तो धोकादायकपणे आक्रमक होईल.”

दुसरे एक लाजरे युगुल तिथे आले. ते आधीच्या रात्रीसारखे नवीन होते. मिस लायलने हॉटेलच्या वहीत पाहिल्याप्रमाणे ते मिस्टर आणि मिसेस डग्लस गोल्ड होते. इटालियन नियम तसे असल्याचे तिला माहिती होते --- त्यांची मूळ नावे आणि वये त्यांच्या पासपोर्टवरून घेतली होती.

मिस्टर डग्लस कॅमेरॉन गोल्ड एकतीस वर्षांचे व मिसेस मार्जोरी एम्मा गोल्ड पस्तीस वर्षांची होती.

मिस लायलचा आयुष्यातील छंद म्हणजे माणसांचा अभ्यास होता. आठवड्यातील चार दिवस नुसते चाचपणी करण्यात घालवून, काळजीपूर्वक बोलायला सुरवात करण्याच्या ब्रिटीश सवयीपेक्षा वेगळा असा, अनेक इंग्लिश लोकांप्रमाणे तिच्यात नसलेला गुण म्हणजे ती अनोळखी लोकांशी बोलू शके. तिने मिसेस गोल्डचा लाजाळूपणा व कां कू करणे बघून, तिला हाक मारली.

“सुप्रभात, आजचा दिवस किती छान आहे, नाही का?

ती लहानशी --- छोट्याशा उंदरासारखी बाई, मिसेस गोल्ड, ती दिसायला काही वाईट नव्हती. तिचे नाक डोळे नीटनेटके होते. कांती सतेज होती. पण तिच्यात थोडा लाजाळूपणा व कमीपणाची भावना होती, त्यामुळे

ती दुर्लक्षित रहात होती. तर दुसरीकडे तिचा नवरा जवळजवळ एखाद्या नटासारखा दिसायला फारच छान होता. खूप गोरा, कुरळे केस, रुंद खांदे, निळे डोळे, अरुंद मागील भाग. तो खऱ्या आयुष्यातील माणसापेक्षा, नाटकसिनेमातील माणूस वाटत होता. पण त्याने तोंड उघडल्याबरोबर ते वाटणे संपले. त्याचा देखणेपणा नैसर्गिक, कसलाही काही परिणाम न झालेला होता. पण तो काहीसा मूर्ख होता.

मिसेस गोल्डने पामेलाकडे ऋणाइत असल्यासारखे पाहिले आणि तिच्याशेजारी बसली.

"तुमचा रंग किती छान तपकिरी झाक असलेला आहे! मला फार न्यूनगंड येतो आहे."

मिस लायल सुस्कारा टाकत बोलली, "असा सारखा तपकिरी रंग येण्यासाठी बराच त्रास घ्यावा लागतो." मिनिटभर थांबून, ती म्हणाली, "तुम्ही आताच आलात का?"

"हो, काल रात्री. आम्ही व्हापो डी'इटालीना बोटीने आलो."

"तुम्ही यापूर्वी कधी ऱ्होडसला आला होतात का?"

"नाही. हे मस्त आहे, नाही का?"

तिचा नवरा बोलला, "पण हे अंतर फार आहे."

"हो, हे इंग्लंडला जरा जवळ असते, तर --- "

हळू आवाजात सारा म्हणाली, “हो, पण मग ते भयंकर असते. लाटांवरील माशांसारखी लोकांची गर्दीच गर्दी झाली असती. सगळीकडे माणसेच माणसे!”

डग्लस गोल्ड म्हणाला, “अर्थात, ते खरे आहे. इथले इटालियन नोटा बदलायचे ठिकाण इतके बेकार आहे! तिथे जायचे म्हणजे त्रासच आहे.”

“त्याने फरक पडतो, नाही का?”

संभाषण कृत्रिमपणे चालले होते. ते बुद्धिमान नक्कीच म्हटले गेले नसते.

किनाऱ्यावर थोड्या अंतरावर, व्हॅलेंटीना चँट्री हालचाल करत बसली होती. एका हाताने तिने तिचा पोहायचा पोषाख छातीवर आडवा धरला होता.

तिने जांभई दिली. रानटी, तरीही नाजूक मांजरीसारखी जांभई. तिने किनाऱ्यावर एक दृष्टीक्षेप टाकला. मार्जोरी गोल्डवर तिची नजर उतरली --- आणि डग्लस गोल्डच्या सोनेरी डोक्यावर स्थिर झाली.

तिने बाकदारपणे तिचे खांदे हलवले. जरुरीपेक्षा जास्त चढलेल्या आवाजात, ती बोलली, “प्रिय टोनी, हा सूर्य किती स्वर्गीय आहे, नाही का? तुला असे वाटत नाही का, की आपण फक्त सूर्याचे उपासक असलो पाहिजे?”

तिच्या नवऱ्याने उत्तरादाखल, काही कुजबुज केली. पण ती ऐकू आली नाही. आळसटलेल्या हळूवार आवाजात व्हॅलेंटीना चँट्री बोलत राहिली, “प्रिय, तो टॉवेल थोडासा ओढशील का?”

तिचे सुंदर शरीर हलवण्यासाठी तिने अमाप कष्ट घेतले. डग्लस गोल्ड बघत होता. त्याचे डोळे मोकळेपणे तिच्यात रुची घेत होते.”

मिसेस गोल्डने आनंदाने मोठ्या विचारपूर्वक आवाजात, मिस लायलला शांतपणे म्हटले, “किती सुंदर बाई आहे!”

पामेलाने हे ऐकल्यावर, आनंदाने हळू आवाजात उत्तर दिले, “तुला माहिती आहे का, ती व्हॅलेंटीना चँट्री आहे --- ती देखणी आहे, नाही का? तो तिच्यासाठी वेडा झाला आहे --- तिला तो नजरेसमोरून हलू देत नाही!”

मिसेस गोल्डने परत एकदा किनाऱ्यावर नजर टाकली. मग

ती म्हणाली, “समुद्र खरेच मस्त आहे --- इतका निळा. डग्लस, आपण त्याच्या आत जायला पाहिजे, नाही का?”

तो अजूनही व्हॅलेंटीना चँट्रीकडे बघत होता. त्यामुळे त्याने उत्तर द्यायला एकदोन मिनिटे घेतली. मग तो भानावर नसल्यासारखा बोलला, “आत जाऊ या? हो. एका मिनिटात.”

मार्जोरी गोल्ड उठली आणि पाण्याच्या दिशेने जाऊ लागली.

व्हॅलेंटीना चँट्री लोळत थोडीशी एका कडेला गेली. तिचे डोळे डग्लस गोल्डकडे बघत होते. तिचे शेंदरी ओठ हसल्यामुळे थोडेसे धनुष्याकृती झाले.

मिस्टर डग्लस गोल्डची मान थोडी लाल झाली.

व्हॅलेंटीना चँट्री म्हणाली, “प्रिय टोनी, मला तोंडाला लावायच्या क्रीमचे लहानसे भांडे हवे आहे, ते कृपया देशील का?” ते ड्रेसिंग टेबलवर आहे. म्हणजे मला म्हणायचे आहे, की ते आण. माझ्यासाठी ते आणतोस का? तू म्हणजे देवदूतच आहेस.

कमांडर आज्ञाधारकपणे उठला व हॉटेलच्या दिशेने चालू लागला.

मार्जोरी गोल्ड समुद्रात घुसली व हाक मारू लागली, “डग्लस, हे छान कोमट आहे. तू येच.”

पामेला लायल त्याला म्हणाली, “तुम्ही हॉटेलात चालला आहात?

तो अस्पष्टपणे म्हणाला, “ओहो, मला पहिल्यांदा खूप उन्ह खाल्लेले आवडेल.”

व्हॅलेंटीना चँट्रीने हातपाय हलवले. तिचे डोके तिच्या नवऱ्याला हाक मारण्यासाठी क्षणभर उचलले गेले --- पण तो हॉटेलच्या बागेच्या भिंतीच्या कडेने चालला होता. डग्लसने स्पष्ट केले, “मला बुडी मारायला फारसे आवडणार नाही.”

मिसेस चँट्री परत बसली. तिने सूर्यस्नानाचे तेल उचलले. ते करतांना तिला थोडे कष्ट पडले --- त्याचे झाकण तिला उघडेना.

ती जोराने व मुलासारखे रागावून, ओरडली, "ओहो प्रिय, मला हे उघडत नाही!"

तिने दुसऱ्या गटाकडे पाहिले. "मला नवल --- "

नेहमी तत्पर असणारा पायरो उठला पण तरूण आणि चपळपणाचा फायदा घेत, डग्लस क्षणार्धात तिच्या शेजारी येऊन उभा राहिला.

"मी तुमच्यासाठी हे करू शकतो का?"

"ओहो, आभारी आहे --- हे गोड रिकामे आळसटल्यासारखे बोलणे होते, "तुम्ही फार दयाळू आहात. झाकणे वगैरे उघडण्यात, मी इतकी मूर्ख आहे. मला वाटते, मी नेहमी ते उलटे फिरवते. ओहो, तुम्ही ते केले सुद्धा! मी तुमची आभारी आहे --- "

हर्क्युल पायरो स्वतःशीच हसला. तो उलट्या दिशेने फेऱ्या मारू लागला. तो सावकाश चालला होता व फार लांब गेला नव्हता. तो परत येऊ लागला, तेव्हा मिसेस गोल्ड समुद्रातून बाहेर येऊन त्याला भेटली. ती पोहत होती. तिची पोहायची टोपी थोडी सरकल्याने तिचा चेहरा चमकत होता.

ती दम टाकत बोलली, "मला समुद्र फार आवडतो. आणि इथे तो कोमट आणि छान आहे."

त्याला समजले, की ती उत्साही पोहणारी आहे. ती म्हणाली, “डग्लस आणि मी समुद्राच्या पाण्यात वेडे होतो. तो तासनतास पोहत राहू शकतो.”

आणि पायरोचे डोळे तिच्या खांद्यावरून घसरत, किनाऱ्यावरील अशा ठिकाणी गेले, जिथे मिस्टर डग्लस गोल्ड व्हॅलेंटीना चँट्रीबरोबर गप्पा मारत बसला होता.

त्याची बायको म्हणाली, “मला कळत नाही, तो येत का नाही ---“

तिच्या आवाजात एखाद्या मुलाची भीती होती.

पायरोचे डोळे विचारपूर्वक व्हॅलेंटीना चँट्रीवर स्थिर झाले.

त्याने विचार केला की दुसऱ्या बायकांनी अशा वेळी, असाच शेरा मारला असता.

त्याने त्याच्या शेजारी मिसेस गोल्डने जोराने श्वास घेतल्याचे ऐकले. ती थंड आवाजात बोलली, “मला वाटते, ती फार आकर्षक आहे. पण डग्लसला तशा प्रकारच्या बायका आवडत नाहीत.

पायरोने उत्तर दिले नाही.

मिसेस गोल्ड परत समुद्रात डुबक्या घेऊ लागली.

ती हळू, संथपणे पोहत किनाऱ्यापासून दूर गेली. तिला पाणी आवडत असल्याचे दिसत होते.

पायरो परत त्याच्या गटाकडे आला.

सैन्यातून निवृत्त झालेल्या व सतत तरुणांच्या सहवासात असलेल्या म्हाताऱ्या जनरल बार्नेसच्या आगमनाने तो गट मोठा झाला. तो आता पामेला आणि साराच्या मध्ये बसला होता. तो आणि सारा निरनिराळी प्रकरणे, त्यात आकर्षकपणे भर टाकत, चघळत बसले होते.

कमांडर चँट्री त्याच्या मोहीमेवरून परत आला होता. तो आणि डग्लस गोल्ड व्हॅलेंटीनाच्या दोन्ही बाजूला बसले होते.

व्हॅलेंटीना त्या दोन माणसांमध्ये अगदी सरळ बसली होती व ती तिच्या गोड, आवाजात सावकाशीने बोलत होती. बोलतांना ती एका माणसाकडून दुसऱ्याकडे तिचे डोके वळवत होती.

ती एक प्रसंग संपवत होती.

“ --- आणि तुम्हाला काय वाटते, तो मूर्ख माणूस काय म्हणाला असेल? ‘बाईसाहेब, ते फक्त एक मिनिट असेल, पण पण मी तुम्हाला कुठेही आठवू शकतो. टोनी, तो हे खरे म्हणत असेल का? आणि तुला माहिती आहे, मला त्याचे हे विधान गोड वाटले. मला जे जग कनवाळू वाटते --- म्हणजे प्रत्येकजण इतक्या भीतीदायक पद्धतीने माझ्याशी, का माहिती नाही, पण दयाळूपणे वागतो. ते तसेच आहे. पण मी टोनीला म्हणाले --- प्रिय, तुला आठवते का --- “टोनी, जर तुला थोडेसे हेवा करणारा व्हायचे असेल, तर तू त्या कमिशनरचा हेवा करू शकतोस. कारण तो खरेच फार आनंद पसरवणारा होता --- “

तिथे एक मिनिट शांतता पसरली. मग डग्लस गोल्ड बोलला, “या कमिशनरांपैकी काहीजण फार चांगले होते.”

“ओहो, हो --- पण त्याने खूप त्रास घेतला होता --- खरेच खूप त्रास --- आणि मला मदत करण्यात, त्याला आनंद मिळत होता.”

डग्लस गोल्ड बोलला, “त्यात काही वेगळे असे नाही. माझी खात्री आहे, तुझ्यासाठी तसे कुणीही करेल.”

ती आनंदाने ओरडली, “हे तुझे बोलणे किती छान आहे! टोनी, तू ऐकलेस का?”

कमांडर चँट्री गुरगुरला.

त्याच्या बायकोने सुस्कारा टाकला.

“टोनी, माझ्या कोकरा, तू कधीच चांगली भाषणे देत नाहीस, नाही का?”

त्याचा लाल नखांचा गोरा हात त्याच्या काळ्या केसातून फिरला. अचानक त्याने तिच्याकडे कडेने वळून पाहिले.

ती पुटपुटली, “मला खरेच समजत नाही, की तो मला कसे काय सहन करतो. तो भीती वाटेल इतका हुशार आहे --- सर्व भावना सोडून फक्त हुशार आहे --- आणि मी सर्व वेळ काहीही बडबडत असते. पण त्याला त्याचे काही वाटत नाही. मी बोलते वा करते, त्याचे कुणालाच काही वाटत नाही. माझ्यासाठी हे फार वाईट असल्याची, माझी खात्री आहे.”

तिच्या पलीकडील माणसाला कमांडर चँट्री म्हणाला. “तुमची बायको समुद्रात गेली आहे का?”

“हो. मला आता तिथे गेले पाहिजे.”

व्हॅलेंटीना पुटपुटली, “पण इथे उन्हात फार चांगले वाटते आहे. तुम्ही एवढ्यात समुद्रात जायला नको. प्रिय टोनी, मला नाही वाटत, की मी आज पाण्यात जाईन --- माझ्या पहिल्या दिवशी तरी नाही. मला थंडी भरेल किंवा तसेच काही होईल. पण प्रिय टोनी, तुम्ही का जात नाही?

“मिस्टर --- मिस्टर गोल्ड इथे माझ्याबरोबर रहातील.”

चँट्री गंभीरपणे म्हणाला, “नाही, आभारी आहे. मी अजून एवढ्यात जात नाही आहे. मिस्टर गोल्ड, मला वाटते, तुमची बायको तुम्हाला हात करते आहे.”

व्हॅलेंटीना म्हणाली, “तुमची बायको किती छान पोहते! मला वाटते, प्रत्येक गोष्ट खूप चांगली करणाऱ्यांपैकी तुमची बायको असावी. मला वाटते, मला ते डफराऊ समजत असल्याने घाबरवत असावेत. मी प्रत्येक गोष्टीला इतकी घाबरते --- मी अतिशय मूर्ख आहे, नाही का, टोनी लाडक्या?” पण परत कमांडर चँट्री फक्त गंभीर राहिला.

त्याची बायको प्रेमाने पुटपुटली, “हे कबूल करायला तुम्ही फारच गोड आहात. पुरुष माणसे नवल वाटेल इतकी नेक असतात. बायकांपेक्षा

प्रामाणिक असतात --- ते कधीच घाणेरड्या गोष्टी बोलत नाहीत. मला वाटते, बायका फार दुय्यम असतात.”

सारा ब्लेक पायरोच्या बाजूने गालातल्या गालात हसत तिच्यावर खेकसली, “काही झाले तरी मिसेस चँट्री या काही पूर्णपणे दुय्यम असल्याचे हे उदाहरण नाही. ती बाई किती मूर्ख आहे! मला खरेच असे वाटते, की मला भेटलेल्या बायकांपैकी, मिसेस व्हॅलेंटीना चँट्री जवळजवळ सर्वात मूर्ख बाई आहे. ती ‘प्रिय टोनी’ असे म्हणण्याशिवाय व तिचे डोळे फिरवण्याशिवाय ती काहीही करू शकत नाही. मला वाटते तिच्या डोक्यात दगडधोंडे भरले असावेत.”

पायरोने त्याच्या भावदर्शक भुवया उंचावल्या. “हे असे बोलणे जरा अतीच होते आहे.”

“ओहो, हो, तुम्हाला आवडत असेल, तर ते खऱ्या मांजरासारखे समजा. तिच्याकडे नक्कीच तिच्या पद्धती आहेत. ती कुठल्या पुरुषाला एकटे ठेऊ शकत नाही का? तिचा नवरा गडगडाटी दिसतो आहे.”

समुद्राकडे बघत पायरो बोलला, “मिसेस गोल्ड छान पोहतात.”

“हो. ओले होणे म्हणजे त्रास, असे आपल्यासारखे वाटणाऱ्यातील ती नाही. मला नवल वाटते, मिसेस चँट्री इथे आल्यावर कधीतरी समुद्रात जातील की नाही कोणास ठाऊक!”

जनरल बार्नेस कोरडेपणे बोलले, “ती तिचा मेकप पुसला जायचा धोका कधीच घेणार नाही. ती दिसायला चांगली बाई नाही, असे नाही. पण कदाचित म्हातारी होत चालली आहे.”

सारा दुष्टपणे म्हणाली, “जनरल, ती तुमच्यासारखी दिसते आहे. आणि मेकपबद्दल तुमचे म्हणणे चुकीचे आहे. आम्ही सर्वजणी अलीकडे पाण्यापासून व चुंबनापासून मुक्ती मिळवलेल्या आहोत.”

पामेलाने जाहीर केले, “मिसेस गोल्ड पाण्यातून बाहेर येत आहेत.”

सारा हळूच बोलली, “आणि इथे आपण गावगप्पा मारून हसत बसलो आहोत. त्याची बायको इथे त्याला घेऊन जायला येते आहे --- जा. त्याला घेऊन जा --- “

मिसेस गोल्ड सरळ किनाऱ्याशी आली. तिचा देह कमनीय होता. पण तिची साधी, पाण्यापासून अस्पर्शी अशी टोपी फारशी आकर्षक नव्हती. तिने अधीरतेने विचारले, “डग्लस, तू येत नाही आहेस का? समुद्र छान उबदार आहे.”

“बहुधा.”

डग्लस गोल्ड घाईने उठला क्षणभर थांबला. तो असे करतांना व्हॅलेंटीना चँट्रीने त्याच्याकडे गोडपणे हसून पाहिले.

ती म्हणाली, “पुन्हा भेटेपर्यंत अच्छा.”

गोल्ड आणि त्याची बायको किनाऱ्याकडे गेले.

ते थोडेसे लांब गेल्याबरोबर, पामेला टीका करत बोलली, "मला नाही वाटत, की ते शहाणपणाचे ठरेल. दुसऱ्या बाईपासून आपल्या नवऱ्याला खेचणे हे काही चांगले नाही. हे म्हणजे तुम्ही त्याच्या बाबतीत फारच भावनाशील असल्याचे दाखवते. नवऱ्यांना ते आवडत नाही."

जनरल बार्नेस म्हणाला, "मिस पामेला, तुला नवऱ्यांबद्दल फारच माहिती दिसते."

"दुसऱ्यांच्या, स्वतःच्या नव्हे."

"आहा, तिथेच तर फरक पडतो."

"पण जनरल, मला काय करू नये, ते बरेच समजले आहे."

सारा बोलली, "ठीक आहे, प्रिय पामेला, मी एकाच कारणासाठी तशी टोपी घालणार नाही --- "

जनरल म्हणाला, "हे मला लहानशा बाईसारखे पूर्ण शहाणपणाचे वाटते."

सारा म्हणाली, "जनरल, तुम्ही अगदी योग्य बोललात. पण तुम्हाला माहिती आहे का, की शहाण्या बायकांच्या शहाणपणाला देखील मर्यादा असावी लागते. माझे असे मत आहे, की जेव्हा व्हॅलेंटीना चँट्रीचा प्रश्न येतो, तेव्हा ती इतकी शहाणी नाही आहे."

तिने डोके फिरवले व उद्दीपित होऊन कुजबुजली, “आता त्याच्याकडे बघा. तो गडगडाटी वाटतो आहे. त्याचा आविर्भाव भीतीदायक वाटतो आहे.”

कमांडर चँट्री खरोखर बायकोबरोबर फार खूष नसलेला, घाबरलेला व रागावलेला नवरा वाटत होता.

साराने पायरोकडे पाहिले. “हे जे चालले आहे, त्याबद्दल तुम्ही काय म्हणाल?”

पायरोने शब्दात काही सांगितले नाही. पण परत एकदा त्याची बोटे वाळूत काही रेखाटू लागली. तीच त्रिकोणाची आकृती.

सारा विचारपूर्वक म्हणाली, “अमर त्रिकोण, कदाचित तुमचे बरोबर आहे. येणाऱ्या काही आठवड्यात आपल्याला काही सनसनाटी अनुभव येणार आहेत.”

## दोन

मिस्टर हर्क्युल पायरो ऱ्होड्सवर नाखूष झाला. तो इथे सुट्टी घेऊन, विश्रांतीसाठी आला होता. विशेषतः गुन्ह्यापासून सुट्टी मिळावी म्हणून आला होता. त्याला असे सांगण्यात आले होते, की ऑक्टोबरच्या उत्तरार्धात, ऱ्होड्स जवळजवळ रिकामे असते. शांत व खासगी असल्यासारखे ठिकाण असते.

ते एक प्रकारे खरे होते. चँट्रीज, गोल्ड्स, पामेला, सारा, जनरल, तो आणि दोन इटालियन जोडपी एवढेच लोक होते. पण त्या मर्यादित वर्तुळात मिस्टर पायरोचा बुद्धीमान मेंदू येणाऱ्या अटळ घटनांबद्दल काही आडाखे बांधत होता.

त्याने विचारपूर्वक स्वतःशी म्हटले, “मी मनात गुन्हेगारी बाळगणाराच झालो आहे. मला त्याचे अजीर्ण झाले आहे. मी काही कल्पना करत बसतो.”

पण तरी तो दुःखी होता.

एका सकाळी तो मिसेस गोल्डला शोधत आला. ती गच्चीवर काही नीडलचे काम करत होती. तो तिच्याजवळ आल्यावर सुती रुमाल चकाकताना व अचानक उडून दूर जातांना दिसला.

मिसेस गोल्डचे डोळे कोरडे होते. ते संशय येईल इतके तेजस्वी होते. तिच्या वागण्याची पद्धतदेखील आनंदीपणाकडे झुकणारी दिसत होती. तो आनंदीपणा जरा जास्तच वाटत होता.

इतक्या उत्साहाने ती म्हणाली, “मिस्टर पायरो, शुभ सकाळ.” की त्याचा संशय वाढला.

त्याला बघून, ती एवढी खूष झाली आहे, असे काही त्याला वाटेना. कारण शेवटी ती त्याला फारसे ओळखत नव्हती. आणि जरी पायरो त्याच्या

व्यवसायाबद्दल अभिमान असणारा छोटा माणूस असला, तरी तो त्याच्या व्यक्तिगत आकर्षणाला जोखण्यात चांगलाच नम्र होता.

त्याने प्रतिसाद दिला, "बाईसाहेब, शुभ सकाळ. अजून एक सुंदर दिवस."

"हो, तो सुदैवीदेखील नाही का? पण डग्लस आणि मी

हवामानाच्या बाबतीत नेहमी सुदैवी असतो."

"खरे का?"

"हो. आम्ही खरेच पूर्णपणे सुदैवी आहोत. मिस्टर पायरो, तुम्हाला माहिती आहे, जेव्हा एखादा खूप त्रास व दुःख बघतो आणि इतक्या जोडप्यांना विभक्त होतांना आणि असेच काही बघतो, तेव्हा आपण सुखी असल्याबद्दल फार ऋणी वाटते."

"बाईसाहेब, तुम्हाला असे बोलताना ऐकून बरे वाटले."

"हो, डग्लस आणि मी एकत्र, नवल वाटेल इतके सुखी आहोत. आमच्या लग्नाला पाच वर्षे झाली. हल्लीच्या दिवसात एवढा काळ म्हणजे खूपच आहे."

पायरो कोरडेपणे म्हणाला, "काही केसेसमध्ये मी जोडपी अनंत काळ एकत्र नांदताना पाहिली आहेत."

“ --- पण मला विश्वास वाटतो आम्ही पहिल्यांदा लग्न केले, त्यापेक्षा सुखी आहोत. तुम्ही बघाल, की आम्ही एकमेकांना खूपच अनुरूप आहोत.”

“तेच अर्थात, सर्व काही आहे.”

“म्हणूनच मला जे लोक सुखी नाहीत, त्यांच्याबद्दल वाईट वाटते.”

“म्हणजे तुम्हाला --- “

“मी असेच सहज बोलत होते, मिस्टर पायरो.”

“अस्स, अस्स.”

मिसेस गोल्डने रेशमी कापड उजेडात धरून पसंत केले व बोलली, “उदाहरणार्थ, मिसेस चँट्री --- “

“हं, मिसेस चँट्री?”

“मला वाटते, ती मुळीच चांगली बाई नाही.”

“नाही, कदाचित नसावी.”

“खरे तर माझी खात्री आहे, की ती मुळीच चांगली बाई नाही. पण एक प्रकारे तिच्याबद्दल वाईट वाटते. कारण तिच्याकडे पैसा असला व ती दिसायला चांगली असली, तरी तिची बोटे थरथरत असतात आणि तिला नीट समतोल राखून रहाता येत नाही. पुरुष तिला चिकटून रहातील, अशी ती बाई नाही, तर पुरुष लवकरच थकून जातील, अशा प्रकारची ती बाई आहे. तुम्हाला असे वाटत नाही का?”

पायरो काळजीपूर्वक म्हणाला, “मी स्वतः तिची बडबड ऐकून काही वेळातच त्रासून जातो.”

“हो, मला तेच म्हणायचे होते. अर्थात तिच्याकडे एक खेचणारी शक्ती आहे --- “ मिसेस गोल्ड कां कू करू लागली. तिचे ओठ थरथरू लागले. तिने अस्थिरपणे तिच्या कामात लक्ष घातले. पायरोसारख्या माणसाच्या नजरेतून तिचे दुःख सुटणे शक्य नव्हते. त्याचा परिणाम म्हणून, ती बोलू लागली, “पुरुष खरे तर मुलांसारखेच असतात. ते कशावरही विश्वास ठेवतात - “

ती तिच्या कामावर वाकली. कापडाचे दोरे सहजच परत बाहेर आले.

पायरोला वाटले, की विषय बदलावा. तो म्हणाला, “तुम्ही आणि तुमचा नवरा आज सकाळी समुद्रावर पाण्यात गेला होतात का?

मिसेस गोल्डने डोळे उघडमिट करत, वर पाहिले. तिची दुर्लक्ष करायची चमकदार सवय चालू ठेवत, ती म्हणाली, “नाही. आज सकाळी नव्हे. आज आम्ही शहराच्या जुन्या भागात फिरत होतो. पण कसे कोण जाणे, आम्ही एकमेकांपासून हरवलो. ते इतरजण माझ्याशिवाय पुढे चालू लागले.”

हे सगळे काही स्पष्ट करणारे होते. पण पायरोने काही बोलायच्या आत, खालील किनाऱ्यावरून जनरल बार्नेस आला आणि शेजारील खुर्चीत बसला.

“मिसेस ग्लोड, शुभ सकाळ, मिस्टर पायरो, शुभ सकाळ. दोघे आज सकाळी एकेकटे? मिसेस गोल्ड, तुमचा नवरा आणि मिसेस चँट्री कुठे आहेत?”

पायरोने सहज म्हटले, “आणि कमांडर चँट्री?”

“ओहो, नाही, तो इथे खाली आहे. मिस पामेलाच्या हातात आहे.” जनरल हसला. “तिला तो जरा अवघड वाटतो आहे. तुम्ही पुस्तकात ऐकलेला बळकट, शांत माणूस.”

मार्जोरी गोल्ड थोडी शहारत म्हणाली, “तो मनुष्य मला थोडे घाबरवतो. तो --- तो कधीकधी इतका काळा दिसतो. इतका --- की तो काहीही करेल, असे वाटते.

ती शहारली.

जनरल आनंदाने म्हणाला, “मला वाटते, अद्भुतरम्य उदासीनता किंवा न आवरता येणारा राग हे अपचनाने होतात, असे म्हणतात.”

मार्जोरी गोल्ड नम्रपणे थोडेसे हसली.

जनरलने विचारले, तुझा नवरा कुठे गेला?

ती आढेवेढे न घेता नैसर्गिक, आनंदी आवाजात बोलली, “डग्लस? ओहो, तो आणि मिसेस चँट्री गावात गेले आहेत. मला वाटते, त्याना गावाच्या जुन्या भागातून फिरायचे आहे.”

“अस्स, फारच रुचीपूर्ण! सरदारांचा काळ वगैरे. तुम्ही पण जायला पाहिजे होते.”

मिसेस गोल्ड म्हणाली, “मला वाटते मी जरा उशीराच खाली आले.”

ती पुटपुटत, काहीतरी कारण देत, उठली आणि हॉटेलमध्ये शिरली.

जनरल बार्नेस तिच्याकडे भावदर्शकतेने बघत, डोके हलवत राहीला.

“ती छान छोटीशी बाई आहे. आपण ज्यांचे नावही घेत नाही अशा डझनभर रंगरंगोटी केलेल्या वेश्यांपेक्षा चांगली आहे. हां! तिचा नवरा मूर्ख आहे. त्याला माहिती नाही, की तो केव्हा सुखी असतो.”

परत डोके हलवत तो उठला व हॉटेलमध्ये शिरला.

सारा आताच समुद्रकिनाऱ्यावरून आली होती. आणि तिने जनरलचे शेवटचे बोलणे ऐकले.

त्या लढवय्याच्या पाठीला वाकुल्या दाखवत, खुर्चीत बसत, ती म्हणाली,

“म्हणे, छान छोटीशी बाई --- छान छोटीशी बाई! पुरुष नेहमी साधी, फॅशन न करणारी बाई पसंत करतात. पण जेव्हा महत्वाचा प्रश्न येतो, तेव्हा तेव्हा छान नटलेल्या वेश्याच जिंकतात. हे वाईट आहे. पण खरे आहे.”

पायरो वेड्यावाकड्या आवाजात म्हणाला, “मला हे आवडत नाही आहे.”

“हो का? मलाही खरे तर आवडत नाही आहे. पण प्रामाणिकपणे सांगायचे झाल्यास, मला ते खरे तर आवडते. एक अशी भयंकर बाजू आहे, की काही लोकांना अपघात, सार्वजनिक संकटे व कोणाच्या मित्रांच्या बाबतीत, वाईट गोष्टी झालेल्या आवडतात.”

पायरोने विचारले, “कमांडर चँट्री कुठे गेले आहेत?

“पामेलाने त्यांना किनाऱ्यावर नेले आहे. [ तुम्हाला आवडणार असेल, तर ती छान मजा करते आहे. ] आणि नुसते दिवस पुढे जात आहेत, पण तिच्या स्वभावात काही सुधारणा नाही. माझ्यावर विश्वास ठेवा, अचानक मुसळधार पाऊस पडणार आहे.”

पायरो पुटपुटला, “असे काही आहे, जे मला समजत नाही.”

सारा म्हणाली, “ते समजायला सोपे नाही. पण काय होणार, हा प्रश्न आहे.”

पायरो डोके हलवून पुटपुटला, “बाईसाहेब, तुम्ही म्हणता तसे, भविष्यकाळ शारीरिक वा मानसिक अस्वस्थपणाला कारणीभूत असा असेल.”

“किती छान शब्दात तुम्ही हे मांडले.” सारा बोलली व हॉटेलात गेली. दारात ती जवळजवळ डग्लस गोल्डवर आपटली. तो तरुण मनुष्य स्वतःवर खूष होऊन बाहेर आला. पण त्याच वेळी त्याला थोडे अपराधी वाटत होते. तो म्हणाला, “मिस्टर पायरो, कसे काय? मी मिसेस चँट्रीला मध्ययुगीन लढवय्ये कोरलेली भिंत दाखवत होतो. मार्जोरीला काही यायची इच्छा नव्हती.”

पायरोच्या भुवया थोड्याशा चढल्या. आणि त्याला काही शेरा मारायची इच्छा असली, तरी व्हॅलेंटीना चँट्री दम टाकत, ओरडत आल्याने, ते राहून गेले. “डग्लस --- एक गुलाबी जीन --- मला ती अगदी हवीच आहे.”

त्या पेयाची मागणी करायला डग्लस गेला. व्हॅलेंटीना पायरोशेजारील एका खुर्चीत बसली. आजच्या सकाळी ती चकचकीत दिसत होती.

तिने तिच्या नवऱ्याला व पामेलाला त्यांच्याकडे येतांना पाहिले. हात हलवत, ती ओरडली, “प्रिय टोनी, मस्त अंघोळ झालेली दिसते? किती छान सकाळ आहे, नाही का?”

कमांडर चँट्री काही बोलले नाहीत. त्यांनी तिच्याकडे न बघता व बोलता, पायऱ्या ओलांडून, बारमध्ये प्रवेश केला.

त्याचे हात कडेला होते आणि ते थोडेसे गोरिलासारखे दिसत होते.

व्हॅलेंटीना चँट्रीचे सुंदर पण मूर्ख तोंड आ वासलेले राहिले. ती थोड्या रितेपणे म्हणाली, "ओहो."

या परिस्थितीवर पामेला लायलचा चेहरा खूष झालेला दिसला. तो झाकण्याचा प्रयत्न करत, तिचा निरागसपणा दाखवत, ती व्हॅलेंटीना चँट्रीच्या शेजारी बसत विचारती झाली, "तुमची सकाळ मस्त गेली का?"

व्हॅलेंटीनाने सुरवात केली, "फारच छान. आम्ही --- " पायरो उठून बारकडे गेला. त्याला तिथे तरुण गोल्ड पडेल चेहऱ्याने गुलाबी जीनसाठी थांबलेला दिसला. तो रागावलेला व विमनस्क वाटत होता. तो पायरोला म्हणाला, "तो मनुष्य दुष्ट आहे. त्याने बाहेर पडणाऱ्या कमांडर चँट्रीकडे डोके हलवत निर्देश केला.

पायरो बोलला, "शक्य आहे. पण लक्षात घ्या, बायकांना असले दुष्ट नवरे आवडतात!"

डग्लस हळू बोलला, "त्याने तिला वाईट वागवले, तर मला काही नवल वाटणार नाही."

"कदाचित तिला तेही आवडत असेल."

डग्लसने त्याच्याकडे गोंधळून पाहिले. गुलाबी जीन घेतली आणि ती घेऊन बाहेर गेला.

पायरोने स्टुलावर बसून सांगितले, की त्याला एक ब्लॅक करंट अल्कोहोल सिरप द्यावे. चँट्री आला आणि त्याने भरभर खूप गुलाबी जीन प्यायली.

अचानक तो आक्रमकपणे पायरोपेक्षा सगळ्या जगाला उद्देशून बोलला, "जर व्हॅलेंटीनाला असे वाटत असेल, की तिने अनेक मूर्खांना सोडले, तसे ती मला सोडेल, तर ती चुकते आहे. मी तिला मिळवले आहे आणि मी तिला मला सोडून देणार नाही. इतर कोणी तसा प्रयत्न केला तर त्याला माझ्या प्रेतावरूनच जावे लागेल."

त्याने काही पैसे फेकले व बाहेर चालू पडला.

## तीन

तीन दिवसांनतर पायरो प्रॉफेटच्या डोंगरावर गेला होता. ती मनुष्य वस्तीच्या कोलाहलापासून दूर सोनेरीसर हिरवी, उंचच उंच फरची झाडे असलेली, थंड जागा होती. एका हॉटेलशी गाडी थांबली. पायरो बाहेर पडून जंगलात फिरू लागला. शेवटी तो जगातील सर्वात उंच असे भासणाऱ्या ठिकाणी आला. अती खोलवर निळाशार समुद्र दिसत होता.

इथे शेवटी त्याला शांती मिळाली --- उंच जागी जाऊन तो काळज्यांपासून मुक्त झाला. त्याचा कोट एका झाडाच्या फांदीवर टांगून, तो झाडाखाली बसला.

निर्विवादपणे तो काय करतो आहे, हे थोर देव बघत होता. पण हे विचित्र होते, की त्याने काही प्रमाणात कुणा माणसासारखी फॅशन केली होती. 'ठीक आहे. निदान काही काळासाठी मी चिंतामुक्त झालो आहे', असा विचार त्याने केला.

त्याने सुरवात म्हणून वर बघितले. एक तपकिरी स्कर्ट व कोटातील छोटी बाई घाईघाईने त्याच्याकडे येत होती. ती मार्जोरी गोल्ड होती. तिने सर्व ढोंग सोडून दिले होते. तिचा चेहरा अश्रुंनी ओला झाला होता.

पायरो तिच्यापासून पळ काढू शकला नाही. ती त्याच्याकडे येत होती. "मिस्टर पायरो, तुम्ही मला मदत करायला पाहिजे. मी इतक्या विचित्र परिस्थितीत सापडले आहे, की मला काय करावे ते कळत नाही आहे. ओहो, मी काय करू? मी काय करू?"

तिने त्याच्याकडे विदीर्ण चेहऱ्याने पाहिले. तिची बोटे त्याच्या कोटाच्या बाहीला घट्ट चिकटली होती. नंतर अचानक त्याच्या चेहऱ्याकडे बघून ती थोडी मागे सरकली.

शक्तिपात झाल्यासारखी ती ओरडली, "काय --- हे काय आहे?"

“बाईसाहेब, तुम्हाला माझा सल्ला हवा आहे का? तुम्ही तो विचारत आहात का?”

ती चाचरत बोलली, “हो --- हो.”

तो अरेरावीने जोरात बोलला, “ठीक आहे --- हा दिला. फार उशीर होण्यापूर्वी --- इथून ताबडतोब निघून जा.”

ती त्याच्याकडे रोखून बघत उद्गारली, “काय?”

“तुम्ही ऐकले आहे. हे बेट सोडा.”

“हे बेट सोडा?”

ती धक्का बसल्यासारखी त्याच्याकडे बघू लागली.

“मी तेच म्हणालो.”

“पण का? --- का?”

जर तुम्हाला तुमचा जीव प्यारा असेल तर --- माझा तुम्हाला हाच सल्ला राहील --- “

तिने एक निःश्वास टाकला. “म्हणजे तुम्हाला काय म्हणायचे आहे? तुम्ही मला घाबरवत आहात. तुम्ही मला घाबरवत आहात.”

पायरो थंडपणे म्हणाला, “हो, मला तेच करायचे आहे.”

ती चेहरा हातात लपवून, एकदम बसली. “पण मी असे करू शकत नाही. म्हणजे डग्लस मला तसे करू देणार नाही. ती त्याला तसे करू देणार नाही --- मनाने आणि शरीराने. तो तिच्याविरुद्ध काही करणार नाही. तिने

त्याच्यावर ताबा मिळवला आहे. तो तिच्यासाठी वेडा झाला आहे. ती सांगेल त्याच्यावर, त्याचा विश्वास बसतो --- की तिचा नवरा तिला वाईट वागवतो --- ती निरागस असून जखमी झाली आहे --- आजपर्यंत तिला कोणीही समजून घेतले नाही --- काल रात्री तिने --- तो आता माझ्याबद्दल विचारदेखील करत नाही --- मला खिजगणतीत देखील घेत नाही. त्याच्यासाठी मी खरी नाहीच आहे. त्याला माझ्यापासून सुटका हवी आहे. मी त्याला घटस्फोट द्यायला हवा आहे. त्याला वाटते, की ती तिच्या नवऱ्याला घटस्फोट देऊन, त्याच्याशी लग्न करेल. पण मला भीती आहे, चँट्री तिला सोडणार नाही. तो तसा माणूस नाही. काल रात्री तिने डग्लसला तिच्या हातावरील जखमा दाखवल्या --- त्या तिच्या नवऱ्याने केल्याचे सांगितले. डग्लसला चिडायला लावले. तो तिच्यासाठी पागल झाला आहे --- ओहो, मी घाबरले आहे. यातून पुढे काय होणार? मला सांगा, मी काय करू?”

पायरो पाण्याकडे टक लाऊन, आशियाच्या मुख्य डोंगरांकडे बघत होता.

तो म्हणाला, “मी तुम्हाला सांगितले आहे. फार उशीर होण्यापूर्वी हे बेट सोडून जा.”

तिने डोके हलवले.

“मी नाही असे करू शकत --- नाही करू शकत --- जर डग्लस -“

पायरोने सुस्कारा टाकला व खांदे शहारवले.

## चार

पायरो पामेला लायलबरोबर किनाऱ्यावर बसला होता.

ती काही करायच्या थोड्याशा उत्साहाने म्हणाली, “त्रिकोण बळकट होत चालला आहे. काल रात्री ते तिच्या एकेका बाजूला एकमेकांकडे रागाने बघत बसले. चँट्रीने फार पेयपान केले होते. तो मुद्दाम डग्लस गोल्डचा अपमान करत होता. पण गोल्ड चांगला वागत होता. तो त्याची मनस्थिती सांभाळून होता. व्हॅलेंटीनाला ते अर्थात छान वाटत होते. नरभक्षक वाघासारखी ती गुरगुरत होती. आता काय होईल, असे तुम्हाला वाटते?

पायरोने डोके हलवले. “मी घाबरलो आहे. फार घाबरलो आहे --“

मिस लायल ढोंगीपणे म्हणाली, “ओहो, आम्ही सगळे आहोत. हा कारभार तू आवरू शकतोस. नाहीतर, ते तुझ्याच अंगाशी येईल. तू काही करू शकत नाहीस का?”

“मला जे करणे शक्य होते, ते मी केले आहे.”

मिस लायल उत्सुकतेने पुढे वाकली.

तिने आनंदित उत्सुकतेने विचारले, “तू काय केलेस?”

“मी मिसेस गोल्डला उपदेश केला, फार उशीर होण्यापूर्वी हे बेट सोडायचा उपदेश केला.”

“ओहो, अरेरे, तू असा विचार करतोस --- “ ती थांबली

“काय बाईसाहेब?

पामेला सावकाश बोलली, “म्हणजे असे होईल असे तुला वाटते. पण तो असे करू शकत नाही --- तो अशी गोष्ट कधीच करणार नाही --- तो खरे तर चांगला आहे. हा सगळा त्या चँट्री बाईचा चावटपणा आहे. तो असे काही करणार नाही --- करणार नाही.”

ती थांबली व मृदुपणे बोलली, “खून? तो --- तो शब्द तुझ्या मनात आहे का?”

“तो कुणाच्या तरी मनात आहे. बाईसाहेब, मी ते तुम्हाला सांगतो.”

पामेला अचानक शहारली. ती बोलली, “मला खरे वाटत नाही.”

## पाच

एकोणतीस ऑक्टोबरच्या त्या रात्रीतील घटनांचा क्रम अगदी

स्पष्ट होता.

सुरवातीला ते दोन पुरुषांमधील दृष्य होते --- गोल्ड आणि चँट्री. चँट्रीचा आवाज चढत गेला आणि त्याचे शेवटचे शब्द चौघांनी पुसटसे

ऐकले --- टेबलावरील रोखपाल, व्यवस्थापक, जनरल बार्नेस आणि पामेला लायल.

“तू भिकार डुक्करछाप! जर तुला आणि तुझ्या बायकोला असे वाटत असेल, की तुम्ही याचे खापर माझ्यावर फोडू शकाल, तर तुम्ही चुकता आहात. मी जिवंत आहे तोपर्यंत, व्हॅलेंटीना माझीच बायको राहील.”

मग तो हॉटेलातून बाहेर निघून गेला. त्याचा चेहरा रागाने फुलला होता.

हे जेवणापूर्वी झाले. त्यानंतर [ कसे काय साधले कोणास ठाऊक ] मित्रांचे परत मेतकूट जमले. व्हॅलेंटीनाने मार्जोरी गोल्डला चंद्रप्रकाशात गाडीतून चक्कर मारण्याबद्दल विचारले. पामेला आणि साराही त्यांच्या बरोबर गेल्या. गोल्ड आणि चँट्री एकत्र बिलियर्डस खेळले. नंतर ते हर्क्युल पायरो व जनरल बार्नेसबरोबर लाउंजमध्ये होते.

जवळजवळ प्रथमच चँट्रीच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता..

जनरलने विचारले, “तुमचा खेळ चांगला झाला का?

कमांडर म्हणाला, “हा माझ्यापेक्षा फारच चांगला खेळतो. तो सेहेचाळीसच्या आसपास हरला.”

डग्लसने नम्रपणे नापसंती दर्शवली. “मी तुला सांगतो, फक्त नशीब! तुम्ही काय घेणार? मी जाऊन वेटरला पकडून आणतो.”

“माझ्यासाठी गुलाबी जीन, आभारी आहे.”

“ठीक आहे जनरल.”

“मला व्हिस्की आणि सोडा चालेल. आभारी आहे.”

“माझ्यासाठी तेच. मिस्टर पायरो, तुम्ही काय घेणार?”

“तुमचे आभार! मला ब्लॅककरंट सिरप चालेल.”

“सिरप? माफ करा.”

“ब्लॅककरंट सिरप.”

“ओहो, गोड, जहाल अल्कोहोलिक पेय! अस्स. मला वाटते ते त्यांच्याकडे असेल. पण मी कधी त्याबद्दल ऐकले नाही.”

“त्यांच्याकडे ते आहे. हो. पण ते गोड, जहाल अल्कोहोलिक पेय नाही.”

डग्लस गोल्ड हसत म्हणाला, “हे मजेशीर चवीचे वाटते आहे. पण प्रत्येकाला स्वतःचे विष हवे असते. मी जाऊन ते आणायला सांगतो.”

कमांडर चँट्री बसला. जरी तो बडबड्या व समाजप्रिय प्राणी नसला, तरी तो आनंदी व मित्रत्वाने वागायचा प्रयत्न करत होता.

त्याने शेरेबाजी केली, “एखादी बातमी न येताही आपले सर्व काही चालू रहाते, हे जरा विचित्र आहे.”

जनरल गुरगुरला, “जगातील रोजच्या चार दिवस शिळ्या बातम्या, माझ्यासाठी काही फारशा उपयोगाच्या नाहीत. त्या यायला फार वेळ लागत

असला, तरी अर्थात मला दर आठवड्याला टाईम्स व पंचचा अंक मिळतो.”

‘मला नवल वाटते, पॅलेस्टाईनला सर्वसाधारण निवडणुका होणार की नाही?

डग्लस गोल्ड परत आल्यावर जनरलने जाहीर केले, “ही सर्व गोष्ट फार वाईट पद्धतीने चालवली जाते आहे.” वेटर पेये घेऊन आला.

जनरलने नुकतीच त्याच्या सैनिकी करीयरमधला भारतातील १९०५ या वर्षातील एक प्रसंग कथन करायला सुरवात केली होती. दोन इंग्रज जरी फार रुची घेऊन नाही, तरी नम्रपणे ऐकत होते. पायरो त्याचे सिरप घोट घोट पित होता.

जनरल त्याच्या कथनाच्या एका टप्प्यावर आला आणि तिथे आजूबाजूला कर्तव्यतत्पर हशा उसळला.

नंतर तिथे बायका अवतीर्ण झाल्या. त्या चौघीजणी छान मनस्थितीत दिसत होत्या. त्या हसत आणि बोलत होत्या.

व्हॅलेंटीना टोनीच्या शेजारील खुर्चीत बसत ओरडली, “प्रिय टोनी, ते फारच स्वर्गीय होते. ती मिसेस गोल्डची सर्वात छान कल्पना होती. तुम्ही सगळे यायला हवे होतात.”

तिचा नवरा म्हणाला, “एखादे पेय हवे आहे का?” त्याने इतरजणींकडे देखील प्रश्नार्थकतेने पाहिले.

व्हॅलेंटीना बोलली, “प्रिय, माझ्यासाठी गुलाबी जीन.”

पामेला म्हणाली, “जीन आणि जिंजरबिअर.”

सारा म्हणाली, “सिडेकार.”

चँट्री उभा राहिला. त्याने त्याचे न उष्टावलेले पेय त्याच्या बायकोला दिले. “तू हे घे मी मला दुसरे आणतो. मिसेस गोल्ड, तुम्हाला काय हवे आहे?”

मिसेस गोल्डचा नवरा तिला कोट काढायला मदत करत होता. ती हसत वळली. “मला ऑरेंजडे मिळू शकेल का?”

“ठीक आहे. ऑरेंजडे.”

तो दाराकडे गेला. मिसेस गोल्ड नवऱ्याकडे बघून हसली. “डग्लस, ते इतके छान होते. तू यायला हवे होतेस.”

“माझी इच्छा होती. आपण नंतर एखाद्या रात्री जाऊ. चालेल ना?” ते एकमेकांकडे बघून हसले.

व्हॅलेंटीना चँट्रीने गुलाबी जीन घटाघटा पिऊन टाकली. “मला त्याची फार गरज होती.” तिने सुस्कारा टाकला.

डग्लस गोल्डने मार्जोरीचा कोट काढून खुर्चीवर ठेवला. तो इतरांकडे चालत गेल्यावर कडकपणे बोलला, “लोकहो, काय झाले?”

व्हॅलेंटीना चँट्री खुर्चीत रेलून बसली होती. तिचे ओठ निळे झाले होते. तिचे हात हृदयावर होते. “मला जरा विचित्र वाटते आहे --- “

ती श्वास घेण्यासाठी झगडत होती.

चँट्री खोलीत परत आला. त्याने वेग वाढवला. “काय ग, काय झाले?”

“मला कळत नाही. ते पेय --- त्याची चव काहीशी विचित्र होती --- “

“गुलाबी जीन?”

चँट्रीने त्याच्या चेहऱ्याभोवती हात फिरवला. त्याने डग्लस गोल्डची गचांडी धरली.

“ते तर माझे पेय होते --- गोल्ड, तू त्यात काय घातले होतेस?” डग्लस गोल्ड चेहरा पिळवटला गेलेल्या खुर्चीतील बाईकडे बघत होता. तो पांढरा फटक पडला.

“मी --- मी --- कधीच --- “

व्हॅलेंटीना चँट्री खुर्चीतून घसरली.

जनरल बार्नेस ओरडला, “लवकर डॉक्टरला बोलवा.”

पाच मिनिटाने व्हॅलेंटीना चँट्री मरण पावली.

## सहा

दुसऱ्या दिवशी सकाळी कोणीच समुद्रावर अंघोळीला गेले नाही.

पांढरी पडलेली पामेला लायल साध्या गडद ड्रेसमध्ये हॉलमध्ये पायरोला चिकटून बसली होती. तिने त्याला ओढत लहानशा लिहायच्या खोलीत आणले.

ती म्हणाली, “हे भयंकर आहे. तू असे म्हणाला होतास, तुला भविष्य समजते? खून?”

त्याने त्याचे डोके थंडपणे वळवले.

पाय जमिनीवर आपटत ती किंचाळली, “ओहो, तू हे होऊन द्यायला नको होतेस. काही करून! तुला ते थांबवता आले असते.”

पायरो बोलला, “कसे?”

ते तिलाही माहिती नसल्याने, ती गप्प झाली.

“तुम्ही कुणाकडे जाणार नाही का --- पोलिसांकडे?

“आणि काय सांगायचे? सांगण्यासारखे काय आहे --- की घटना घडण्यापूर्वी कुणाच्या तरी मनात खून करण्याचे होते? मी तुम्हाला सांगते, जर एक मनुष्य दुसऱ्याला मारायला टपला असेल, तर --- “

पामेला जोर देत बोलली, “तू बळीला सावध करु शकला असतास.”

पायरो म्हणाला, “कधीकधी सूचना निरुपयोगी असतात.”

पामेला सावकाश बोलली, “तू खुन्याला ताकीद देऊ शकला असतास --- तुला काय होणार, याचा अंदाज असल्याचे तू त्याला सांगू शकला असतास.”

पायरोने स्तुतीपर मान हलवली. “हो. हा बरा बेत होता. पण तरीही, तुम्हाला गुन्हेगाराच्या मुख्य दुर्गुणाचा तर्क करावा लागला असता.”

“तो काय होता?”

“गर्व. गुन्हेगाराला असे कधीच वाटत नाही की त्याचा गुन्हा उघडकीस येईल.”

पामेला ओरडली, “पण हे विचित्र आहे. मूर्खासारखे आहे. हा गुन्हा म्हणजे पोरखेळच होता! काल रात्री पोलिसांनी डग्लस गोल्डला लगेच अटक केली का?”

तो विचारपूर्वक म्हणाला, “हो. डग्लस गोल्ड एक फार मूर्ख तरुण माणूस आहे.”

“फारच मूर्ख! मी असे ऐकले, की त्यांना उरलेले विष सापडले --- किंवा जे काही होते ते --- “

“एक प्रकारचे स्ट्रोपॅन्थीन. हृदयासाठीचे विष.”

त्याच्या जेवतानाच्या जाकीटाच्या खिशात उरलेले ते सापडले?

“अगदी बरोबर.”

पामेला परत बोलली, “फारच मूर्ख! कदाचित त्याला त्यातून सुटायचे असेल --- आणि चुकीच्या माणसाला विष दिल्याचा धक्का बसून तो गलितगात्र झाला असेल. रंगमंचावर हे दृष्य कसे दिसेल. प्रेमिक स्ट्रोपॅन्थीन नवऱ्याच्या पेल्यात घालत आहे आणि मग त्याचे लक्ष नसतांना नवऱ्याऐवजी बायको ते पिऊन टाकते --- डग्लस गोल्ड जेव्हा वळला आणि त्याच्या लक्षात आले, की त्याने तो जिच्यावर प्रेम करत होता, त्याच बाईला ठार केले --- “

तिने लहानसा शहारा दिला.

“तुमचा त्रिकोण! अमर त्रिकोण! असा शेवट होईल, हे कुणाला माहिती होते?”

पायरो पुटपुटला, “मला असे होण्याची भीती होती.”

पामेला त्याच्यावर तुटून पडली. “तू तिला, मिसेस गोल्डला ताकीद दिली होतीस --- मग तू त्याला ताकीद का दिली नाहीस?”

“तुम्हाला असे म्हणायचे आहे, की मी डग्लस गोल्डला ताकीद का दिली नाही?

“नाही. मला कमांडर चँट्री म्हणायचे होते. तुम्ही त्याला असे सांगू शकला असतात की त्याला धोका आहे --- शेवटी, तोच खरा अडथळा होता! मला काही संशय नाही, की डग्लस गोल्ड त्याच्या बायकोला घटस्फोट देण्यासाठी त्रास द्यायचा प्रयत्न करत होता --- ती शांत, शरणार्थी

प्रकारची छोटीशी बाई होती आणि तिला तो खूप आवडत होता. पण चँट्री एखाद्या खेचरासारखा राक्षस होता. त्याने ठरवले होते, की व्हॅलेंटीनाला स्वातंत्र्य द्यायचे नाही.”

पायरोने खांदे शहारवले. तो म्हणाला, “मी चँट्रीशी बोलूनदेखील काही फायदा नव्हता.

पामेलाने कबूल केले, “कदाचित नसावा. त्याने कदाचित असे म्हटले असेल, की तो स्वतःकडे लक्ष देऊ शकतो आणि तुम्हाला उलटी उत्तरे दिली असती. पण मला अजूनही वाटते, आपण नक्कीच काहीतरी करू शकलो असतो.”

पायरो म्हणाला, “मलाही तसे वाटले होते, की ते बेट सोडून जाण्यासाठी व्हॅलेंटीना चँट्रीचे मन वळवायचा प्रयत्न करावा. पण हे समजून घ्यायला, ती अतिशय मूर्ख बाई होती. ती बिचारी बाई तिच्या मूर्खपणामुळे मेली.”

पामेला बोलली, “मला वाटते, तिने बेट सोडले असते, तरी काही चांगले झाले नसते. तो तिचा पाठलाग करत गेला असता.”

“तो?”

“डग्लस गोल्ड.”

“तुम्हाला असे वाटते, डग्लस गोल्ड तिचा पाठलाग करत आला असता? ओहो, नाही. तुम्ही चुकत आहात --- तुम्ही फार चुकत आहात.

तुम्हाला अजून या प्रकरणाचे मर्म कळलेलेच नाही. जर व्हॅलेंटीना चँट्रीने बेट सोडले असते, तर तिचा नवरा तिच्याबरोबर गेला असता.”

पामेलाने गोंधळून बघितले.

“अर्थात, अगदी नैसर्गिकपणे.”

“आणि मग असे बघा, गुन्हा कुठेतरी दुसरीकडे घडला असता --- व्हॅलेंटीना चँट्रीच्या नवऱ्याने तिला मारल्याचा गुन्हा.”

पामेला स्तब्ध झाली.

“तुम्हाला असे म्हणायचे आहे का, की कमांडर, टोनी चँट्रीने व्हॅलेंटीनाला मारले?”

“हो, तुम्ही त्याला तसे करतांना पाहिले. डग्लस गोल्डने त्याच्यासाठी पेय आणले. तो त्याच्यासमोर ते घेऊन बसला. जेव्हा ती बाई आली, तेव्हा त्याच्याकडे स्ट्रोपॅन्थीन तयार होते. ते त्याने गुलाबी जीनमध्ये घातले आणि नम्रपणे त्याने ते त्याच्या बायकोकडे सरकवले. तिने ते प्यायले.”

“पण स्ट्रोपॅन्थीनचे पाकीट तर डग्लस गोल्डच्या खिशात सापडले.”

“ते त्याच्या खिशात सरकवणे फारच सोपे होते. आपण सगळ्यांनी मेलेल्या बाईभोवती गर्दी केली होती.”

पामेलाने श्वास घेण्याच्या दोन मिनिटे आधी हे झाले.

“पण मला एकही शब्द समजत नाही. त्रिकोण --- तू तर स्वतःच म्हणालास --- “

पायरोने जोराने त्याचे डोके हलवले.

“मी म्हणालो, तिथे त्रिकोण होता ---हो. पण तुम्ही, तुम्ही काही वेगळीच चुकीची कल्पना केलीत. तुम्हाला हुशारीच्या अभिनयाने फसवले. तुम्हाला वाटले, की दोघे टोनी चँट्री आणि डग्लस गोल्ड व्हॅलेंटीनावर प्रेम करत होते. आणि तुमचा विश्वास बसला --- तसे होणे शक्य होते, की डग्लस गोल्ड व्हॅलेंटीनावर प्रेम करतो आहे. [ तिच्या नवऱ्याने तिला घटस्फोट द्यायला नकार दिला आहे. ] त्यामुळे त्याने हृदयाचे विष देण्याचे टोकाचे पाऊल उचलले. आणि भलत्याच चुकीमुळे व्हॅलेंटीना ते विष प्यायली. हे सर्व भ्रामक आहे. चँट्रीला त्याच्या बायकोला कधीतरी ठार मारायचे होते. तिच्याबरोबर राहून, तो अतिशय कंटाळला होता. मला पहिल्यापासूनच ते दिसत होते. त्याने तिच्याशी पैशांसाठी लग्न केले होते. आता त्याला दुसऱ्या बाईशी लग्न करायचे होते --- म्हणून त्याने व्हॅलेंटीनाला मारून, तिचे पैसे लुबाडायचा विचार केला. त्यामुळे खून झाला.”

“दुसरी बाई?

पायरो सावकाश बोलला, “हो. हो. लहानशी मार्जोरी गोल्ड. हा अमर त्रिकोण होता. पण तुम्ही तो चुकीचा पाहिलात. त्या दोन्ही पुरुषांपैकी कुणालाच व्हॅलेंटीनाची जराही पर्वा नव्हती. हा तिचा पोकळ डौल आणि मार्जोरी गोल्डचे हुशारीने रंगमंच सांभाळणे होते. तुम्हाला वाटते, की हे तिने

केले! मिसेस मार्जोरी गोल्ड ही फार हुशार बाई आहे. आणि नम्र आणि लाजाळूपणाच्या नावाखाली ती आकर्षक पण गरीब बिचारी छोटीशी बाई असल्याचे दाखवते. मला अशाच प्रकारच्या चार गुन्हेगार स्त्रिया माहिती आहेत. मिसेस ॲडाम्स तिच्या नवऱ्याचा खून केल्याच्या आरोपातून सुटली होती. पण सगळ्यांना माहिती होते की तिनेच तो केलेला आहे. मेरी पार्करने तिची आवडती आत्या आणि दोन भावांचा खून केलेला असतो आणि तिच्या थोड्याशा निष्काळजीपणामुले, ती पकडली जाते. अजून एक मिसेस रोवडेन होती. तिला फाशी झाली. मिसेस लेक्रसी शिक्षेतून जेमतेम निसटली. ही बाईदेखील त्याच प्रकारची आहे. तिला बघितल्याबरोबरच मी तिला, ती अशी असल्याचे ओळखले होते. एखादे बदक पाण्याच्या दिशेने जावे तशा या खुनाकडे वळतात. हे पद्धतशीरपणे बेत आखून केलेले चांगले हुशारीचे काम होते. डग्लस गोल्ड व्हॅलेंटीना चँट्रीच्या प्रेमात होता, याचा आपल्याकडे काय पुरावा होता? तुम्ही याबद्दल विचार करता, तेव्हा तुमच्या लक्षात येईल, की तिथे फक्त मिसेस गोल्डचा आत्मविश्वास व चँट्रीची हेव्यादाव्याची पोकळ बडबड होती. तुम्हाला दिसले असेल, नाही का?

पामेला ओरडली, “हे भयंकर आहे.”

पायरो व्यवसायिकपणा न दाखवता बोलला, “ती एक हुशार जोडी होती. त्यांनी इथे भेटायचा व गुन्हा घडवून आणायचा बेत केला. ती मार्जोरी गोल्ड, ती थंड रक्ताची राक्षसीण आहे. तिने तिच्या गरीब, निरागस, मूर्ख नवऱ्याला जराही खंत न वाटता, फाशीच्या तख्तावर पाठवले.”

पामेला ओरडली, “त्याला पोलिसांनी काल रात्री अटक करून नेले.”

हर्क्युल पायरो म्हणाला, “पण त्यानंतर मी पोलीसांशी थोडे बोललो. हे खरे आहे, की मी चँट्रीला पेल्यात स्ट्रोपॅन्थीन टाकतांना पाहिले नाही. इतर प्रत्येकाप्रमाणे, मी बायका जमा झाल्या तेव्हा वर पाहिले. पण त्याच क्षणी मला जाणवले, की व्हॅलेंटीना चँट्रीला विष देण्यात आलेले आहे. मी तिच्या नवऱ्याकडे सतत पहात राहिलो. आणि म्हणून, मी त्याला स्ट्रोपॅन्थीनची पुडी डग्लस गोल्डच्या कोटाच्या खिशात टाकतांना पाहिले --- “

त्याच्या चेहऱ्यावर कठोर भाव आणत, तो पुढे बोलला, “मी चांगला साक्षीदार आहे. माझे नाव प्रसिद्ध आहे. मी सांगितलेली गोष्ट ऐकल्याबरोबर पोलिसांना समजले, की त्यामुळे सर्व बाबींवर वेगळा प्रकाश पडतो आहे.

उत्सुकतेने पामेला बोलली, “आणि मग?”

“मग काय, त्यांनी कमांडर चँट्रीला काही प्रश्न विचारले. त्याने उडवाउडवीची उत्तरे देण्याचा प्रयत्न केला. पण तो खरा हुशार नसल्याने त्याचे पितळ उघडे पडले.”

“त्यामुळे डग्लस गोल्ड सुटला?”

“हो.”

“आणि मार्जोरी गोल्ड?”

पायरोचा चेहरा कठोर झाला. तो म्हणाला, “मी तिला ताकीद दिली होती --- हो, मी तिला ताकीद दिली होती --- प्रॉफेटच्या डोंगरावर --- गुन्हा रोखायची एवढीच संधी होती. मी तिला जवळजवळ सांगितले, की मला तिचा संशय आहे. तिला समजले. पण ती स्वतःला फार हुशार समजत होती --- मी तिला सांगितले, की तिला तिच्या जीवाची पर्वा असेल, तर तिने हे बेट सोडून जावे. तिने --- रहायचे ठरवले --- “.

# अनुवादिकेची ओळख

## डॉ. वृषाली जोशी



B Sc, M A, M Ed, Ph D

२५ अनुवादित कथा मराठी मासिकामधून प्रसिद्ध झाल्या आहेत. ई साहित्यतर्फे बत्तीस पुस्तके प्रसिद्ध झाली आहेत.

मराठी व इंग्रजी माध्यमांच्या शाळाकॉलेजमध्ये अध्यापन केले आहे.

संशोधन प्रकल्पात सहभाग घेतला आहे.


कॉलेजमध्ये प्राचार्यपद भूषवले आहे.


सुगमसंगीत स्पर्धेत पारितोषिके, सिंथेसायझरवर गाणी वाजवण्याचा, कविता करण्याचा व शब्दकोडी बनवण्याचा छंद आहे.


संपर्क: वृषाली जोशी ७, अक्षय, २० तुळशीबागवाले कॉलनी पुणे ४११००९, चलभाष ९९२१७४६२४५


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)


डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके





















Agatha
Christrie

















# डॉ. वृषाली जोशी यांची पुस्तके


ज्या कव्हरवर क्लिक कराल
ते पुस्तक उघडेल
(नेट आवश्यक)










वृषाली जोशी
विश्वकथा१



वृषाली जोशी
विश्वकथा-२


वृषाली जोशी
विश्वकथा-३



वृषाली जोशी
विश्वकथा-४


वृषाली जोशी
अंतोन चेकॉव्ह
कंटाळवाणी गोष्ट
Classics To Go
A Dreary Story
Anton Chekhov


वृषाली जोशी
साकीच्या कथा
HECTOR HUGH
MUNRO SAKI


THE PICTURE OF
DORIAN GRAY
द पिक्चर ऑफ
डोरिअन ग्रे
वृषाली जोशी
OSCAR WILDE



सॉमरसेटमॉम
मेजवानीपूर्वी
व इतर कथा
अनुवाद
वृषाली जोशी
BEFORE
THE PARTY



वृषाली जोशी
THE SHAKESPEARE
STORIES
A MIDSUMMER NIGHT'S DREAM
THE MERCHANT OF VENICE
शेक्सपिअरच्या चार कथा
Much Ado
about
Nothing
Twelfth
Night






शेरलॉक होम्स
भाग १ ते ८ (५० कथा)


ज्या कव्हरवर क्लिक
कराल ते पुस्तक उघडेल








## ई साहित्य प्रतिष्ठानचे हे चौदावे वर्ष.
## डॉ. वृषाली जोशी यांचे हे तेहत्तीसावे पुस्तक.

डॉ. वृषाली जोशी या मराठी व इंग्रजी या भाषांच्या विद्वान आहेत. त्या प्राचार्य होत्या. त्यांनी काही काळ विदेशात राहून तेथल्या वाचन संस्कृतीचा अनुभव घेतला आहे. तशी वाचन संस्कृती महाराष्ट्रातही निर्माण व्हावी असे त्यांना वाटते. वाचकांची अभिरुची वाढली तरच लेखकांकडूनही दर्जेदार साहित्य निर्माण होईल. इंग्रजीतील उच्च दर्जाचे निवडक लेखकांचे साहित्य मराठीत अनुवाद करून मराठी वाचकांची अभिरूची संपन्न व्हावी यासाठी त्या अतोनात कष्ट घेतात. तसे पहाता अनुवादित पुस्तकांना अनेक व्यावसायिक प्रकाशकांकडून मागणी असते. परंतु मराठीतील जास्तीत जास्त वाचकांपर्यंत आपले साहित्य जावे म्हणून त्यांनी ई साहित्यची निवड आपल्या पुस्तकांसाठी केली आहे.

डॉ. वृषाली जोशी यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(१३), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(९), डॉ. नितीन मोरे (३६),

अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(१२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (८), अशोक कोठारे (४७ खंडांचे महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(३३), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे(२०), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(६) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(२), अरुण कुळकर्णी(९), जगदिश खांदेवाले(५) पंकज कोटलवार(६) डॉ. सुरुची नाईक(३) डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे(६), श्याम कुलकर्णी(४), किशोर कुलकर्णी, रामदास खरे(४), अरुण कुळकर्णी(१०) अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक(२), मंगेश चौधरी असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन

लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं 'इ'यें ।
दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।